सावरकर साहित्य

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ओ० वा
दा. क्र. १५८५१

# सावरकरांच्या निवडक गोष्टी

प्रस्तावना : डॉ. बा. वा. दातार

मॅजेस्टिक प्रकाशन

IRBK-0115851
IRBK-0115851

सावरकरांच्या
निवडक गोष्टी



पहिली आवृत्ती जानेवारी १९७३

किंमत सहा रुपये

प्रकाशक
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन,
२१६, प्रसाद चेम्बर्स,
मुंबई ४

रेखाचित्र
व्ही. एन. ओके

मुद्रक
सौ. उषा ज. नागपूरकर
श्री मुद्रण मंदिर,
९१४, सदाशिव पेठ,
पुणे ३०

मुखपृष्ठ । मांडणी
अरुण घाटे

सावरकर साहित्य

# सावरकरांच्या निवडक गोष्टी

प्रस्तावना : डॉ. बा. वा. दातार

मॅजेस्टिक प्रकाशन

१५८४१
कादंबरी

IRBK-0115851
IRBK-0115851

# अनुक्रम

प्रस्तावना : १ कुसुम : १५ गोविंदा गवळी : ३४ पित्र्यांचे दुसरे लग्न कसे फिसकटले ? : ४४ नंदीबैल आणि माणूस बैल : ५५ अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी : ७१ बाळंतीण : ७७ प्रार्थना : ९२ शेंदाडपूरचा शिवाजी उत्सव : १०५ अपघात की आत्मघात : १२० भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय : १३४

# प्रस्तावना

## सावरकरांचे जीवन व साहित्य :

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर ह्यांच्या जीवनाइतकेच त्यांचे साहित्यही वैशिष्ट्यपूर्ण व प्रेरणादायी आहे. त्यांच्या लोकविलक्षण व समर्पित जीवनास ' सर्वस्व–दक्षिण यज्ञा 'चीच उपमा द्यावयास हवी. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याच्या उपासनेचे असिधाराव्रत " बुद्ध्याचि वाण धरले, करिं हे सतीचे " ह्या वृत्तीने व निष्ठेने त्यांनी आचरण आचरिले. आपल्या सर्व शक्तींचा ह्या स्वातंत्र्य यज्ञाच्या सिद्धीसाठी विनियोग केला. आपली साहित्य निर्माणक शक्तीदेखील त्यांनी ह्या यज्ञाच्या सांगतेसाठीच हविर्द्रव्य म्हणून समर्पित केली.

" हे मातृभूमि ! तुजला मन वाहियेले
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले
तूतेचि अर्पिली नवी कविता रसाला
लेखाप्रति विषय तूचि अनन्य झाला. "

ह्या " माझे मृत्युपत्र " मधील काव्यपंक्तींतून सावरकरांच्या जीवनाच्या व त्या जीवनाचे एक उपांग ठरलेल्या साहित्यामागील प्रेरणा सुस्पष्ट होतात. त्यांची प्रत्येक जीवनकृती व साहित्यकृती म्हणजे एका विशिष्ट परिस्थितीतील मातृभूमीला वाहिलेल्या त्यांच्या मनाचा, त्यांच्या व्यक्तित्वाचा सहज आविष्कार असल्याने त्यांचे व्यक्तित्व, विविध साहित्य व विविध क्षेत्रांतील कर्तृत्व ह्यांतील अपरिहार्य एकात्मता सर्वत्र प्रत्ययाला येते.

क्रांतिनिष्ठा, स्वातंत्र्यनिष्ठा, हिंदुत्वनिष्ठा व विज्ञाननिष्ठा ह्यांचे अधिष्ठान त्यांच्या विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाला लाभले त्याचप्रमाणे ते त्यांच्या लेखन कर्तृत्वालाही लाभलेले आहे. ह्या निष्ठांच्या पुरस्कारासाठी व सिद्धीसाठी त्यांनी विपुल व विविध असे साहित्य लिहिलेले आहे.

## सावरकर साहित्यातील विपुलता व विविधता :

कवी, नाटककार, इतिहास लेखक, चरित्र लेखक, आत्मवृत्त लेखक, निबंधकार, कादंबरीकार, तत्त्वविमर्शक, संशोधक इत्यादी विविध भूमिकांतून सावरकरांनी प्रचंड लेखन केलेले आहे. वाङ्मयाच्या विविध शाखांत सावरकरांच्या लेखणीने संचार केला असला, तरी तो त्या त्या साहित्य-प्रकारांबद्दलच्या किंवा वाङ्मयप्रकारांबद्दलच्या प्रेमामुळे वा कलात्मक आकर्षणामुळे केलेला नाही. भिन्न भिन्न विषयांचे विस्तीर्ण क्षेत्र व्यापणारे त्यांचे लेखन हे मुख्यतः सहेतुक आहे. साहित्य-सम्राट न. चिं. केळकर ह्यांनी विपुल व विविध प्रकारचे लेखन केले आहे, ते मूलतः साहित्याच्या भक्तीतून व लेखनाच्या अनिवार अशा ओढीतून. सावरकरांच्या साहित्य-निर्मिती मागील प्रेरणा अशा स्वरूपाच्या नाहीत.

त्या तशा नसण्याचे कारण म्हणजे सावरकरांच्या जीवनाच्या व साहित्याच्या ध्येयासंबंधीचा दृष्टिकोन होय. हा दृष्टिकोन लक्षात घेतला, म्हणजे सावरकरांच्या लेखनातील विविधतेचा उलगडा होतो व त्यांच्या साहित्याचे स्वरूपही सुस्पष्ट होते.

## सावरकरांचा साहित्यविषयक दृष्टिकोन :

"ध्येयाचा प्रश्न आला की त्यात लहरीच्या, हौशीच्या, वैयक्तिक आवडीच्या अंतर्भावापेक्षा कर्तव्याचाच अंतर्भाव मुख्यतः अनुस्यूत झालेला असणार. जीवनाच्या सामूहिक कर्तव्याची जी व्याख्या तीच जीवनाचे एक उपांग सारस्वत त्याची व्याख्या, त्याचे ध्येय असले पाहिजे." ही सावरकरांची भूमिका. मनुष्य जातीचे अधिकात अधिक हित ज्या योगे साधता येते तेच त्यांच्या दृष्टीने मनुष्याचे ऐहिक कर्तव्य. प्राप्त परिस्थितीत त्या त्या काळी मनुष्य जातीचे अधिकात अधिक हित ज्या योगे साधता येते तेच त्या न्यायाने तात्कालिक कर्तव्य ठरते. ह्या भूमिकेशी सुसंगत अशा रीतीने त्यांनी मनुष्य जातीच्या अधिकात अधिक हितासाठी झटेल तेच साहित्य श्रेष्ठ, सुप्रासंगिक असे मानून साहित्याच्या परम व तात्कालिक ध्येयांची आपली व्याख्या सांगितली आहे. आनंद व करमणूक ही मानव हितास काही प्रमाणात हितकारक असल्याने त्यांचाही अंतर्भाव योग्य

प्रमाणात वरील ध्येयात होतो हे ते मान्य करतात. पण केवळ करमणूक हे काही कर्तव्य नाही असे स्पष्टपणे बजावतात. “अलंकार, कविता, तत्त्व ह्यांची मलाही आवड आहे. परंतु जी अपथ्य आवड तेच व्यसन! व जे अप्रासंगिक तेच अपथ्य!” हे सावरकरांचे उद्‌गार त्यांच्या वाङ्मय निर्मितीच्या संदर्भात केव्हाही विसरून चालणार नाहीत.

## सावरकरांचे ‘रसनिष्ठ’ साहित्य :

वस्तुनिष्ठ व रसनिष्ठ असे वाङ्मयाचे दोन विभाग सावरकरांनी कल्पिलेले आहेत. व दोनही प्रकारचे वाङ्मय स्वतः लिहिलेले आहे. वस्तुनिष्ठ वाङ्मयातही ते रसवत्ता कशी आणतात ह्याची उत्तम साक्ष “विश्वाचा देव व मानवाचा देव” ह्या सारखे त्यांचे निबंध, स्वातंत्र्य-समरासारखे इतिहास ग्रंथ, लंडनची बातमीपत्रे इत्यादी अनेक प्रकारच्या लेखनांमधून पटते. परंतु रसनिष्ठ किंवा ललित ह्या अभिधानाने ओळखल्या जाणाऱ्या त्यांच्या नाटक, कादंबरी व कथा ह्या तीन वाङ्मय-प्रकारांमध्ये मात्र कित्येकदा वस्तुनिष्ठा व त्यांची व्यक्तिनिष्ठा रसनिष्ठेवर मात करीत असते हे जाणविल्याशिवाय राहात नाही. “सध्याच्या हिंदुस्थानच्या परिस्थितीत माझे साहित्य केवळ प्रचारात्मक स्वरूपाचे आहे.” ह्या त्यांच्या सुस्पष्ट विधानाने त्यांच्या नाट्य, कादंबरी व कथा ह्यांना त्यांनी दिलेल्या रूपाचे व आकाराचे समर्थनही करता येईल. पण असे समर्थन अगदी अनिवार्य व्हावे असा सावरकरांच्या ‘रसनिष्ठ’ लेखनातील जर कोणता विशेष उल्लेखनीय असा विभाग असेल, तर तो म्हणजे त्यांच्या कथा किंवा त्यांचाच पर्यायी शब्द वापरायचा झाल्यास त्यांनी वाचकांसमोर उभी केलेली “समाजचित्रे” होय.

सावरकरांनी ज्या काळात आपल्या कथा लिहिल्या त्या काळात म्हणजे १९३५ च्या आसपास मराठी कथा वाचकांच्या कथेसंबंधीच्या अपेक्षा व काही कल्पना तत्कालीन मराठी कथेने निश्चित केल्या होत्या. मराठी कथा लेखकाने कथेला काही निश्चित रूप दिलेले होते. कथा-लेखनाचे एक विशिष्ट तंत्रही स्वीकारले होते व कथेला वाङ्मयीन कला-कृतीचे रूप मिळत होते. आकर्षक व आटोपशीर कथानक, पात्र प्रसंगांचा

मितव्यय, स्वभावलेखन, कलापूर्ण रचना. उत्कंठा व विस्मय उत्पन्न करणारे प्रसंग. आकर्षक प्रारंभ व अखेर. भोवतालच्या जीवनातून कला-दृष्टीने निवडलेल्या वास्तवाची कल्पकतेच्या किमयेने केलेली नवनिर्मिती. सुंदर शैलीने, भाषेने दिलेली मोहकता. संस्काराची व परिणामाची एकाग्रता इत्यादी विशेषांनी युक्त असलेली कथा हा एक ललित वाङ्मयप्रकार तत्कालीन वाचकांना परिचित व प्रिय झालेला होता. सावरकरांनी आपल्या समकालीन कथाकारांनी लिहिलेल्या कथांची, अनुसरलेल्या तंत्रांची व वाचकांच्या अभिरुचींची दखलच घेतलेली दिसत नाही. त्यांनी इतक्या वेगळ्या प्रकारची कथा लिहिलेली आहे की, साहित्यदृष्ट्या तिला ‘ कथा ’ हे नाव देणे देखील अडचणीचे वाटावे.

**सावरकरांच्या कथेचे काही विशेष :**

विषयदृष्ट्या सावरकरांच्या कथेकडे नजर वळविली तर त्यांचे कथाक्षेत्र अगदीच एकांगी व संकुचित आहे असे म्हणता येणार नाही. ‘कुसुम’ ह्या कथेतील त्या नावाच्या बालविधवेची मानसिक आंदोलने, तिची हृदय हलवून सोडणारी मनोव्यथा; मानवी लॉटरीचे बक्षीस लागावे ह्या अपेक्षेने नवसरूपी दैवी लॉटरीवर विसंबणारा ‘ गोविंदा गवळी ’; त्याच्या नवसाला आलेले मृत्युरूपी फळ पाहून मूर्तिपूजेची हेटाळणी करणारा मूर्तिभंजक ‘ कासम ’ व त्याच्या अल्लावरील विश्वासाला अनपेक्षितरीत्या आलेले मृत्यूचे फळ; बिजवरांना मुलगी देण्याचे आमिष दाखवून त्यांना लुबाड-णारे व निरपराध अर्भक मुलींना विवाह होमाच्या पेटत्या कुंडात ढकलू पाहाणारे संभावित गावगुंड, त्यांच्या तावडीतून कसेबसे सुटलेले पित्र्यांसारखे प्रौढ बिजवर; ( पित्र्यांचे दुसरे लग्न कसे फिसकटले ) मरतुकड्या गायीला वाचविण्यासाठी जीव टाकणारे पण गायीहून गाय झालेल्या अनाथ व आसन्नप्रसवा अबलेच्या आपत्तीतही तिची हृदयशून्य हेटाळणी करणारे— “ बाळंतीण ” कथेतील “ धर्मनिष्ठ ” हिन्दू; नंदिबैलाची पूजा करणारे, मैल्याची गाडी चाटणाऱ्या गोमातेची, तिला पवित्र मानून पूजा करणारे पण श्रम करून उपजीविका करणाऱ्यांची अवहेलना करणारे, मैल्याची, गाडी चालविणाऱ्या भंग्याला अपवित्र मानून त्याला मारहाण करणारे,

गो-सेवक, गो-पूजक, अस्पृश्यता मानणारे भाबडे व अंधश्रद्ध गावकरी–( नंदीबैल व माणूस बैल ). शिवाजी महाराजांची व राष्ट्रीय उत्सवांची विटंबना करणारे शेंदाडपूरचे " शिवाजी उत्सव " साजरे करणारे लाचार भ्याड–(शेंदाडपूरचा शिवाजी उत्सव) " दैवाची प्रार्थना करा भूकंपातून सुटाल !" असा उपाय सुचविणारे व मानणारे रूढिदास; प्रार्थना करूनही भूकंपात गाडले गेलेले भाविक; ( प्रार्थना ) डोक्यावर ओतलेल्या पाण्यामुळे विठोबाच्या डोळ्यांतून येणाऱ्या पाण्याला चमत्कार मानणारे भाबडे; ( भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय ) इत्यादी अनेक व्यक्तिसमूह, प्रवृत्ती, घटना, प्रसंग ह्यांचे दर्शन सावरकरांच्या कथा घडवितात. हरिभाऊंच्या काळापासून मराठी कथेत आलेले विषय, सामाजिक दुखणी, मनुष्य स्वभावाची विचित्रता इत्यादींची निवड करून सावरकरांनी आपल्या कथांमध्ये आणलेले वैचित्र्य व विविधता उल्लेखनीय वाटतात.

कथेमध्ये लालित्य हवे, आकर्षकता हवी त्यासाठी वेधक प्रसंग, आकर्षक वर्णने, मनोव्यापारांचे दर्शन; व्यक्तिचित्रण, रचनाकौशल्य इत्यादी गोष्टी आवश्यक असतात. सावरकरांना ह्याची जाणीव असल्याच्या ओझरत्या खुणा त्यांच्या कथांत मधूनमधून विखुरलेल्या दिसतात. "कुसुम" ही कथा ह्या दृष्टीने विशेष लक्षात घेण्यासारखी वाटते. कुसुमचा नवरा वारला तरी वडिलांच्या कृपेने तिच्या हाती फणी राहाणे, मेघदूत वाचताना तिच्या नयनांत अश्रूंचा मेघ येऊन त्याने अनामिक प्रियकराचे संदेश तिच्यापर्यंत पोहोचविणे. " मला कनी कोणाला तरी कडकडून भेटावंसं वाटतं. " असा केविलवाणा, आर्त उद्गार काढता काढताच गोविंदराव ह्या आपल्या मावसभावाला तिनं घट्ट मिठी मारणे, मनाचे सारे बांध फुटून महापुरात लतामंडप उन्मळून पडावा, तसे त्याला वेढून पडणे ह्यासारखी कितीतरी भावस्पर्शी, हृदयस्पर्शी स्थळे त्यांच्या ह्या कथेतून चमकून जातात.

अपेक्षित पर्यवसानाऐवजी अनपेक्षितपणे विरुद्ध पर्यवसान झाल्याचे दाखवून सावरकर आपल्या कथेत चटकदारपणा आणण्याचा प्रयत्न

करताना दिसतात. परस्पर विरोधी दृश्ये वा प्रसंग वा प्रवृत्ती, दृष्टिकोन आणि स्वभाव समोरासमोर उभे करून त्यांचा न्यास साधून चमत्कृति-पूर्ण कलाटणी देण्याचे कौशल्यही ते क्वचित दाखवितात. अपघात की आत्मघात, प्रार्थना, शेंदाडपूरचा शिवाजी-उत्सव, गोविंदा गवळी ह्या कथांतून मधूनमधून ह्याचे प्रत्यंतर येते. गणेश चतुर्थीच्या दिवशीच लॉटरी लागलेल्या गोविंदाला गणेश विसर्जनाच्या वेळी बुडून मरण आलेले आहे. "मोरयाला भजणारा गोंद्या मेला पण त्याला दगड म्हणणारा हा मी कासम जिवंत आहे बघ, फेक दो तुम्हारे मिट्टीके देव ! सच्च है मेरा पीर." असे म्हणताना नागासारखी मानेची फणा उर्मटपणे उभारणाऱ्या व मूर्तिपूजकांची हेटाळणी करणाऱ्या मूर्तिभंजक व पीराला नवस करणाऱ्या कासमला ही हेटाळणी करत असतानाच नागाचा दंश होऊन मृत्यू आलेला आहे. वडाच्या पूजेसाठी वडापुढे विनम्रपणे डोके टेकणाऱ्या भिमाबाई पाटलिणीच्या डोक्याचा, उन्मळून पडणाऱ्या त्याच वडाच्या सोटाखाली ठेचा झालेला आहे. अपमृत्यू टाळणाऱ्या मार्कंडेयाचे स्तोत्र स्मरत व तो अंगारा अंगास लावलेल्या आपल्या नातीला पोटाशी धरणाऱ्या आजीचा नातीसह भूकंपात चेंदामेंदा झालेला आहे, तर प्रार्थना म्हटली नसताही 'विमल'चा मृत्यू टळलेला आहे. अशा तऱ्हेचे विरोधी प्रसंग व दृश्ये सावरकर हेतुतः आपल्या कथांतून दाखवितात. कथाशरीराशी एकजीव झालेली परिणामकारक वर्णने कथेच्या रंजकतेत भर घालतात, ह्याचीही जाणीव सावरकरांनी आपणास असल्याचे काही स्थळी दर्शविले आहे. क्वेट्याच्या भूकंपाचे वर्णन, गोदास सुखे ह्यांनी धर्मशाळेपुढे चालविलेला गाईचा गौरव, नंदिबैलाची पूजा, कुसुम व गोविंदराव यांच्या भेटीचा प्रसंग, विवाहेच्छू, बिजवर पित्र्यांवर ओढविलेली आपत्ती ह्यासारखा गोष्टींचा निर्देश उदाहरणा-दाखल करता येईल.

**सावरकरांचा विनोद :**

सावरकरांच्या कथांमधील एक उल्लेखनीय विशेष म्हणजे त्यात विखुरलेला विशिष्ट प्रकारचा विनोद. क्वचित खेळकर पण सामान्यतः

उपहासगर्भ. टीकापर विनोद-निर्मितीची आणि हास्यकारक प्रसंग-चित्रणाची त्यांची शक्ती, कथेला रंजक बनविताना दिसते. " शेंदाडपूरचा शिवाजी-उत्सव," "काळ आणि कसर," "सुमन" कथेतील पहिले समाज-चित्र ह्यांमधून विनोदाची वेगवेगळी रूपे वावरतात. ऐतिहासिक साधन निर्दालन—समितीची स्थापना करावी व काळाप्रमाणेच कसरीचेही या संबंधात अनंत उपकार असल्याने कसरीच्या स्वरूपाचा एक पुतळा उभारून ' ऐतिह्य उपमंडळाची देवता ' म्हणून तिची नित्य पूजा होत जावी, हे काळ आणि कसरमधील दोन ठराव. त्यावरील भाष्ये व श्री. उलगडे ह्यांची भाषणे ही सावरकरांच्या उपरोधपूर्ण शैलीची उदाहरणेच होत. " इंग्लिश व्हर्बस्‌ची भर मराठीत घालून मी माझ्या मदर टंगचे क्रियापद दारिद्र्य नाहिसे करण्याचे रिझॉल्व्हिले आहे. " ह्या थाटाचे त्यांचे अध्यक्षीय भाषण तर या सर्व प्रकारात गमतीदार आहे. पण विनोदी लेखनाचा हेतू मनात वागवून केलेले हे विनोदी लेखन नव्हे. आपल्या भाषाशुद्धी विषयक विचारांचा पुरस्कार करून विरोधकांची उपहासगर्भ थट्टा करावी हाच ह्या लेखनामागील मुख्य हेतू आहे. हे ' इतिहास संमेलन ' कोल्हटकरांच्या चोरांच्या संमेलनापेक्षा वेगळे झाले आहे हे सांगणे नकोच. पित्र्यांचे दुसरे लग्न कसे फिसकटले ह्यातही हास्यकारक प्रसंगचित्रण आहे. पण तेथेही विनोद निर्मितीपेक्षा खेड्यातील लोक म्हणजे गोगलगाय व नागर तेवढा काय तो लुच्चा हा समज, अपसमज कसा आहे हे दाखविण्याची आणि त्याच बरोबर ८।९ वर्षांच्या निरपराध मुली विवाह होमाच्या पेटलेल्या कुंडात कशा उड्या घेतात त्याचे छायाचित्र काढून " जुन्या नीतीच्या अमर्यादित अभिमान्यांना त्याची एकेक प्रत भेट म्हणून देण्याची इच्छा ", अधिक महत्त्वाची आहे. ' माझे दत्तक वडील ' सारख्या चिं. वि. जोशी यांच्या कथेची आठवण सावरकरांनी वर्णिलेले काही प्रसंग करून देतात. पण त्यामुळे उद्देश, स्वरूप व रचना-कौशल्य ह्यांतील अंतराची जाचक जाणीवही झाल्याशिवाय राहात नाही.

कुसुमच्या शाळेतील बक्षीस समारंभाचा प्रसंग व शिक्षक दिगोजीपंत ह्यांचे भाषण ह्यातून सावरकरांच्या विनोदी बुद्धीची चांगली ओळख होते. हा एवढा एकच प्रसंग, एका बऱ्यापैकी विनोदी कथेला दुसऱ्या

एखाद्या कलाचतुर लेखकाने पुरेसा मानला असता, पण कथेतील संस्काराच्या एकात्मतेची फिकीर न करणाऱ्या सावरकरांनी ह्या एकाच कथेत तीन कथानके एकत्र आणलेली आहेत.

एकाहून अधिक कथासूत्रे, विषय व उद्देश एकाच ऐसपैस लेखात आणून कथेची एकात्मता दुर्लक्षित करण्याची त्यांची पद्धती अनेक कथांत आढळते. उदा.–'प्रार्थना' ह्या कथेतील " प्रार्थना ही मनुष्याची आशा आहे. आशापूर्तीची हमी नव्हे " हे विचारसूत्र वाचकांच्या मनात ठसविण्यासाठी भूकंपात प्रार्थना करणाऱ्या वृद्ध आजी, अजाण नात ह्यांचा प्राणनाश होतो; परंतु प्रार्थना न करणारी आई मात्र बचावते, एवढा प्रसंग पुरेसा झाला असता. परंतु हिंदू व मुसलमान ह्यांच्या वृत्तींमधील अंतर दाखविण्याच्या उद्देशाने सावरकरांनी 'विक्रम व परिदाद' ह्या स्वयंसेवकांचा प्रसंगही येथे ह्या कथेत वर्णन केला आहे. भूमितीच्या सिद्धांतासारखी ही जुळवून आणलेली उदाहरणे जीवनदर्शनाच्या पातळीवर जाण्याऐवजी जीवनभाष्याच्या पातळीवरच राहातात.

शेंदाडपूरच्या शिवाजी-उत्सवाचे सावरकरांनी केलेले वर्णन हा देखील उपहास उपरोधपूर्णाचा मजेदार नमुना आहे. ह्या उत्सवात २४ तास सारखे केस भादरण्यात जागतिक उच्चांक ज्याने पटकावला आहे अशा श्मश्रुविक्रम करणाऱ्या नरू न्हाव्याचा गौरव, नागूकवीचे त्या वीरावरील प्रशस्ती काव्य-गायन आणि तसबिरीतून कवचकुंडल मुकुटासहित भवानी तलवार उपसलेले प्रत्यक्ष शिवाजी महाराज 'हरहर महादेव' गर्जत उभे ठाकत आहेत हा प्रसंग. हा सगळाच मामला मोठा हास्यकारक आहे. पण हास्यकथा वाचकांना देणे हा सावरकरांचा मुख्य उद्देश नाही. हिन्दू मुसलमानांच्या ऐक्यासाठी व मुसलमानांच्या भावना दुखू नयेत ह्यासाठी खरा इतिहास बाजूला ठेवण्याचा प्रयत्न व नव्या " राष्ट्रीय " परिस्थितीस अनुरूप अशा पद्धतीने शिवाजीसारख्या राष्ट्रीय पुरुषांची चरित्रे शिकवण्यासंबंधीच्या महात्मा गांधी प्रभृती नेत्यांची विचारसरणी हास्यास्पद करून चव्हाट्यावर मांडणे ह्यासाठी येथे विनोद हे साधन वापरलेले आहे. अच्युत बळवंत कोल्हटकरांनी माधवाश्रमात प्रकट केलेला शिवाजी व सावरकरांनी शेंदाडपूरात व्यास-

पीठावर उपस्थित केलेला शिवाजी ह्यांची तुलना करणे उद्‌बोधक होईल.

**कथालेखनाचे स्वरूप-घटितांचे निवेदन :**

सावरकरांच्या कथांची अशी काही वैशिष्ट्ये आहेत. चटकदार कथेसाठी आवश्यक असणारी सामग्री, सावरकरांना दुष्प्राप्य नाही, हे त्यातून लक्षात येते. पण ह्या सगळ्या साधनसामुग्रीचा, कथाकाराच्या वृत्तीने यथाप्रमाण मेळ साधून कथारूपी रुचकर खाद्य कथाप्रेमी वाचकांच्या आस्वादासाठी सिद्ध करण्यात मात्र सावरकर यशस्वी झालेले नाहीत असे म्हणणे क्रमप्राप्त होते. सावरकरांनी विविध वाङ्मयप्रकारांची निर्मिती केली ती त्या त्या वाङ्मयप्रकाराच्या आकर्षणामुळे किंवा कला-दृष्टीने केलेली नाही हे मागे म्हटलेलेच आहे. आपल्या भोवतालचे सामाजिक व राजकीय जीवन व परिस्थिती ह्यांच्या संदर्भात आपल्या तत्कालीन प्रतिक्रिया, रागलोभ व विचारसरणी व्यक्त करण्यासाठी त्यांनी नाटक, कादंबरी, कथा ह्या साहित्य प्रकारांचा वापर केलेला आहे. कथा या साहित्य प्रकाराच्या स्वरूपाचे व रचनातंत्राचे भान त्यांना असावे तसे नाही. त्यामुळे त्यांनी रेखाटलेल्या समाजचित्रांना 'कथे'चे लेबल मुद्दाम चिकटवावे लागते.

सावरकरांच्या कथांना हे असे रूप का आले? किंवा खरे म्हणजे त्यांनी ते का दिले? कथालेखन हे सावरकरांनी साध्य मानलेच नव्हते, हेच त्याचे कारण सांगता येईल. कथेच्या रूढ तंत्रापेक्षा त्यांना समाजाला शिकवावयाचा मंत्र नेहमीच अधिक आवश्यक वाटला. आकर्षक कथा कशी लिहावी ह्यापेक्षा कथेच्या मिषाने समाजहिताला आवश्यक असे काय सांगावे हाच विचार त्यांना अधिक महत्त्वाचा वाटल्यामुळे त्यांनी कलात्मक अभिव्यक्तीपेक्षा व्यवहारोपयोगी आशयाला वरचे स्थान देऊन कथा लिहिली.

'पित्रे ह्यांचे दुसरे लग्न कसे फिसकटले' ह्या कथेच्या प्रारंभी सावर-करांनी जे प्रास्तविक लिहिलेले आहे त्यावरून त्यांचा कथेच्या स्वरूपा-विषयीचा दृष्टिकोन कोणता ते कळते. "कल्पितापेक्षा घटितांचा परिणाम नेहमी शतपटीने अधिक टिकाऊ, अधिक लागू, अधिक विश्वसनीय

असणारच असणार. अर्थात समाजातील कोणत्याही रूढीचे सुपरिणाम व दुष्परिणाम अखंडनीय पुराव्याने सामाजिक मनावर ठसविण्यास सत्यकथेचा उपयोगही तितक्याच पटीने अधिक होणार......उदाहरणार्थ–विवाहाचा विषय घेऊन...... कल्पित प्रबंध इतर दृष्टीने कितीही उपयोगी व आकर्षक असले तरी, विवाहाच्या जुन्या व नव्या प्रकारात समाज किती दुःखी व सुखी असू शकेल किंवा शकतो ते निर्विवादपणे ठसविण्यास तशा खरोखरच घडलेल्या विवाहाच्या व विवाह विषयक घटनांच्या सत्यकथा ह्याच निर्भेळ वृत्तांताच्या खालोखाल उपयोगी पडणाऱ्या असतात आणि केव्हा केव्हा कल्पिताहून अधिक आकर्षक व रोमहर्षक असतात." असा प्रारंभ करून सावरकरांनी समाजाच्या वास्तव परिस्थितीवर लख्ख प्रकाश पाडणारी एक विवाह विषयक "सत्यकथा" लिहिलेली आहे. ती त्यांना 'पित्र्यां'च्या तोंडून प्रत्यक्ष ऐकायला मिळालेली आहे. तिची सत्यताही त्यांनी इतर शिष्टांकडून पडताळून घेतली आहे. सावरकर तिला "कथा" एवढ्याचसाठी म्हणतात की, तीत नावे व गावे तेवढी 'भाग पडली' म्हणूनच बदललेली आहेत व घटनेशी घटना जुळवून घेतलेली आहे. सावरकरांच्या कथा सामान्यतः अशाच रीतीने सत्याधिष्ठित व वास्तव घटनांवर आधारलेल्या आहेत. "देवसकी आणि माणुसकी" ही कथा म्हणजे तर केवळ रत्नागिरीतील दाभोळ ह्या लहानशा गावी कॉलऱ्याच्या साथीत महारवाड्यातील अज्ञ महारांत देवसकीच्या आत्मघातकी मूर्खपणामुळेच उसळलेल्या खऱ्याखुऱ्या कहराचे एक हृदयविदारक वृत्तनिवेदनच आहे. "अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी" हे चमत्कृतिजनक शीर्षक दिलेल्या गोष्टीत त्यांनी ओमेयेड वंशातील खलीफा दुसरा वालीद ह्याचीच खरी गोष्ट सांगून खलीफाच्या पवित्र अंगरख्याने केलेली गंमत सांगितली आहे.

सर्वसंचारी नारदास अनेक ठिकाणी पाठवून तेथे त्याला काय दिसले हे विनोदी, उपहासपर नि टीकापर वृत्तीने सांगणाऱ्या कल्पनारम्य वा हास्यकारक कथा मराठीत परिचित आहेतच. "नारदाची पृथ्वीस पुनः भेट" ह्या सावरकरांच्या कथेतील नारद १९३५ मध्ये बिहारमध्ये झालेल्या मोठ्या भूकंपाच्या संदर्भात महात्मा गांधींनी लिहिलेल्या एका लेखाचा परामर्श

घेतो. ही गोष्ट म्हणजे 'अहिंसानंद' 'शब्दशास्त्री' ह्यांतील भूकंपाच्या अनुषंगाने झालेली संवादरूप चर्चाच आहे. (गांधींच्या लेखाचा खरपूस समाचार ह्या गोष्टीत आहे. अशी टीपही ह्या कथेला जोडली आहे.) नारद, ही चर्चा प्रथम गुप्तपणे ऐकतो व नंतर त्या चर्चेत भाग घेऊन 'विज्ञानदेव' हा विष्णूचा नवा अवतार आहे हे दोघांना पटवून देतो. "भूकंप विद्येचे नियम लक्षात घेऊन भूकंपाचे पट्टे हे भूगर्भात कोठे कोठे आहेत ते निश्चित करून त्या त्या कक्षेत वस्ती करू नका आणि भूकंपात आपण दगावलो व कुटुंबातील कोणी वाचले तर त्याच्यासाठी शक्य तितक्या मोठ्या रकमेचा विमा उतरवून ठेवा" असा सल्ला देऊन नारद त्यासाठी मुंबईच्या "नवभारत" किंवा पुण्याच्या "कॉमनवेल्थ" ह्या विमा कंपन्यांची शिफारस करतात. "ह्या परम भगवत्‌भक्त भगवान नारदाचा शेवटी एका विमा मंडळाचा एक आडत्या व्हावा ना! कोण अधःपतन!" ह्या शब्दशास्त्र्यांच्या उद्‌गाराने ह्या कथेचा शेवट झाला आहे.

'प्रार्थना', 'अपघात की आत्मघात' ह्या कथाही अशाच प्रत्यक्ष घटितांचे टीका-टिपणीसह निवेदन करणाऱ्या आहेत. पात्रनामे, घटना, प्रसंगांची जुळणी एवढ्यापुरतीच कल्पिताची योजना आहे. वास्तवातील घटनांची निवड करून त्यावर प्रतिभेचे संस्कार करून त्यांचे कलात्मक रूपांतर वा पुनर्रचना वा नवनिर्मिती करणाऱ्या कल्पनाशक्तीचा आविष्कार त्यांत नाही. जीवनचित्रे कल्पकतेच्या कुंचल्याने रंगविण्यापेक्षा एका विशिष्ट दृष्टिकोनातून (अँगल) समाज जीवनातील घटितांची व प्रसंगांची छायाचित्रे म्हणजे सावरकरांची कथा. प्रत्यक्ष घडलेल्या घटना जशाच्या तशाच लिहिल्यास व त्यांचे निर्भेळ वृत्तांताचे व बातम्यांचे स्वरूप कायम ठेवल्यास त्यातील मर्म वाचकांच्या लक्षात येणार नाही किंवा त्या दुर्लक्षिल्याही जातील. असे होणे हे सावरकरांच्या राजकीय, सामाजिक उद्दिष्टांच्या दृष्टीने त्यांना इष्ट नाही. आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींमागील प्रवृत्ती, विचारसरणी, कार्यकारणसंबंध ह्यांचे ज्ञान व्यावहारिक पातळीवरून वाचकांना करून देणे व त्यांच्या विचाराला व आचाराला इष्ट वळण लावणे हे त्यांना अभिप्रेत आहे. साहित्यिक सावरकरांपेक्षा समाज-

सुधारक, हिन्दुत्वाभिमानी, विज्ञाननिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी, हिन्दुसंघटक, समाजधुरीण, विचारवंत सावरकरच ह्या कथांमधून प्रकट होताना दिसतात. ह्यामुळे वास्तव घटनांनाच काल्पनिक अशा पात्र प्रसंगांचा आधार देऊन केवळ बहिरंगापुरते कथारूप दिलेले दिसते. ह्या कथा लिहिण्याचा त्यांचा हेतू व निबंध लिहिण्याचा त्यांचा हेतू एकच आहे. त्यामुळे त्यांच्या निबंधांचेच विषय हे त्यांच्या कथांचे विषय झालेले आहेत व तत्त्वप्रतिपादन हा दोघांचाही गाभा झालेला आहे. हिन्दू समाजाच्या देव विषयक व दैव विषयक समजुती; वड, पिंपळ, गाय इत्यादी उपयुक्त वस्तूंबद्दल एकेकाळी क्षम्य ठरणारी पण आजच्या विज्ञानदृष्टीला अनावश्यक ठरलेली व म्हणून हास्यास्पद बनलेली पूज्य भावना, प्रार्थना, व्रते, वैकल्ये ह्यासंबंधीच्या धार्मिक श्रद्धा, देवलसी मनोवृत्ती, जन्मजात जातिभेद, अस्पृश्यता, शब्दप्रामाण्य, धर्मभोळेपणा, अहिंसाविचारांचा अतिरेक ह्या संबंधीची चर्चा निबंधांप्रमाणे त्यांच्या कथांतही झालेली आहे. फरक असेल तो फक्त आविष्कार पद्धतीचा. आपल्या निबंधांच्या वाचकवर्गापेक्षा अधिक विस्तृत असा वाचकवर्ग डोळ्यांपुढे ठेवून गोष्टींबद्दलची त्याची आवड लक्षात घेऊन सावरकरांनी आपल्या निबंधांचा प्रतिपाद्य आशय समाजाच्या गळी कथेच्या अनुपानातून उतरविण्याचा मार्ग स्वीकारलेला आहे. सावरकरांच्या निबंधांचे आवाहन हिन्दुसमाजाला केलेले असले तरी त्यातील तत्त्वप्रतिपादन व प्रौढ भाषाशैली सर्वसामान्यांच्या आटोक्यात आहे, असे म्हणता येणार नाही. आपल्या निबंधांचा आशय वाचकांच्या मनात थोड्या सुलभतेने शिरावा ह्यासाठी कथेच्या झिरझिरीत आवरणाखाली आपला निबंध लपवून त्यांनी वाचकांकडे पाठवला आहे.

त्यामुळे त्यांच्या कथा म्हणजे एक प्रकारे निबंधाचे परिशिष्टच होय. गोष्ट आणि वैचारिक निबंध ह्यांचा संकर असे रूप त्यामुळे कथेला आलेले आहे.

**सावरकरी कथा–विचार-कथा :**

कलाविलासाने वाचकांना वाङ्मयानंदाचा अनुभव देणे हा सावरकरी

कथेचा हेतूच नाही. सावरकरांची कथा ही विचार-कथा प्रचार-कथा किंवा उघड उघडपणे काही विशिष्ट मतांचे व तत्त्वांचे प्रतिपादन करणारी तात्पर्य कथा आहे. तत्त्वप्रतिपादन हा सावरकरांच्या कथांचाही प्रधान हेतू असल्यामुळे कथेतील पात्रे, व्यक्तिरेखा आणि प्रसंग ह्यांची निर्मिती तत्त्वप्रतिपादनासाठीच होते. स्वभावलेखनाला दुय्यम स्थान प्राप्त होते व ही पात्रे, सावरकरांचीच भाषा व विचार बोलणारी, लेखकाच्या हातातील कळसूत्री बाहुली बनतात. समाजाला जागृत करावे, सावध करावे, त्याने काय घ्यावे व काय टाकावे हे सांगणे हा सावरकरी कथेचा जीवित हेतू आहे आणि म्हणूनच तंत्रदृष्ट्या किंवा कलादृष्ट्या आपली कथा देखणी आहे की नाही ह्याची फिकीर सावरकरांना नाही. समाजाला ती रिझविते की नाही त्यापेक्षा ती समाजाला शिकविते की नाही, जागृत करते की नाही, प्रभावित करते की नाही ही गोष्ट त्यांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाची. साहित्य कलाकृतींचे निकष सावरकरांच्या ह्या ' हेतू पुरस्सर उपदेश कथां 'ना लावून चालणार नाहीत. काव्यसृष्टीत प्रवेश करताना काव्यदृष्टी हवी, हे जितके खरे; तितकेच सावरकरी कथा सृष्टीत संचार करताना सावरकरी दृष्टी हवी हेही खरे. कलागुणांचा रम्य आविष्कार सावरकरांची कथा दाखवीत नाही, परंतु त्यांची जीवननिष्ठा, त्यांची विज्ञाननिष्ठा, त्यांची प्रखर बुद्धिनिष्ठा व हिंदुनिष्ठा आणि त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व ह्यांचा आविष्कार मात्र ती निश्चित करते. हे लक्षात घेतल्यास सावरकरांच्या कथा त्या दृष्टीने वाचनीय ठरतात. सावरकरांच्या कथा ह्या सावरकरांच्या कथा म्हणूनच स्वीकारावयास हव्यात. तेथे कथेपेक्षा सावरकर अधिक महत्त्वाचे ठरतात. सावरकरांचे मन व हिन्दू मनोवृत्ती ह्यांची ओळख करून घेण्यासाठी त्यांचा उपयोग निश्चितच आहे.

डॉ. बा. वा. दातार

# १. कुसुम

वडगाव येथील शाळेचा आज पारितोषिक समारंभ. अशा प्राथमिक मराठी शाळांचा पारितोषिक समारंभ म्हणजे मुलांच्या मेहनतीचे चीज होण्याचाच काय तो दिवस नसून, शिक्षकांच्या मेहनतीचेही चीज होण्या न होण्याचा दिवस असतो. त्यातही गावठी शाळेत खिचपत पडलेल्या आजकालच्या आमच्या अर्धपोटी मराठी शिक्षकांना तर ह्या दिवसाचे फारच महत्त्व. कारण त्यांच्या पोटापाण्याच्या प्रश्नांशीही ह्या असल्या वार्षिक पारितोषिक-समारंभाचा थोडाफार संबंध पोचण्याचा संभव असतो.

कारण गावपंचांना, गावातील पालकांना आणि वेळी डेप्युटी-महाशयांनाही सतुष्ट करण्याची ह्या वेळी त्या बिचाऱ्या शिक्षकाला एक सुवर्णसंधीच आलेली असते. अशा समारंभाच्या दिवशी त्या गावचे ते गावपंच, दीडदमडीच्या भांडवलाचे गावशेठजी, जन्मात ज्यांना कोणी खुर्ची देत नाही असे ' पालक ' ह्या थोर पदवीने त्या दिवशी शाळेतील खुर्च्यांवर बसविले जाणारे रेमेडोके गावगृहस्थ, मुले, मुली, जातीयेती बायामाणसे, ह्या साऱ्या जणांना अशा समारंभातील त्या झिळमिळया, तासे-ढोल, गाणी-संवाद, पेटी-तबला, ' या हो ! या हो ! 'ची आर्जवी स्वागते यांनी त्या शाळेविषयी मोठी आपुलकी वाटू लागते आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षेपेक्षाही ह्या असल्या पारितोषिक-समारंभामुळेच त्या शिक्षकाचे नाव गावात ज्याच्या त्याच्या तोंडी ऐकू येऊ लागते; त्यामुळे वर डेप्युटीलाही आपली शाळा आणि आपण स्वतः गावकऱ्यांत किती लोकप्रिय आहो हे शिक्षकांना सहजासहजी दाखविता येते.

या समारंभाचा गावठी शाळांतील बापड्या सरकारी शिक्षकांना जर आणखी एक महत्त्वाचा उपयोग होत असेल तर तो आपल्या शाळेच्या प्रगतीच्या भाषणात येनकेनप्रकारेण स्वतःच्या आबाळीचे दुःख वेशीवर टांगण्याची संधी त्या निमित्ताने मिळते, हा होय. ओढाताण करून शाळेच्या प्रगतीच्या व्याख्यानाच्या विषयात स्वतःच्या पोटापाण्याच्या

अधोगतीचा थोडातरी उल्लेख शिक्षकांना सहज घुसडून देता येतो !

वडगावचे शिक्षकही असेच आबाळलेले, त्यातही जरा भोळसर. त्यांच्या त्या गावातील शाळेच्या या आजच्या पारितोषिक-समारंभास गावपंचासुद्धा झाडून सारे लोकच नव्हेत, तर शेजारच्या त्या तालुक्याच्या मुख्य ठाण्यात महिन्या दोन महिन्यांनी एखादा अंक काढणाऱ्या 'जगत्समाचार' नावाच्या साप्ताहिकाचे संपादक श्री. बंडोपंत हेच अध्यक्षपदी विराजमान होण्यास्तव येणार होते. वर्तमानपत्राच्या संपादकांसारखी, आपली दुःखे जीवर जगतासमोर टांगता येतील अशी उंच नि भव्य वेस दुसरी कुठे मिळणार ? अशा विश्वासाने वडगावातील ह्या शाळेच्या दिगोजीपंत शिक्षकांनी आपल्या होणाऱ्या व्याख्यानात आपल्या दुःखाची कहाणी सांगोपांग गोवून पगाराच्या नि तांदूळ, डाळ, भाजी, भांडी प्रभृतीसाठी संसारात कमीत कमी जो खर्च येतो त्याच्या प्रमाणशुद्ध प्रमाणशून्यतेचा पाढा वाचलेला होता. ते भाषण त्यांनी स्वत: तर पाठ केलेच होते; पण त्याच अर्थाचे एक पद रचून ते इतर पदांप्रमाणेच मुला-मुलींकडूनही पाठ करविले होते.

याच पद म्हणणाऱ्या मुलींत कुसुम होती. ती दिसण्यात चांगली, वयाने दहा वर्षांची, बोलण्यात चुणचुणीत, गळ्याची गोड, अर्थात् पद बसविताना दिगोजीपंतांनी तिलाच मुख्य गायिकेचे काम दिले. ते पद तिला शिकविताना आताशी तिच्याशी दिगोजीपंत येता-जाता इतके बोलत की, इतर मुलामुलींना मत्सर वाटून त्यांच्या-त्यांच्यात नव्हे, तर काही गावगुंड बायामाणसांतही 'जुळतंसं आहे अं टिपण !' अशी टवाळी सहजासहजी आतून चालू लागली.

तसे म्हटले असता दिगोजी शिक्षक कुसुमपेक्षा इतर मुलामुलींशीच पुष्कळ बोलत; पण शाळा-कॉलेजातील शिक्षक-अध्यापक-प्राध्यापकांच्या विद्यार्थ्यांशी आणि विद्यार्थिनींशी बोलण्याची मोजणी ज्या कोष्टकाने गणली जाते, त्या कोष्टकाप्रमाणेच काय ते बिचारा दिगोजीपंत कुसुमशीच अधिक बोलतो असे ठरे.

ते कोष्टक असे : शाळा-कॉलेजातील कोण्या मुलाशी शिक्षक शंभर वेळा बोलतो तर ते जितके आक्षेपार्ह नाही तितके ते वर्गातील एखाद्या

गबाळ मुलीशी दहादा बोलले तर आक्षेपार्ह समजावे; आणि गबाळ मुलीशी दहादा बोलणे जितके आक्षेपार्ह, त्याहून कोण्या चुणचुणीत मुलीशी एकदा बोलणे अधिक संशयास्पद समजावे; हा या प्रकरणीचा दंडकच पडला! त्यामुळे चुणचुणीत कुसुमशी दिगोजीपंत शिक्षक एकदा बोलताच साऱ्या शाळेस ते जितके ठळकपणे ऐकू जाई नि भडकपणे दिसून येई तसे शंभरदा कोणा इतर मुलामुलींशी बोलले असताही ऐकू जात नसे; दिसून येत नसे.

शाळेचा पारितोषिक समारंभ चालू होताच मुलामुलींची पदे, संवाद झाले. कुसुमची भूमिका सगळ्यात सुरेख वठल्यामुळे अध्यक्ष असलेल्या 'जगत्‌समाचारा'च्या संपादकांनीही तिचे कौतुक केले. 'पाघळले अं पाहुणे पण!' दोघे चौघेजण कोपऱ्यात हातावर हात मारून खिदळले. दिगोजीपंत मनात सचिंत झाले! 'माझे भाषणही कुसुमच्या संवादासारखे वठेल का! संपादक त्याचेही असेच कौतुक करतील का?' – ता झालीच त्या भाषणाची वेळ – आणि मुलामुलींच्या एकच गलक्याची! दिगोजीपंतानीही मुलामुलींचा तो गलका थांबविणाऱ्या शिक्षकाची नि शाळेच्या प्रगतीचा वृत्तान्त वाचून त्यावर भाषण करणाऱ्या व्याख्यात्याची अशा आपल्या दोन्ही भूमिका एकसहाच करण्यास कंबर कसली. उजव्या हातात प्रतिवृत्ताचे (रिपोर्ट) ते पुडके नि डाव्या हाताशी टेबलावर ठेवलेली छडी घेऊन ते बोलावयास उभे राहिले. 'मुलांनों, मुलींनों!' असा पहिला शालेय भाषणांतील सवयीचा संबोधनी होकार दिगोजीपंतांनी घसा खरडून देताच त्या आज्ञाधारक मुलामुलींनी 'ओऽ! ओऽ! मास्तर!' अशा प्रत्युत्तराची एकच ओरड चालविली. 'हा चूप! चूप! नुसते ऐका! राम्या! तू, तू, तिथं गोंद्या! गप!' असे त्या दिगोजींनी मुला-मुलींना दटावीत डाव्या हाताने टेबलावर छडी दहापाच वेळा कडाकड आपटल्यानंतर मुलामुलींच्या बरेचसे ध्यानात आले की, ह्या वेळी मास्तरांनी आपणास हाका मारल्या किंवा काही विचारले तरी आपण बरोबर उत्तरे न देता चूप बसायचे आहेसे दिसते.

दिगोजीपंतांच्या लक्षात या वेळपर्यंत येऊन गेले होते की, शालेय भाषणातील सवयीने आपण सभेतही आरंभ ‘ मुलांनो नि मुलींनो ! ’ असा करून गेलो, ही चूक झाली. यासाठी आता त्यांनी सावधपणे पुन्हा पहिल्यापासून भाषण चालविले—

‘ अध्यक्ष महाराज आणि बंधुभगिनींनो ! ( हं ! सोम्या, हुश्श् ! ) आज आपल्या शाळेचं परमभाग्य की, ‘ जगत्समाचारा ’सारख्या थोर पत्राचे जगप्रसिद्ध संपादक श्रीयुत बंडोपंत हे अध्यक्ष म्हणून समारंभास लाभले आहेत ! ( थोरांच्या टाळ्या, त्यासरशी चाणाक्ष पोरांना कळून चुकले की, वाक्याशेवटी टाळ्या द्याव्या लागतात. त्याप्रमाणे पुढील वाक्य संपण्याची ते, हात टाळीसाठी सजवून वाट पाहातात.) या शाळेचे संस्थापक श्री. दगडूजी पाटील या वर्षीच पटकीने वारले– ! ( पोरांच्या टाळ्यांचा कडकडाट ! ! दिगोजीपंतांच्या रागावून टेबलावर आपटल्या जाणाऱ्या छडीचा छमछमाट ! आणि आज्ञांचा गडगडाट ! हुश्श ! ऐकून घ्या, तिथं चंद्या ! चूप ! ) याविषयी मी आरंभीच अत्यंत खेद प्रदर्शवितो. आता शाळेच्या प्रगतीचं प्रतिवृत्त प्रथम वाचावयाचं; परंतु (‘ मास्तर ! मास्तर ! ’ हा भिक्या मला कोपरखळ्या मारतो आहे सारखा ! ’ ‘ नाही मास्तर, ह्या सख्यानंच मला चिमटा काढला पहिल्यानं ’ असा गोंगाट ! ‘ हा ! उठा, दोघेही उठा तिथून, तू इकडे बैस–तू जा मागं ! ’ अशा शिक्षक दिगोजीपंतांच्या कडक आज्ञा ! ) – परंतु ही पाहाताच आहा तुम्ही या उनाड मुलांची गडबड ! तेव्हा मी इतकेच सांगतो की, मी एक बापडा दरिद्री शिक्षक, कुटुंबात मुलं-लेकरं तर सारखी वाढताहेत, पण दरमहाच्या बारा रुपये पगारात मात्र गेल्या बारा वर्षांत एका दमडीचीही वाढ नाही. बारा एके बारा. पण पुढे काय ? ( चाणाक्ष गोंद्याला वाटते–पाढ्याचं पुढं काय, ही मास्तरांना अडचण पडली. तो ताडकन् ओरडतो – ‘ पुढे बारा दोनी चोवीस मास्तर ! राम्या म्हणतो – ‘ बारा त्रीक छत्तीस मास्तर ! ’ त्यासरशी अध्यक्ष वगैरे सर्वजण खो खो हसतात ! दिगोजीपंत आपल्या करुण कहाणीच्या भर शोकरसात ह्या हास्यरसाने माती कालविल्यामुळे संतापून देहभान विसरतात, डाव्या हाताकडची छडी केव्हा उजव्या हातात

घेतली आणि त्या पायापाशीच बसलेल्या गोंद्या-राम्याच्या अंगावर सपासप केव्हा लगावली ते ती मुले मोठमोठ्याने ' अयायाया ! अयाय ! ' असे किंकाळून उठेतो दिगोजी शिक्षकांच्या स्पष्टपणे ध्यानात सुद्धा येत नाही ? ) ह्या गोंगाटासरशी त्या सभेच्या समक्ष अध्यक्षमहाशयांनी शेवटी आपण मध्येच उठून सांगितले,

' दिगोजीपंत, आता असं करा. तुम्ही ते तुमचं प्रतिवृत्त नि हे तुमचं लिहिलेलं मूळ भाषण दोन्हीही माझ्याकडे धाडून द्या. मी ते ' जगत्स-माचारा 'त समग्र छापतो. मग इथं ते भाषण नुसतं बोलून दाखविण्या-साठीच काय तो हवा कशाला हा गोंधळ ! नाही तरी तुम्ही हे लिहिलेलं भाषणच पाठ केलेलं दिसतं – ! '

' छे, तसंच नाही काही रावसाहेब अगदी ! पण आपण जर ते समग्र छापीतच असाल तर मागितला एक डोळा नि देवाने दिले दोन. असाच उपकार होईल या दीनावर ! ' लगेच अध्यक्षांनी सारी भाषणे रद्द करून दहापाच पारितोषिके तेवढी स्वहस्ते वाटावयाचे ठरविले.

' कुसुम ! ' पहिलेच नाव अध्यक्षांनी घेतले – पहिल्याच क्रमांकाच्या पारितोषिकास योग्य म्हणून !

कुसुमला जरीचा खण मिळताच पहिली टाळी पडली दिगोजीपंतांची. त्यासरशी मुलामुलींनी कळसूत्री बाहुल्याप्रमाणे कडकडाट चालविला. मध्येच काहींना खोकल्याच्या साथीने पछाडल्यासारखे होऊन खोड-साळपणे मोठमोठ्याने खाकरल्यावाचून राहवले नाही. बाकीची पारि-तोषिके वाटून होताच समारंभ संपला. मुले सुटली आणि त्या गावच्या वाटेवाटेने आनंदाचा एकच गलका करीत घरोघर चालली.

शेतातील मेंढवाडा झुंझुरक्याला उघडताच एखादे कोकरू जसे हिर-वळीवर मोकाट बागडू लागते आणि उगीच उंच उड्याच उड्या मारीत जिकडे तिकडे आनंदाने नाचू लागते तशी आपल्या घरच्या अंगणात पाऊल टाकताच कुसुम बागडू लागली. बाहेर गेलेली आई परत येताच तिला, तो पारितोषिक मिळालेला जरीचा खण कधी दाखवीन असे तिला होऊन गेले होते ! आई परत येताना दुरून दिसताच ती धावत सुटली. आई भेटताच तिला तिने मिठी मारली. खण दाखविला. सभेतील काय

काय गमती सांगितल्या, पदे पण म्हणून दाखविली. आईने जो जो तिचे कौतुक करावे तो तो तिचा आनंद गगनात मावेनासा झाला.

त्या दहा वर्षांच्या लेकराला त्या क्षणी काय ठाऊक की, तशा मनमोकळ्या आनंदाचा तिच्या आयुष्यातील तो बहुधा शेवटच्याच क्षण होता ! !

कारण त्याच क्षणी गोपाळभटजी–तिचे वडील–तिथे आले. ते एक उंच, गोरेपान, रूढीलाच शास्त्र समजणारे, भिक्षूकी आणि दूधदही विकण्याचे दोन्ही परस्परविरुद्ध व्यवसाय एकत्रच करणारे, त्या तुटपुंज्या उत्पन्नावर कसाबसा चरितार्थ चालविणारे, बरेच कर्मठ, थोडे तापट नि फार हेकेखोर पुरुष होते. त्यांनी अंगणात पाय टाकताच गंगाबाईला–कुसुमच्या आईला–हडसले–

‘ काय, मनात काय मुलीला नायकीण करायचं आणलं आहेस की काय ! किती मोठ्यानं म्हणते ही कारटी ती पाचकळ पदं ! कुसुम, उद्यापासून तू शाळेत पाऊल टाकता कामा नये ! ’

‘ ते का ? ’ गंगाबाई रागावून यजमानास हटकत्या झाल्या.

‘ का ! कुसुम काय आता सात-आठ वर्षांचं कुक्कूबाळ आहे वाटतं ? दहा वर्षांची लग्नाची मुलगी झाली ती आता ! शाळेत आज कुचाळ लोक तिच्याकडे टकमक पाहात होते, माहीत आहे ! बाराबारा वर्षांच्या घोडनवऱ्या शाळेत नाचविणाऱ्या उल्लूतला मी नाही, समजलीस ? शास्त्रांनी काही उगीच ‘ अष्टवर्षा भवेत् कन्या ’ ही मर्यादा घातली नाही !

बाराबारा वर्षांच्या मुलींना घोडनवऱ्या म्हणणाऱ्या ह्या कर्मनिष्ठ गोपाळ भटजींचे गंगाबाई हे तिसरे कुटुंब होते. पन्नाशीच्या वयात त्यांचे दुसरे कुटुंब वारले. दोन मोठी मुलेही होती. पण तरीदेखील त्यांनी तिसरे लग्न करण्याचे ठरवून एका तेरा वर्षे वयाच्या कुमारीस पाणिग्रहिले. त्याच गंगाबाई. त्याला आता सोळा वर्षे झाली होती. गंगाबाईंची वडील मुलगी चवदा वर्षांची होती. ती रानपाटच्या खोतांना दिली होती. दुसरी कुसुम.

आमच्या या गोष्टीतल्या समाजचित्रांपैकी हे पहिले समाजचित्र ! गोपाळभटजी पासष्टी उलटलेले, त्यांची तिसरी बायको गंगाबाई तिशीच्या

वयाची, आणि तिची ही दुसरी धाकटी मुलगी कुसुम दहा वर्षांची !– ती तिच्या त्या वडिलांच्या शास्त्रमर्यादामते घोडनवरी होत आलेली आहे ! !

गोपाळभटजी आपल्या बायकोला असे फटकारीत असताच अंगणात एक शिपाई येऊन 'तार !' म्हणून ओरडला. 'तार' शब्द ऐकताच ज्यांना नेहमी तारा येतात, त्यांच्या देखील मनाची चलबिचल झाल्यावाचून राहात नाही. फार निकडीची, विशेष आनंदाची वा घोर संकटाची बातमी म्हणजे तार ! त्यातही खेडेगावात गोपाळभटासारख्या बापड्या कुटुंबाला तार येण्याचा प्रसंग जन्मात दोनतीन वेळाच येणार ! स्वतः गोपाळभटांना त्या वेळपावेतो एकच तार आलेली आठवत होती. ती त्यांच्या पन्नाशीनंतर मोठ्या प्रयासाने गंगाबाईशी लग्न जमले तेव्हा ते ठरल्याची होती ! त्यानंतर तार अशी ही दुसरीच काय ती त्यांना आली ! या वेळी लग्नाचा प्रश्नच नव्हता–अर्थात् काहीतरी अरिष्टच असले तर असणार ! ही शंका येऊन थरथरत्या हाताने गोपाळभटजींनी तार घेतली नि शेजारच्या घरी ती वाचून घ्यावयास ते घाईघाईने चालले असता त्याच शंकेने तोंड सुकून गेलेल्या गंगाबाईनी हात जोडून देवास प्रार्थिले,

'इडापिडा टळो नि अमंगळ पळो !'

गंगाबाईची वडील मुलगी रानपाटच्या खोतांना दिली होती. ती आजारी होती ही बातमी आधीच कळली होती. गंगाबाईच्या हृदयात सारखी धडकी भरली–तार तिच्या घरची तर नसेल ना ? तिचेच काही वेडेवाकडे तर– ! तो भयंकर विचार मनाला देखील तिने पुरता उच्चारू दिला नाही. अर्धा उच्चारला म्हणून सुद्धा ती बिचारी मायाळू आई मनावर रागावली–'वैरी चिंती ना ते हे मेलं मन चिंतितं !' गोपाळभटजी डोळ्यांतून टिपे गाळीतच लगोलग परतले. तार त्यांच्या वडील मुलीकडचीच होती ! रानपाटच्या खोतांनी–त्यांच्या जावयांनी–त्या तारेने कळविले होते की,

'त्यांची वडील मुलगी अत्यवस्थ. सासूबाईना नि कुसुमला जेवत असल्या तर हात धुवायलाच इकडे शुश्रूषेसाठी धाडा ?'

'जेवत असले' तर कशाला जेवण्यास सुद्धा न बसता, पाण्याचा घोटदेखील न घेता ताबडतोब गाडी करून कुसुमसह गंगाबाई रानपाटला लगेच निघून गेल्या.

पण त्या तिथे पोचतात तोंच ती त्यांची वडील मुलगी मृत्यूच्या पाशात न सुटेशी अडकत आली होती. आपल्या आईला नि कुसुमला तिने डोळे भरून काही वेळ पाहिले; वाचा बंद म्हणून हात तेवढा कुसुमच्या तोंडावरून फिरवला, त्या दुःखासरशी हंबरडा फोडलेल्या आईच्या मांडीवर आपली लटपटती मान एक वेळ टेकली आणि तिने राम म्हटले !

खोत सुस्वभावी नि समंजस गृहस्थ होते. तरुण पत्नी वारल्याचे त्यांना तीव्र दुःख झाले असताही ते गिळून ते आपल्या सासूबाईंचे नि लहानग्या कुसुमचे समाधान परोपरीने करीत होते. ते घरचे सुखवस्तू; सासरची मंडळी निर्धन; यास्तव अडअडीचणीस त्यांनी आपल्या सासऱ्यास हात-भारही लावलेला होता. कुसुमला तर त्यांच्याच आग्रहाने गोपाळभटजींना शाळेत धाडणे भाग पडले होते. ती आपल्या वडील बहिणीसह खोतांकडे पुष्कळदा राहिलेली होती. असा ह्या दोन कुटुंबांचा जडलेला दाट लोभ नि प्रेमळ नातेही, त्या तरुण पत्नीच्या ज्या साखळीने ते जुळले तीच अचानकपणे दुर्दैवाने तोडून टाकल्यामुळे आता तुटते की काय ही शंकाही त्या तरुणीच्या मरणाइतकीच कुसुमच्या आईबापांना आणि खोतांना मनातल्या मनात व्याकुळवीत होती.

आपल्याच घरच्या माणसासारख्या अगदी जिव्हाळ्याच्या वाटू लाग-लेल्या ह्या आपल्या सासरच्या माणसांची ममता तरी यापुढे अंतरू नये, या सदिच्छेच्या पोटीच पत्नी सुतकाचे दहा दिवस उलटतात न उलटतात तोंच त्यांना वाटले की, कुसुमच्या शिक्षणाचा सारा भार आपण घ्यावयाचे सासूबाईंना आश्वासून तिला इथेच ठेऊन घ्यावे. सासूबाईंनी परत घरी जायचे नाव काढले तेव्हा खोत म्हणाले,

'मला तुम्हीच आईच्या ठिकाणी होतात. ज्या आम्हांस अंतरल्या त्या अंतरल्याच; तिथं त्यांचा आमचा उपाय खुंटला. पण आपण जी मायेची माणसं उरलो आहोत त्यांनी तरी एकमेकांना अंतर देऊ नये.

यापुढेही मला आपण आईच्याच ठिकाणी असावं. आपण जाऊ म्हणता ते ठीकच. गोपाळभटजी काही झालं तरी इकडं येऊन राहाणार नाहीत. त्यांच्यासाठी आपणालाही तिकडं जाणं भाग; पण हे लेकरू आहे ते तरी मायेचं माणूस म्हणून, आपल्या कुटुंबातील ममतेची साखळी म्हणून मजजवळ ठेवावं. सैंपाकी, गडी घरी आहेतच तिच्या सेवेला, तिचं शिक्षण, लालनपालन मी तिच्या वडिलाइतक्याच ममतेनं करीन.'

'क्वचित् अधिक ममतेनसुद्धा कराल: बरं ते सगळं झालं तर तिचं शिक्षण होईल इकडंच पण सध्या मी तिला नेते आणि मग वडिलांचा विचार घेऊन लवकरच धाडून देते परत!' सासूचे हे बोलणेच योग्य असे समजून खोतांनीही त्यास अनुमती दिली.

गंगाबाईंनी घरी परत येताच वेळप्रसंग पाहून गोपाळभटजींपुढे ती गोष्ट काढली. खोतांशी जुळलेला नात्याचा संबंध नि त्यांचे पाठबळ तुटू नये ही भटजींचीही उत्कट इच्छा होतीच. कुसुमच्या शिक्षणाची नसली तरी लग्नाची चिंता त्यांना आधीच लागलेली! तिला बारा वर्षांची घोडनवरी करून कुळास बट्टा लावायचा नाही हा त्यांचा निर्धार! त्या मनःस्थितीत खोतांचा हा बेत ऐकताच गोपाळभटजींच्या मनात अचानक एक योजना जुळून आली.

बहिणीवर खोतांनाच कुसुम देऊन टाकली तर? सगळेच मनासारखे जुळणार! शास्त्रमर्यादेचा प्रश्नच नव्हता. चालू शिष्टाचारास ते अगदी धरून होते. 'असं ममतेचं, बिनहुंड्याचं, कुसुमला तरी कुठं पाहाणार आम्ही! मुलीचं भाग्यच म्हणायचं हे सगळं जुळलं तर!'

गंगाबाईंनाही तो बेत अगदी आवडला. कुसुमच्या आवडी-निवडीचा प्रश्नच नव्हता. लग्न म्हणताच तिला भीती वाटली; पण ती कसली, हे त्या दहा वर्षांच्या मुलीस स्वतःही कळेना आणि कोणी विचारीही ना!

गोपाळभटजींनी अगदी स्पष्ट नि आर्जवी शब्दांत ती योजना खोतांना कळवली. कुसुमसारखी देखणी मुलगी, लोभाची आधीचीच, धुंडता सापडावयाची नाही कोणा बिजवराला! खोतांनी काहीएक आढेवेढे न घेता कुसुमशी लग्न करण्याचे वचन दिले. पण आणखी दीडएक वर्ष तरी मध्ये जाऊ द्यावे नि तोवर कुसुमने खोतांकडेच राहावे, इतके काय ते सुचविले.

'लग्नाची मुलगी लग्नावाचून परक्या घरी अशी ठेवणे हे आपणास रुचणार नाही; दहा लोक हसतील, तेव्हा कुसुमचे लग्न करायचे तर ते लगेच करावे हे उत्तम. इतकेच नव्हे, तर पुढे चातुर्मास, मुहूर्त नाहीत, म्हणून अगदी याच महिन्यात ते मंगलकार्य उरकल्यास ठीक. टिपण जुळते आहे–' असे, जरा निर्वाणीचा झोक असलेले उत्तर गोपाळभटजींनी धाडले. त्यांना धास्ती होती की, दिवसगत लागल्यास न जाणो खोतांना दुसरे एखादे हुंड्याचे ठिकाण देखील येईल, त्यांचे मन बदलेल! कुसुमच्या तोंडचा घास काढून घेण्यास टपलेल्या बारा वर्षांच्या 'घोडनवऱ्या' घरोघर त्यांना आढळत होत्याच! या शंकेमुळे मुलीचे कल्याण व्हावे या सदिच्छेनेच गोपाळभटजींनी लग्नाची घाई चालविली. त्यांचा हा बेत त्यांच्या कक्षेतील भटभिक्षुक-शास्त्री मंडळींनी शास्त्रोक्त आणि शिष्टांनी शिष्टसंमत ठरविलेलाच होता. काही बायाबापड्या 'इश्श ऽऽ' म्हणत. कुटाळ लोकशीळ देत, पण शास्त्राची, टिपणांची वा शिष्टाचाराची अशी काही अडचण नव्हती.

खोतांच्या कक्षेतील भट-भिक्षुक-आप्तेष्टांनीही त्या योजनेस शास्त्रोक्त नि शिष्टाचारास धरूनच आहे, अशा प्राप्तकार्यांचा निर्वाह असा अनेक वेळा करावाच लागतो, बहिणीवर मेहुण्याला बहीण देतातच असा अभिप्राय दिला. खोतांनीही बेत पसंतिला, लग्न जुळले, मुहूर्त ठरला, भट-भिक्षुक-आप्तेष्ट निःसंकोचपणे मिळाले. सर्व सोहाळे यथाशास्त्र, यथासांग होऊन अकरा वर्षांच्या आत असलेल्या त्या मुलीचे–कुसुमचे, लग्न त्या तिच्या वडील बहिणीच्या विधुर झालेल्या प्रौढ नवऱ्याशी, त्या वडील बहिणीस मरून एक वर्ष उलटते न उलटते तोच, वाद्यांच्या आनंदी गजरात यथाशास्त्र लावले गेले – खोतांनी नवा संसार थाटला!

जो तो मनापासून म्हणाला, मुलीचे चांगले झाले. त्यात कोणाचीही इच्छा तिचे अनहित करावयाची नव्हती हेही खरेच. एक पत्नी अकाली मानवी उपायांना न जुमानता मृत्यूने ओढून नेली, त्यास काय उपाय? पण मेल्यागेल्यासाठी खोतांसारख्या वयात असलेल्या पुरुषाचा सारा संसार थोडाच बुडू द्यावयाचा! जगाची रहाटी पाहून एक डाव उधळला तर पुन्हा दुसरा नीटनेटका मांडणेच भाग, असा त्यांनी जो

विचार केला तो युक्तिसंगत नव्हताच असे कसे म्हणायचे? हेच साऱ्यांचे मत पडले.

— आणि कुसुम? तिला मत असे जवळजवळ नव्हतेच! आवडले नाही खरे ते सारे. वरवर चांगले झाले म्हणून म्हणणाऱ्या आयाबायांपैकी काही मागेमागे तिची टिंगलही करताना ती ओशाळेसुद्धा केव्हा केव्हा; पण चांगलेवाईट काय बोलायचे ते तिला नक्की कळेना! जे कळे ते बोलावयास तिला कुणी सांगेना, पुसेही ना.

या गोष्टीतील हे दुसरे समाजचित्र पाहा! आपली पहिली तरुणपत्नी वारताच एका वर्षाच्या आतबाहेर तिचीच धाकटी दहा वर्षांची जी बहीण तिच्याशीच लग्न लावणारे तिशीपस्तिशीचे बिजवर खोत! पन्नाशी-नंतर लावलेल्या आपल्या तिसऱ्या विवाहापासून झालेल्या त्या दहा वर्षांच्या मुलीचे तिच्या वडील बहिणीच्याच नवऱ्यास तसे कन्यादान करणारे शास्त्रमर्यादाभिमानी गोपाळभटजी! आणि त्या सासऱ्या-जावयाच्या तिसऱ्या दुसऱ्या विवाहाप्रमाणेच त्या दहा वर्षांच्या अल्लड मुलीच्या विवाहासही शास्त्रोक्त नि शिष्टाचार संमत मानून तो यथासांग स्वतः पार पाडणारा भट-भिक्षुक-आप्तेष्ट-शिष्टादिकांचा समाज!

त्यातही हे समाजचित्र अवघ्या नऊ-दहा वर्षांपूर्वीचे-अगदी ताजे!

लग्न लागल्यानंतर लगेच कुसुमला खोतांकडे पोचविण्यात आले. त्यांनी तिला शक्य त्या त्या उपायांनी सुखात ठेवण्याचा यत्न केला. लग्न झाल्यामुळे शाळेत धाडण्याचा प्रश्नच नव्हता! पण कुसुमला खोतांनी घरी स्वतः मासिके, कादंबऱ्या, नाटके वाचण्याचा नि ऐकण्याचा नाद लावला. कुसुम बुद्धीची कुशाग्र, देहाने उफाड्याची नि स्वभावाने तरतरीत मुलगी होती. हळूहळू तिचे मनही सासरी रमू लागले; तिचे असे स्वतंत्र बौद्धिक विचार बनू लागले; काय हवे काय नको कळू लागले, कामुक भाव जागू लागले, रुजू लागले. घरच्या संसारातीलच नव्हेत तर सार्वजनिक उठा-ठेवीही कराव्याशा वाटू लागल्या. एकंदरीत खोतांशी झालेल्या विवाहा-मुळे तिचा संसार सुखातच जाईल असा रंग दिसू लागला. गोपाळभटजींना आणि गंगाबाईंना आपल्या मुलीचे कल्याण झालेले पाहून जी कृतकृत्यता

वाटे तिला तर पारावारच नव्हता.

कुसुमच्या लग्नाला आता वर्ष दीडवर्ष होऊन गेले होते. गंगाबाईंनी पाहिले की, गोपाळभटजी आज बरेच रंगात दिसताहेत. पहाटेच स्नानसंध्या आटोपून गाईम्हशीचे दूध काढून त्या चरव्या गड्यापाशी सोपवून ते सांगत होते—अमक्याला इतके उकाड्याचे घाल, तमक्याकडून दुधाचे पैसे येणे ते आण. दूध विकायला गडी जाताच भिक्षुकीसाठी बाहेर जाण्याच्या आधी ते एक स्तोत्र म्हणत गंगाबाईकडे आले नि सहजी जिज्ञासले,

'काय, तुझ्या लाडक्या मुलीचं गुप्त पत्र आलं की काय एखादं—मला न सांगण्यासारखी आनंदाची बातमी सांगणारं? इतकी गालातल्या गालात हसतशी आहेस ती?'

'आता अशी आनंदाची बातमी सांगणारं पत्र यायचं म्हणजे तुमच्या कुसुमच्या गर्भदानाचं! यायचंच आता तेही आज ना उद्या. कडोसरीला दोन पैसे लावून ठेवायचे बरं का! या पाळीला मुलीचं ते मंगलकार्य तरी अगदी श्रीमंती हौशीचं झालं पाहिजे अं!' गंगाबाई उल्हासल्या.

तोच अंगणातून आवाज आला 'तार! गोपाळभटजी, तुमची तार!!'

जळता निखारा पायावर पडावा तसा तो भयंकर शब्द त्या बिचाऱ्या नवराबायकोच्या कानावर पडला!

'तार!' गोपाळभटजींच्या जन्मातली ती तिसरी तार! मागची तार त्यांची वडील मुलगी अत्यवस्थ असल्याची होती. ही तार त्यांचा जावई—कुसुमचा नवरा अत्यवस्थ असल्याची होती!

गंगाबाई तर तिथल्या तिथेच खचून खाली बसली. गोपाळभटजी तिला कसेबसे उठवून गाडी करून स्वत:बरोबर घेऊन कुसुमच्या सासरी ताबडतोब निघाले. तिथे पोचतात तोच घरातून रडारडीचा एकच आक्रोश त्यांच्या कानावर आला. कुसुमचा नवरा वाखा होऊन तडकाफडकी वारला!

बारा वर्षांची कुसुम बालविधवा झाली! हे तिसरे समाजचित्र पाहा! वाचक ही समाजाची चित्रे नव्हेतच, छायाचित्रे आहेत ती! अगदी यथावत्!

कुसुम मानवी शास्त्राधारे बालविधवा झाली; पण निसर्गाचे शास्त्र मानवी शास्त्राधाराला थोडेच भीक घालणार ! दिवसेंदिवस यौवन तिच्या अंगात बहरू लागले. भोगेच्छा सळसळू लागल्या; पण सासरहून तिला गोपाळभटजींनी माहेरी आणून जी कोंबली ती पुन्हा काही अंगणाबाहेर जाऊ दिली नाही. तिच्या नात्यागोत्यांच्या घरी लग्नकार्ये, गौरी-गणपती होत. तिची वयातीत आई समारंभांना, मिरवणुकींना, हळदी-कुंकवाला जाई; पण ती सोळा सतराची, भर हौशीच्या वयाची नि मूळच्या खेळकर स्वभावाची कुसुम एखाद्या घातक अपराध्यासारखी घरातच डांबून ठेवलेली राही. ती गोरी असताना नि तिचा काही एक अपराध घडला नसताही तिच्या तोंडाला कसली काय काळोखी फासली गेली ! समाजात तिला एखाद्या अशुभासारखी, चोरासारखी, तोंड लपवून जगण्याची पाळी आली. एकदा तर टाळूपर्यंत भांग पाडलेल्या गावसासूने तिच्या तोंडावर तिच्या भरदार केसांकडे बोट दाखवून नाक मुरडले नि घोगऱ्या ठसक्याच्या आवाजात म्हणाली,

'लाज नाही का ग वाटत कुसुम तुला या केसांच्या नट्टयापट्टयाची ! गोपाळभटजी तर लाज कोळूनच प्यायले म्हणा ! नाहीतर विधवेच्या हाती फणी पाहावली तरी कशी त्यांना !' पण गोपाळभटजींनी शेवटपर्यंत तेवढी दया केली होती.

आताशी घरोघर तोच प्रकार आहे. 'शास्त्रात् रूढिर्बलीयसी !' कलियुगच आहे हे.' असे म्हणून त्यांनी कुसुमच्या केसांकडे तेवढा कानाडोळा केला होता. कोणच्या शास्त्राधारे ?– तर समाजात आताशी तसे पुष्कळ लोक करतात ह्या ! तेवढ्यासाठी आताशी भटांवर कुणी बहिष्कार घालीत नाहीत ह्या !

पण यौवन सरसर अंगी भरभराटत चाललेल्या त्या तरुणीच्या साऱ्या भावना एका वेणीफणीच्या पेटीत थोड्याच मावणाऱ्या होत्या ! हिची वेणीफणीची पेटी तेवढी जरी कुणी हिसकून घेतली नव्हती तरी त्या बालविधवेची अंतःकरणाचीच पेटी जप्त झाली होती, मोहोरबंद केलेली होती; मन मनातच गाडून टाकले होते. त्यातल्या त्यात सोबत अशी पुस्तकांची तेवढी उरलेली होती – तीही तिच्या आईच्या सवलतीने.

खोतांकडे सासरी असता मासिके, कविता, गोष्टी वाचण्याचा तिला छंद लागला होता. तोच वाढत जाऊन तिने आता वाचनच वाचन चालविले. संस्कृतचे श्लोकही भाषांतराच्या साह्याने ती वाचू लागली. मराठी भाषांतराच्या आधारे अर्थ करून वाचता वाचता मेघदूत तिला इतके आवडले की, तिने ते सरस संस्कृत काव्य तोंडपाठ केले; ते म्हणत असता आकाशातील त्या मेघासारखा तिच्या नयनांतही अश्रूंचा एक मेघ येऊन ज्याला नाव ना गाव अशा तिच्या कोण्या प्रियकराचे तेच व्याकूळ संदेश तिलाही देऊ लागे !

एक दिवस, त्यांच्या एका दूरच्या नात्याची जी तिच्याचसारखी बालविधवा मुलगी पुण्याकडे असे, ती शिकून मोठी होताच तिचा पुनर्विवाह थाटाने पुण्यास लागल्याचे वृत्त एका मासिकाच्या ताज्या अंकात तिने वाचले. ती बातमी तिने धावत जाऊन गंगाबाईंना सांगितली— त्यांनी लगेच गोपाळभटजींना ! त्यासरशी त्यांनी पुनर्विवाह करणाऱ्या त्या मुलीला ज्या शिव्या हासडल्या त्या विचारूच नयेत !

'माझी मुलगी अशी कुलटा निघेल तर मी तिचा तरी जीव घेईन नाहीतर माझा तरी देईन !' हा त्यांचा संतापलेला समारोप तर इतका कडकडीत होता की, कुसुम एका कोपऱ्यात जाऊन थरथरत रडू लागली. गोपाळभटजींनी तिच्या खोलीतली सारी मासिके बिसिके उचलून नेली; आणि आजकालचा बाष्कळ 'छापा' पुन्हा घरात दिसता कामा नये अशी सक्त आज्ञा सोडली. कुसुमची ती एकच एक मनमोकळी सोबतही नाहीशी झाली ! सकाळ-संध्याकाळ गाईम्हशींची दूधदुभती काढणे, दुपारी त्यांचेच पाणीवैरण पाहाणे, हा तेवढा तिचा कार्यक्रम वर्षानुवर्ष चालला !

'या गाईम्हशीप्रमाणे मीही एक गोठ्यातले गुरूच नाही का ?' तिने चिडून स्वतःशीच म्हणावे, तिची आजकालची पुस्तके बंद झाली; पण तिच्या आईने पांडवप्रताप, हरिविजय तिला वाचायला द्यावे. पण त्यात तरी काय ? रुक्मिणीहरण, सुभद्राहरण, रामलीला, कुंती नि कर्ण, शंतनु नि गंगा ! तिच्या आईने नित्य म्हणावी, ती गवळिणींची रसभरित प्रेमगीते, उषाहरणाचे 'पुण्यपावन' गाणे ! मासिक, पुस्तकांतील गोष्टींपेक्षाही या पूज्य देवदेवींच्या नि राजर्षी ब्रह्मर्षींच्या सेवनाने पवित्रतरच

वाटू लागलेल्या कामवासना तिच्या अंतःकरणातून अधिकच सळसळू लागल्या. तिच्याबरोबर एकदोघी मैत्रिणी आपल्या पहिल्या छबुकड्या लेकराचा चिमुकला हात हातात खेळवीत जेव्हा त्याला पाजीत बसताना ती पाही, तेव्हा कुसुमला वाटे, आपणही झप्‌किनी त्या गोंडस तान्ह्याला घेऊन छातीशी तसेच पाजावे. पण ह्या कोणत्याही उत्कट वासनांचा उच्चार म्हणून तिला उघडपणे करण्याचे लवलेश धैर्य नव्हते. उलट त्या लपविण्यासाठी ती वरवर त्यांचा तिटकारा दाखवी.

रमणीचे जीवन म्हणजेच रती आणि वत्सलता ! ह्या दोन्ही जीवन-प्रवृत्तीच तिच्या जीवनातून वजा झालेल्या, वर्ज्य झालेल्या ! तिचे जीवन तिला असह्य झाले. आणि ते अगदी सुसह्य आहे असे आईबापांना धाकाने, त्यांना मुलगी बिघडली असे न वाटावे म्हणून, वरवर दाखविणे तर तिला भाग. त्यामुळे तिचा स्वभाव लपंडाव–निष्णात होऊ लागला. दहा बाया जमल्या की, गावातील वा जगातील स्त्रीपुरुषांच्या बऱ्यावाईट उठाठेवी हटकून करायच्या; तशा गोष्टी निघताच कुसुमने, ‘ इश्य ऽ ऽ ! मला नाही बाई अशा पाचकळ गोष्टी आवडत ’ असे म्हणत फणकारून तिथून उठून जावे; पण आडोशाला उभे राहून शक्य तोवर त्या गोष्टी आवडीने ऐकाव्या. अशा परिस्थितीतील अनेक तरुण कुमारिकांचा नि बालविधवांचा स्वभाव समाजभीतीमुळे इतका मिथ्याचारी बनतो की, असल्या ज्या विषयांचा त्या तिटकारा दाखवितात त्या त्यांना नक्की हव्याशा असतात असे समजावे. ‘ हे मुळीच आवडत नाही मला अं ! ’ असे त्यांचे फणकाऱ्याचे वाक्य ‘ हे मला फार आवडते अं ! ’ याच अर्थी बहुधा योजलेले असते !

मनातल्या मनात ती बिचारी बालविधवा कुसुम अशी कुढता कुढता तिला अठरावे वर्ष उलटत आले ! गोपाळभटजींनी पन्नासाव्या वर्षी ज्या कारणाकरिता तिसरे लग्न केले; त्यांच्या बिजवर जावयाचा संसार पुन्हा थाटणे योग्य वाटून वडील मुलीच्या मृत्यूनंतर एकाच वर्षाच्या आत-बाहेर, ज्या कारणाकरिता आपली दुसरी दहा वर्षांची मुलगी त्या खोतांना देणे त्यांना माणुसकीचे, शिष्टाचाराचे नि शास्त्रसंमत वाटले, त्यांपैकी कोणत्याही कारणासाठी या यौवनाने मुसमुसत राहिलेल्या आणि

आता अतृप्ततेने झुरणीस लागलेल्या आणि बाराव्या वर्षी बालविधवा झालेल्या मुलीचा पुनर्विवाह करणे किंवा तिला नुसते मनमोकळे अंगणाबाहेर जाऊ देणेसुद्धा माणुसकीचे वाटले नाही !

होय, शेवटी कुसुम झुरणीसच लागली. अतृप्त वासनांच्या मानसिक कळा तिला सोसवेचनात ! त्यायोगे तिची क्षीणता वाढत वाढत तिला चोरटा ताप येऊ लागला. तिने अंथरुण धरले. आई तळमळे, पण ती औषधपाणी काय करणार ? पैशाचे पाठबळ नाही आणि तितकी चिंताही नाही. म्हणून डॉक्टर पाहण्याचे नाव गोपाळभटजी कसले काढणार ? गंगाबाई हे जाणूनच होत्या. पण तरीही त्या माउलीने एक युक्ती योजून कुसुमचा जो एक मावसभाऊ चांगला डॉक्टर झाला होता, त्याला घरीच काही दिवस राहावयास बोलावून विनामूल्य कुसुमची प्रकृती परीक्षून घ्यावी असा घाट घातला नि मोठ्या मिनतवारीने त्यास यजमानांची अनुज्ञा मिळविली.

कुसुमचे मावसभाऊ डॉ. गोविंदराव पत्र पावताच आले. कुसुमची प्रकृती परीक्षिताच त्यांनी ताडले की, दुखणे मानसिक—हृद्रोग काय तो ! गोपाळभटांच्या मागे गंगाबाईंनी गोविंदरावांशी मनमोकळेपणे बोलण्याबसण्याची सवलत कुसुमला देत असावे. दोनचार दिवसांतच गोविंदरावांनी तिच्या मनाची सारी व्यथा युक्तिप्रयुक्तीने तिला हसवून खेळवून समजावून घेतली. त्या हसण्याखेळण्याचा तिच्या प्रकृतीवर तत्काल इतका चांगला परिणाम झाला की, ती दुसरीच कोणी ताजीतवानी कुसुम दिसू लागली. डॉ. गोविंदरावांनाही तिचे वाचन, बहुश्रुतता नि बुद्धी पाहून कौतुक वाटे. त्यांनी तिला तिच्या मानसिक व्यथेचे मूळ स्पष्टपणे समजावून दिले आणि आशाच काही बालविधवांनी धीटपणे स्वतंत्र होऊन आपले शिक्षण वा पुनर्विवाह करून सुखाचे संसार कसे थाटले त्याची उदाहरणे सांगितली. शेवटी तिला आश्वासिले—

‘ तुझी इच्छा असल्यास मी तुझ्या शिक्षणाचा भार उचलीन. म्हणशील तर तुझा कुठलातरी चांगल्या स्थळी पुनर्विवाहही लावून देता येईल. तुझ्यासारख्या सुबुद्ध, सच्छील, सुरेख नि निकोप तरुणीच्या उदरी दोनतीन देवदूतांसारखी बाळं उपजून तुझ्या कुसव्याला आणि आपल्या

राष्ट्राला धन्यवितीलही क्वचित् ! उगीच का झुरावं ! मग काढू का हा विषय स्पष्टपणे तुझ्या वडिलांपाशी ? '

' नको नको ! ' हात जोडून कुसुम म्हणाली, ' ते माझा तरी जीव घेतील नाहीतर त्यांचा तरी देतील ! '

' छट् ! तसलं काही एक होणार नाही, मी समज घालीन, तशी त्यांनी कधी अनुज्ञा जरी दिली नाही, तरी तू स्वतंत्रपणे शिक्षण केलंसच तर भलतीच आडकाठी पण घालणार नाहीत. तुला तर त्यात काहीएक पाप किंवा वावगं वाटत नाही ना ? '

' मुळीच नाही. पण त्यांना सांगू नकोस. म्हणशील तर मी तुझ्या-बरोबर गुपचुप निघून येते. नेशील का मला ? सोडीव रे मला एकदाची ! माझं जीवन अगदी नीरस झालं आहे ! त्या मेल्या गाईम्हशी नि मी ! गेली सहा वर्षं मी ह्या अंगणाबाहेर पडले नाही बरं ! आणखी सांगू का रे ?—मला कनी कोणाला तरी कडकडून भेटावंसं वाटतं. कोणीतरी मला घ्यावं आणि— ! गोविंदा, तू खरंच का उद्या जाणार ? नको रे मला सोडूस ! ' असे हृदय हलवून सोडणाऱ्या केविलवाण्या शब्दांत बोलता-बोलताच तिने गोविंदरावांच्या गळयास घट्ट मिठी मारली. मनाचे सारे बांध फुटून, सारे भान सुटून त्याचे मटामट मुके घेतले आणि त्यांना घेऊन आपल्या खाटेवर महापुरात लतामंडप उन्मळून पडावा तशीच ती पडली.

हतक्यात मागे दार करकरले गंगाबाई उभ्या असाव्यातसे तिला वाटले —आणि तिच्या मनाने भयंकर उचल खाल्ली ! तिने गोविंदरावांना दूर ढकलले. आईने ते पाहिले असल्यास आपल्यावर एका अक्षराचाही बोल येऊ नये म्हणून ती ताडकन् तशीच आईकडे गेली नि रागाने रडे लागून स्फुंदली—

' आओ, गोविंदा वाईट मनुष्य आहे ? मला सहज पाठमोरी पाह-ताच त्याने घट्ट मिठी मारली आणि—किती दुष्ट असतात हे पुरुष ! ! '

तोंड हातात झाकून ती हुंदके देऊ लागली ! तिच्या आईला ती इतकं खोटं बोलेल हे शक्यच वाटेना !

' गोविंदाला म्हणावं, तू आता घराबाहेर जा ! मी त्याचं पुन्हा तोंड

पाहाणार नाही? बाबा येण्याच्या आधी जा म्हणावं!

कुसुमने कपटी कोपाची पराकाष्ठा केली!–आणि तीं किती सहज साधली तिला!—किंबहुना त्या वेळेपुरते तेच तिचे सगळे मन होते, दुटप्पी कपटाला लागते तसे तिचे दुसरे मन म्हणून जे होते ते त्या भीतीच्या धक्क्याने तेवढ्यापुरते तरी चक्काचूर होऊन गेले होते!!

आपल्यावर कुसुमने रचलेले हे अत्यंत खोटे नि खोडसाळ कुभांड गोविंदरावांना स्पष्टपणे ऐकू आले. ते मनात म्हणाले,

'अरेरे! ह्याच भ्याड मिथ्याचारापायी स्त्रियांची जगात जी होते आहे ती पायमल्ली झाली! स्त्रियांच्या पायांतील बेड्या तोडण्यास येणाऱ्या पुरुषाला पहिली शिवी जर कोणी हासडीत असेल तर ती बहुधा स्त्रीच होय! स्त्रीस्वातंत्र्याचा खरा शत्रू आज तरी स्वतः स्त्री हीच आहे! पण—स्त्रियांचा भ्याड मिथ्याचारसुद्धा पुरुषी समाजाच्या धाकदपटशाहीचीच पडछाया आहे हेही खोटे नाही! कुसुमचा तरी काय दोष! आता जर मी असाच जाऊन खरे ते सांगेन तर ह्या बिचाऱ्या कुसुमचा सत्यानाश होईल! मला ते ओझे झेपेल म्हणूनच तिने हे कुंभाड मजवर लादले आहे, नाही का? आपण तिच्या आईच्या दृष्टीने दुष्ट ठरलो तरी चालेल—पण ह्या अनाथ मुलीला आणखी दुःखभोग घडवू नये हेच कर्तव्य!'

असा विचार तो थोर मनाचा डॉक्टर करीत आहे तोच त्याची मावशी गंगाबाई तिथे आली.

'गोविंदा, झालं ते झालं! मुलीसाठी मी तुझ्या ह्या दुर्वर्तनाचा सुद्धा गाजावाजा करीत नाही. तिकडं देखील सांगणार नाही. पण तू आताच्या आता येथून जावं हे बरं!'

डॉक्टर गोविंदराव पाणीसुद्धा न पिता त्या घरातून पुढच्या दारातून खरोखरच बाहेर पडतो आहे हे कुसुमला दिसताच आपल्या देहातून आपला जीवच बाहेर पडतो आहे अशा तीव्र वेदनेची तिच्या हृदयात कळ आली.

'गोविंदा! नको! नको जाऊस रे मला सोडून? अरे मला पण ने नं! गोविंदा, ए गोविंदा!!!' अशी अगदी किंकाळ्याच फोडीत ती

जी धावली ती त्या उन्मादाच्या झटक्यात पुढच्या दाराच्या उंबरठ्याची ठेच लागून धाडकन् अस्ताव्यस्त पडली !

ह्या गोष्टीतील हेच ते शेवटचे समाजचित्र ! अगदी ताजे—अगदी गेल्या वर्षीचे ! ! !

— १९३६

* * *

## २. गोविंदा गवळी

गोविंदा गवळी पूर्वी मुंबईस गिरणीत काम करीत असे. पुढे उतरत्या वयात काम होईनासे झाले, शक्ती घटत नि ऋण चढत चालले, तेव्हा एक दिवस स्वारी सहकुटुंब गुपचूप निघून, बेपत्ता होऊन कोकणात समुद्रकाठी असलेल्या आपल्या मूळच्या गावच्या मूळच्या झोपडीवजा कंबळी घरात येऊन राहू लागली.

मुंबईहून त्या झोपडीवजा घरात परत येताना त्याने मुंबईची मिळकत अशी जी एकच गोष्ट आणली, ती लॉटरीचा नाद!

मनुष्यांनी चालविलेल्या लॉटरीची तिकिटे त्याने अनेकवार घेतली होती; पण त्यात त्यास अजून केव्हाही यश म्हणून आले नव्हते. तथापी लॉटरीचा निकाल म्हणून जो प्रसिद्ध होई त्यात कोणास तरी पाच हजार रुपये मिळाले म्हणून 'छापून' येईच. त्या कोणाचा गोविंदाला जरी पत्ता नसे, तरी 'छापात' येईल ते खोटेही असू शकते अशी त्याला स्वप्नातही शंका येत नसे. जुन्या शास्त्रीपुराणिकांचा, अमुक गोष्ट अगदी खरी असलीच पाहिजे हे सिद्ध करण्याचा अमोघ पुरावा म्हणजे 'पोथीत' तसे आहे हा; तसाच कोणच्याही गोष्टीच्या अशंकनीय खरेपणाचा खेडवळ लोकांचा पुरावा म्हणजे 'छापात' तसे आले आहे हाच. त्यामुळे अमक्याला पाच हजार मिळाले असे 'छापात' वाचलेले ऐकताच गोविंदा त्या अमक्याच्या मुद्रेची कल्पना करीत आपल्या खोलीत पडे नि ही पाच हजारांची रक्कम अचानक त्या अमक्याच्या हाती पडताच त्याची मुद्रा कशी 'दारू प्याल्यावानी' तर्रर्र झाली असेल, तो गिरणीकामास लाथ मारून 'गिरणीच्या शेटावाणी' लगेच गाडीघोडा उठवीत, साऱ्या मुंबईत हिंडत, बोलपट, नाटक, तमाशा पाहाण्यात कसा चूर झाला असेल, त्याचे चित्र, आपल्या तशा संभवनीय अनुभवाचे, भडक रंगात चितारू लागे. लगेच त्याचा निश्चय होई, 'शहाणे म्हणतात तेच खरे! गोंद्या, चल, फिरून यत्न करून पाहा!' त्यासरशी शहाणा होऊन तो पुन्हा कोणाच्या

तरी दुसऱ्या सोडतीचे रुपया आठ आण्यांचे तिकीट घेऊन त्या पाच हजार रुपयांच्या त्याच्या हातात अचानक पडणाऱ्या रकमेची नि छापात अचानक झळकणाऱ्या त्याच्या ' गोविंदा गवळी ' या नावाची वाट पाहात आशेच्या आनंदाची निशा भोगू लागे.

त्याने मुंबईहून आल्यावरही कोकणातल्या त्या गावी बसून स्वतः उपास-तापास काढीत वाचविलेल्या रुपया आठ आण्यांत दोनतीनदा लॉटरीची तिकिटे काढली होती. त्याला जर कोणी म्हटले की, ' अरे, तुला पोटापाण्याची टंचाई कोण ? तेव्हा कुठला तरी धंदा करावयाचा का कडोसरीस नसला तरी पोट मारून रुपया काढायचा नि सोडतीत दवडायचा ! ' तर तो मनाशी म्हणे की, धंदा करावयाचा तर त्याला हवे ते भांडवल कुठून आणू ! ही एक म्हैस मी घेतली तर पाचपन्नास रुपये खाऊन बसली. तिचे दूध विकून दहापाच रुपये जेमतेम पदरी बांधता येतात, येतील; पण या जन्मात तरी तिच्यावर पाच हजारांची रक्कम गाठीस बांधता येईल का ? ज्यांच्यापाशी लाखो रुपये आहेत त्यांनी तर लॉटरीत दहापाच रुपये फेकावेच. कारण त्यांना ते बुडाले तरी दहापाच रुपयांची क्षितीच वाटत नसते. पण ज्यांच्यापाशी धंद्याला म्हणून भांडवलच नाही त्या दरिद्री बापड्यांनी देखील ह्या लॉटरीच्या धंद्यातच काय ते आपले एका अर्ध्या रुपयाचे असले नसले भांडवल टाकणे हा शहाणपणा आहे. कारण एका रुपयाच्या भांडवलावर आज नाही उद्या एकदम एकगाठी दहापाच हजार रुपये व्याज अचानक मिळवून देणारा धंदा ह्या जगात जर कोणता असला, तर हा लॉटरीचाच काय तो आहे ! त्या अमक्याला नाही का मिळाली अशी रक्कम नि त्या तमक्याला सुद्धा ! ' छापात ' काय खोटं छापतात वाटतं कधी ! ! ज्याच्यापाशी फार फार तर रुपयाचं काय ते भांडवल असू शकते त्यास लाभकारक धंदा असा एकच—लॉटरी !

असे विवंचून त्याने पुन्हा लॉटरीचे तिकीट काढावे. असे कितीदा तरी झाले; पण काही केल्या त्याला मनुष्याने काढलेल्या लॉटरीत पारितोषिक म्हणून मिळेना. तेव्हा त्याने या पाळीला ज्या मनुष्याने काढलेल्या लॉटरीचे तिकीट घेतले त्याला यशाची निश्चिती लाभावी म्हणून

देवाच्या नावे पुरातन काळापासून चालत आलेल्या सुप्रतिष्ठित अशा दैवी लॉटरीचेही दुसरे तिकीट काढले. त्याने नवस केला–की, जर या वेळच्या या मानवी लॉटरीच्या तिकिटाचा त्याच्या नावाचा क्रमांक यशस्वी होऊन त्याला काही तरी पारितोषिक मिळाले तर 'देवा मोरया, तुझ्या नावे एकवीस ब्राह्मण जेवू घालीन, मोदक वाढीन, संकष्टी चतुर्थीचे व्रतही करीन!'

नवस ही एक देवाच्या नावे चाललेली दैवी लॉटरीच नाही काय? मानवी लॉटरीत शेकडो वेळा फसगत होते; पण केव्हातरी लागोभागो तीन टोले होऊन दहा हजारात एखाद्याला एखादे पारितोषिक मिळून जाते. नवसाचेही तसेच आहे. शेकडो वेळा नवस खोटे ठरतात. जो जो मनुष्य आजारी पडतो त्याच्या बरे होण्यासाठी बहुधा दहापाच नवस होतच असतात! पण लाखांनी माणसे मरतच असतात! तितके लाखो नवस खोटे पडतातच की नाही? लहान माणसांचे कोंबडी–बकरी कापण्याचे नवसच नव्हेत, तर मोठमोठ्या राजे-महाराजांच्या प्राणांतिक दुखण्यांच्या महादानांचे नवसही लटके पडतात. पहिले माधवराव पेशवे क्षयाने मरणी टेकले तेव्हा गोपिकाबाईंनी साऱ्या महाराष्ट्र राज्यभर ठिकठिकाणी हजारो ब्राह्मण बसवून देवळोदेवळी अधिकाऱ्यांच्या सक्त देखरेखीखाली मृत्युंजय मंत्राचा कोटी जप करविला. पण ती कोटीची संख्या पुरी झाल्याची बातमी येते तोच माधवराव पेशवे मरायचे ते मेलेच! तो नवस व्यर्थ गेला! पानपतची लढाई जिंकली गेली तर लाखो रुपयांच्या धर्मादायाचे नवस मोठमोठ्या जागृत देवदेवतांना पेशव्यांनी केले होते. पण ते सारे विफल होऊन पानपती महाराष्ट्राची दोन लाख बांगडी फुटली! पण हे लटके पडलेले लाखो नवस आपण विसरून जातो – आणि मुलगा व्हावा म्हणून जिजाबाईने केलेला भवानीचा नवस योगायोगाने सफल होऊन शिवाजी जन्मला तर त्या एकट्या दुकट्या नवसावर कथा रचल्या जातात, पोवाडे गायिले जातात? ज्या ज्योतिष्यांची लाखो भविष्ये खोटी पडतात त्यांचे काकतालीय न्यायाने एखादे भविष्य खरे ठरताच तो तेवढेच आपल्या प्रसिद्धकात (जाहिरातीत) छापून प्रख्यात ज्योतिषी म्हणवितो, तसेच ह्या नवसांचे प्रस्थ भाबड्या लोकांच्या विस्मृ-

तीवर काय ते उभारलेले असते. खोटे पडलेले लाखो नवस विसरून सहजगत्या बोलाफुलास गाठ पडताच, नवसावाचूनही जे कार्य ज्या साधनांनी शेकडो वेळा घडले तेच त्याच साधनांनी धडधडीत घडले असताही त्या वेळी केलेल्या नवसानेच ते केले असे भोळे लोक मानतात आणि तेवढ्याच नवसाचा काय तो चहूकडे बोलबाला होऊन, देव नवसास कसा पावतो पाहा, म्हणून जो तो म्हणू लागतो. जो तो नवसाच्या दैवी लॉटरीचे तिकीट दर्शनीहुंडीच्या पतीसारख्याच अमोघ पतीचे मानून पुन:पुन: काढीत असतो.

एक वेळ मानवी लॉटरीला तरी थोडेबहुत बूड असते, पण ही नवसाची दैवी लॉटरी अगदी चकचकीत बिनबुडाची असते. मानवी लॉटरी निव्वळ फसवणुकीची ठरली तर सरकार कधीकधी त्या भामटेगिरीच्या चालकांना दंड तरी करते; पण देवाला दंड कोण करणार? त्याच्या नावे चाललेल्या या नवसाच्या दैवी लॉटरीची सारी तिकिटे जरी खोटी ठरली तरी कोणी विचारता ना पुसता! एखाद्याचे सारे नवस खोटे ठरले तरी दोष कोणी कोणास दिलाच तर त्या फसलेल्यासच दिला जाणार! ‘ तुझा भावच खोटा म्हणून तुझ्या नवसाला देव पावला नाही!’ असेच जो तो म्हणणार? पण तरी देखील—

लाखो तिकिटे फुकट जातात तरीही जशा लॉटऱ्या चालल्याच आहेत, तसे लाखो नवस लटके पडतात तरीही लोक नवस करीतच आहेत!!

गोविंदा गवळ्यानेही त्या दोन्ही सोडतीची तिकिटे काढली. प्रथम लॉटरीचे तिकीट काढले नि ते यशस्वी व्हावे म्हणून त्याचे कुलदैवत जे मोरया त्याला नवसही केला! नुसते लॉटरीच्या तिकिटात यश यावे म्हणूनच नव्हे तर आपल्या कुटुंबावरची सारी संकटे टळावी यास्तव त्याने संकष्टीचतुर्थीचेही व्रत केले.

त्या गावात गोविंदा गवळ्याच्या ओळखीचा एक कासम नावाचा मुसलमान मनुष्य होता. त्यानेही लॉटरीच्या व्यसनात कित्येक रुपये दवडले नि दमडीही कमावली नव्हती. त्यानेही गोविंदाबरोबर एक तिकीट त्याच लॉटरीचे घेतले. मोरयाच्या नावे गोविंदाने नवस केला; तसाच

आपणही खुदाचा वशिला लॉटरीकडे लावावा म्हणून कासमनेही त्याच्या गावी गंडेदोरेखिचडी प्रभृती नवस पीराच्या नावे घेणाऱ्या एका फकिराकडे जाऊन पीरास नवस केला. नवसाच्या लॉटऱ्या हिंदूतच भरभराटलेल्या आहेत असे नाही. हिंदू एकपट धर्मभोळे तर मुसलमान सातपट धर्मभोळे. इतकेच नव्हे, तर ते त्या व्यतिरिक्त बहुधा धर्मवेडे नि धर्मोन्मत्तही असतात. देव पावला नाही तर वैतागून हिंदू फार तर देवापुढे आपलेच डोके फोडील; पण मुसलमानांत खुदाने पावावे म्हणून दुसऱ्याचे डोके फोडण्याचा नवस देखील करणारे अल्लाउद्दीन खिलजी किंवा 'माय ब्रेव्ह मोपला ब्रदर्स' काही थोडेथोडके निघत नाहीत.

तेच कशाला, वाटमारे नि ठग यांच्याही देवता असतात! आणि लग्नाची वऱ्हाडे लुटण्यात जर आम्हांला या वर्षीच्या लग्नसराईत खूप यश मिळेल तर कोणातरी वधूवरांचे रक्त तुला वाहू, किंवा एखादा तरी नरबळी तुला देऊ म्हणून ते नवस करतात आणि त्या नवसालाही केव्हा देव किंवा खुदा पावतो!! वास्तविक दरोडेखोरांना ज्या मानाने त्यांची तडफ, क्रूरता, शस्त्रास्त्रे, कारागीर असतात त्या मानानेच दरवड्यात यश मिळते. देव वा अल्ला स्वतः कधीच दरवड्यात भाग घेत नाही किंवा नवस करून झोपी गेलेल्या दरोडेखोर भक्तासमोर, स्वतः दरोडा मारून देव वा खुदा दरवड्याचे द्रव्य आणून ओतीत नाही. पण दरोडेखोर यश पावतात त्यांच्याच प्रत्यक्ष प्रयत्नाने आणि समजतात ते नवसाने मिळाले म्हणून! त्यांचेही शेकडो नवस लटके पडतात, पण ते विसरून जो एखादा बोलाफुलास गाठ पडून खरा ठरल्यासारखा भासतो तेवढाच ते ध्यानात ठेवतात. नि नवसाच्या बिनबुडी लॉटरीचे अभिमानी बनतात!

लॉटरीच्या निकालाची तारीख उलटली. गोविंदा गवळी नि कासम दोघेही टपालवाल्याच्या वाटेकडे प्रत्यहीं सकाळपासून डोळे लावून बसू लागले. तो दिसताच 'आमचे काही आहे का?' म्हणून धडधडत्या काळजाने विचारीत. त्या टपालवाल्याने स्थितप्रज्ञ उपेक्षेने नकारार्थी नुसती मान हालवून पुढे पाऊल टाकले की त्यास त्या टपालवाल्याचाच अगदी मनापासून राग येई. गोविंदा लगेच मनाला म्हणे, 'दैवास

दोष ! तो टपालवाला काय स्वतःच मला हवे ते पत्र लिहून धाडणार होता की काय !' आणि चूप राही. पण कासमने तिसऱ्या दिवसापासून आपल्या निराशेचा राग त्या टपालवाल्यावरच काढण्यास आरंभिले. ' क्या साला मगरूर है यह पोस्टमन ! हाथमें चिठ्ठी है या नहीं देखता भी नहीं ! इस काफरकोही लाठीसे जरा नरम करना पडेगा, तब यह डाकू जिसका खत उसको ठीक वक्तपर पहुचायेगा !'

तीन चार दिवस आणखी गेले तो गणेशचतुर्थी आली. त्या दिवशी घरातून गोविंदा म्हैस सोडूनबिडून बाहेर पडतो तो टपालवाला नीट त्याच्याच दाराशी येताना दिसला.

' गोविंदा, तुझी मनीऑर्डर आली आहे.' टपालवाला म्हणाला.

' काय आली ? मनीऑर्डर ? माझी ?'

' होय शंभर रुपयांची !'

गोविंदा गवळयास उभ्या जन्मात स्वतःच्या नावे मनीऑर्डर येण्याचा हा पहिलाच प्रसंग ! त्यात ती शंभर रुपयांची मनीऑर्डर ! खरी देखील वाटू नये इतकी चांगली ती बातमी ! गोविंदाचे ऊर धडधडू लागले. सहीबिही कुठे करायची ते टपालवाला सांगेल तसे सुन्नपणे सारे करून शंभर रुपये त्याच्या हातात पडले, तरी त्याला ते नक्की काय घडते आहे ते आकळेना. सोबतचे पत्रही वाचले. लॉटरीत त्याचा क्रमांक कुठेसा येऊन त्याला शंभर रुपये मिळाले इतके अगदी खरे !

शंभर रुपये ! एक रकमी ! अगदी रोकड ! त्याचे हाती ! ! ! मरे मरेतो खपून पाचपंचवीस रुपयांपलीकडे ज्याच्या घरात कमाईची रक्कम म्हणून जन्मात दिसली नाही त्याला काबाडकष्ट न करता अचानक शंभर रुपये रोख मिळावे ! खरोखर लॉटरीसारखा धंदा नाही, मोरयासारखा देव नाही, नवसासारखी सोडत नाही !

त्याच दिवशी गणेशचतुर्थी. त्यामुळे मोरयाला केलेल्या नवसामुळेच हे यश आले, अशी त्याची पक्की निश्चिती झाली. त्याच्या बायकोचाही आनंद हृदयात मावेनासा झाला. ती म्हणाली, ' तुमचा नवस लॉटरी-पुरता जसा खरा झाला तशीच संकष्टीचतुर्थीची प्रचिती येऊन तुमचा आजार, बेकारी, इडापिडा, समदी संकटं आता टळणार ! चांगले दिवस

आणले बरं बाप्पा मोरयाने !'

ह्या वर्षी गोविंदा गवळ्याने गणपतीचा उत्सव मोठ्या गाज्यावाज्याने केला. साऱ्या गावात त्याला लॉटरीची रक्कम मिळाल्याची आणि ते यश गणपतीला केलेला नवस सफळल्यामुळे आल्याची अद्भुत कथा ज्याच्या त्याच्या तोंडी झाली.

कासमला लॉटरीत काही मिळाले नाही. त्याचा पीराला केलेला नवस विफळला, हीही टीका जो तो करू लागला. त्यामुळे कासम नि पीराच्या नावे नवसाची लॉटरी काढून बसलेला तो फकीर हे मात्र चिडून गेले. असले नवस या जगाच्या यशापयशाच्या प्रश्नी फुकट असतात हे सत्य शिकण्याचे सोडून कासमने नि फकिराने गोविंदास नि त्याच्या मोरयास यथेच्छ शिव्या हासडल्या. ' देख लेंगे तेरे को भी ' म्हणून कासमने मूठ वळवून गोविंदाच्या तोंडावर हातवारे करीत धमकावले. गोविंदाही कच्च्या मातीचा नव्हता. ' जा रे ! अशा कावळ्यांच्या शापाने ढोरे मरत नसतात ! जा ! ' म्हणून कासमलाही धिक्कारिले.

आज साऱ्या गावभर गणपती बोळविण्याची धांदल चालू आहे. सारे मार्ग ' मोरया ! मोरया ' ! अशा जयजयकाराने घुमत आहेत. त्या साऱ्या जयघोषाहून उंच जयघोष होता गोविंदा गवळ्याचा. त्याची चिमुकली गणपतीची मूर्ती आपल्याच हाती उंच धरून ' मोरया ! मोरया ! ' गर्जत तो पुढे आणि त्याची मुले टाळ्या वाजवीत मागे, अशी त्या बापड्याने आपल्यापरी मोठी थाटाची मिरवणूक काढून गणपती समुद्रावर आणला. अत्यंत भक्तिभावाने मनात आभार मानले— ' देवा मोरया, मला लॉटरीत यश दिलेस, माझ्या नवसास पावलास ! संकष्टी चतुर्थीचे व्रतही सफळवून तू माझी सारी संकटे निवारशीलच निवारशील ! गणपतिबाप्पा मोरया; पुढच्या वर्षी लवकर या ! ! ' असे गर्जून ती लहानशी मूर्ती हाती घेऊन त्याने समुद्रात उडी घातली. आणखीही दहापाच कसलेले पोहणारे त्यांच्या मूर्ती सगळ्यांच्यापुढे बुड-विण्यासाठी पोहत निघाले. गोविंदा कसलेला पोहणारा व तो सगळ्यांच्या पुढे निघाला, अंधार पडत आला होता.

तोच समुद्राच्या दोन-तीन लाटा अचानक इतक्या उंच उसळल्या नि इतकी चवताळलेली आपटधोपट करू लागल्या की, ते पोहणारे लोक मूर्ती झटकन त्या लाटातच सोडून कसेबसे परत तीराला लागले.

पण गोविंदा? तो का रेंगाळला? त्याची मुले वाळवंटीवर खिरापत वाटीत बागडत होती. ती त्या परतलेल्यांना विचारू लागली, 'बाबा कुठे आहेत?' बोलता बोलता जो तो विचारू लागला, 'गोविंदा कुठे?' तोच शेवटचा जो तटास लागला तो पोहणारा ओरडला, 'अरे बुडाला! गोविंदा बुडाला! लाटांच्या कैचीत दबून—पुढे दिसला म्हणून नाही मला!' पोलिसांनी मचवे सोडले, जिकडे तिकडे हाकाहाक झाली—पण पत्ता नाही! गोविंदा आपला गणपती सगळयात पुढे नेऊन बुडविण्याच्या धांदलीत समुद्राच्या वादळी लाटांत गडप झाला!

गणपतीचे घर जे कैलास—थेट तेथे गणपती गोविंदास घेऊन गेला. गणपतीबरोबर शक्य तितके पुढे जाता जाता गोविंदा थेट कैलासास गेला! गोविंदा कैलासवासी झाला!!

गोविंदाच्या ज्या अंगणात तिसरे प्रहरी ती आनंदाची मिरवणूक मातली त्याच अंगणात तिन्हीसांजा उलटून जातात न जातात तोच एकच रडारड माजली! त्याची धायधाय रडणारी बायको, त्याची मुले, समजावित्या शेजारच्या आया-बाया—एकच आकांत झाला! आपल्या नवसास पावून आपली सारी संकटे दूर करणारा म्हणून ज्या मोरयास मिरवत आणले त्यालाच मिरवत नेताना त्याच्याच पायी आपल्यावर हे महासंकट गुजरावे, 'असा माझा घात देवा, तू केलास तरी कसा?' असे विचारून ती बिचारी गोविंदाची बायको विव्हळत होती! तिचा उपाध्याय पांडुभटजी तिथे येऊन शक्य ते समाधान करू लागला तो ती अधिकच तळमळून हंबरली, 'भटजी, भटजी, माझ्या गोविंदाने किती हो कळवळून आताच देवास विनविले होते—गणपतिबाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या! भटजी! मोरया पुढच्या वर्षी येतीलच, पण माझा गोविंदा मात्र आता पुन्हा—! हाय रे देवा, हाय!'

पांडुभटजींच्या देखील डोळ्यांस टचकन् पाणी आले ते उपरण्याच्या

पदराने टिपीत आहेत तोच–

'क्यों, पांडुभट, अब रोते हो क्यों भाई? अब तुम्हारे मोरयाके नामसे रडो – दैवके नामसे क्यों रोते हो!' त्या झोपडीच्या अंगणातील हिरवळीवर उभा असलेला आणि दंश धरून अचानक निघालेल्या नागासारखी त्याच्या मानेची फणा उर्मटपणे उभारलेला कासम होता तो! 'मोरया नवसास पावतो ना? या गोंद्याची सारी संकटे तो हरणार होता नाही? दिले लॉटरीचे तिकीट नि हरून नेला प्राण! ये तुम्हारे मिट्टीके देव देखो! अब तो फेक दो उनको और भजो हमारा पीर! आमच्या खुदाला जो नवस करतो त्याचे निदान प्राण तरी जात नाहीत! मोरयाला भजणारा गोंद्या मेला – पण मी? मोरयाला दगड म्हणणारा हा मी कासम जिवंत आहे बघ! सच्चा है मेरा पीर और अबबब! काटा! या अल्ला! तोबा!....'

पहिले वाक्य अर्धेच सोडून कासमने अकस्मात असे मोठ्याने ओरडून पाय फडफड झटकला. त्याच्या पायास विळखा मारून कडकडून डसलेला एक भयंकर नाग सटकन खाली पडला आणि त्या हिवळीतून फुसफुस करीत सपासप जो निसटून गेला तो मंद चांदण्याच्या एका किरणातून जवळच्या शेतातील बिळात जाताना चक्क दिसला!

कासम तडफडत तिथे मेला!

देव की दैत्य? कोणाचा नवस खरा? कोणाचा खोटा?

प्रामाणिक लॉटरीत काही तिकिटे यशस्वी व्हायचीच. गोविंदाचे तिकीट उचलले गेले म्हणून त्याला पारितोषिक मिळाले. कासमचे तिकीट उचलले गेले नाही म्हणून त्याला काही मिळाले नाही. धडधडीत कार्यकारणभाव ह्या दोन घटना उलगडून दाखविण्यास जितका पुरायचा तितका पुरतो. त्यापलीकडे नवसाने अधिक काय केले? कोणता अधिक पटणारा कार्यकारणसंबंध उलगडला? याचा नवस सफळला तर त्याचा विफळला! आणि नवसाचे थोतांड ज्या युरोपमधून आजकाल जवळजवळ नामशेष झाले आहे त्यात शेकडो लॉटऱ्यांत हजारो लोकांस नवसावाचूनही पारितोषिके मिळत आहेतच की नाहीत!

भर समुद्रात पोहण्याची शक्ती संपली म्हणून गोविंदा बुडाला! — गुरुत्वाकर्षणाच्या नियमाला मोरया उलटवू शकला नाही. सापाच्या शेपटीवर पाय पडताच साप चावला नि ते विष उतरविणारे औषध वेळीच मिळाले नाही म्हणून कासम मेला. शारीरिक नियमास अल्ला उलटवू शकला नाही. या दोन घडधडीत सृष्टिनियमांनी या दोन घटनांचा जो काही उलगडा होतो त्याहून कोणता अधिक समंजस नि अव्याभिचारी कार्यकारणसंबंध नवसांच्या भाकड गृहीत कृत्याने स्थापिला जातो ?

मोरया मोरया करीत गोविंदा मेला ! या अल्ला, या अल्ला करीत कासम मेला ! देवाच्या म्हणा, वा दैत्याच्या म्हणा अशा कोणच्याही भाकड नावावर चालविलेला नवसाचा धंदा म्हणजे एक अगदी अनवलंबनीय, पोकळ आणि बिनबुडाची सोडत आहे ! नुसत्या नवसाने कार्य घडतही नाही नि बिघडतही नाही. ‘ नवसें कन्यापुत्र होतीं । तरि कां करणें लागे पति ’ असे तुकारामच विचारतात !

नवस फेडण्यासाठी मक्केला जाणाऱ्या मुसलमानांची कित्येक जहाजे पश्चिम समुद्रात ( अरबी समुद्रात ) बुडतात. नवस फेडण्यासाठी पंढरीच्या यात्रेला जाणारे शेकडो वारकरी महामारीने चंद्रभागेच्या वाळवंटावर पटापट मरतात !

ज्या घटनांचा कार्यकारणभाव स्थापिणारा सृष्टिनियम आपणांस आज अवगत नाही त्यास कोणी ‘ चमत्कार ’ म्हणतात, कोणी त्यासच नाव देतात ‘ नवसास देव पावला ! ’ ‘ चमत्कार ’ किंवा ‘ नवसास देव पावला ’ ही दोन्ही नावे अज्ञानाचे प्रतिशब्द आहेत; ज्ञानाचे नव्हेत !

* * *

# ३. पित्र्यांचे दुसरे लग्न कसे फिसकटले ?

सत्य म्हणजे जवळ जवळ जशी त्यांनी स्वतः आम्हांस सांगितली तशीची तशीच; पण तरीही ' कथा ' एवढ्याचसाठी म्हटली की, तीत नावे गावे तेवढी, भाग पडले म्हणूनच, बदलली आहेत नि घटनेशी घटना जुळवून घेतल्या आहेत.

ज्यांना जुन्या समाजस्थितीतील काही गोष्टी टाकावू वाटतात ते जुन्या पात्रांची एक कल्पित कथा रचून तीत त्या गोष्टीचा विपाक किती हानिकारक वा हास्यास्पद झाला ते वर्णू पाहातात. उलटपक्षी ज्यांना नव्या समाजस्थितीतील काही पालट भयावह वाटतात तेही त्या पालटांची हिडीस वा अनिष्ट बाजू उठावदारपणे रंगविली जाईल अशी पात्रांची नि परिणामांची कल्पित जुळणी सहज करू शकतात. अशा कल्पित कथा — कादंबऱ्यांचीही ती ती बाजू समाजाच्या मनावर ठसठशीतपणे अंकिण्यास पुष्कळ उपयोग होतोच होतो. परंतु नव्याचा वा जुन्याचा दुर्विपाक दाखविणाऱ्या कल्पित गोष्टीस झिडकारून जुन्याचे वा नव्याचे अभिमानी त्या कल्पितकथेच्या फुगलेल्या शिडास ज्या एका टोल्यासरशी फाडून, त्यातील सारा वारा काढून ते शीड अकस्मात् ढिलावून सोडतात तो टोला ह्याच आक्षेपाचा असतो की, ' जा रे ? कल्पनाच करायची तर वाटेल ती करता येईल ! ' एकच प्याला ' नाटकात दारू पिऊन बायकोला मारणारा नवरा जसा दाखविला तसा दारू पिऊन बायकोला कडेवर घेवून नाचणारा नवराही दाखविता येईल ! सिंधूसारखी दारूड्या नवऱ्याची पतिव्रता बायको आज बायकांच्या कैवाऱ्याने रंगविली, तशी स्त्री जात्याच कुलटा असते, ' पुमानित्येव भुंजते ' हे पुरातन सूत्र समर्थिणाऱ्यांना जाराचे नादी लागून, दारू पिऊन, नवऱ्याचा गळा कापणारी सिंधूही रंगविणे कठीण नाही ? बोलून चालून भाकडकथा ! विचारतो कोण तिला ! '

कल्पितापेक्षा घटिताचा परिणाम नेहमीच शतपटीने अधिक टिकाऊ,

अधिक लागू, अधिक विश्वसनीय असणारच असणार. अर्थात समाजातील कोणत्याही रूढीचे सुपरिणाम वा दुष्परिणाम अखंडनीय पुराव्याने सामाजिक मनावर ठसविण्यास सत्यकथांचा उपयोगही तितक्याच पटीने अधिक होणार. त्यांच्या तात्पर्याला तितके सहजासहजी प्रतिपक्षालाही हेटाळता येत नाही. उदाहरणार्थ – विवाहाचा विषय घेऊ. लेखकाच्या लहरीप्रमाणे विवाहाच्या प्रौढ वा बाल, सवर्ण वा अवर्ण, स्वतंत्र वा परतंत्र अशा वाटेल त्या प्रकारचा सुखद परिणाम कादंबरीकारास सहज रंगविता येईल. तो विवाह साजरा करावयास त्याला हवी ती घटनांची सामग्री कल्पनेच्या हाटात वाटेल तितकी मागण्यावारी मिळू शकते, त्यामुळे काल्पित प्रबंध इतर दृष्टीने कितीही उपयोगी वा आकर्षक असले तरी विवाहांच्या जुन्या वा नव्या प्रकारात समाज किती सुखी वा दुःखी असू शके किंवा शकतो ते निर्विवादपणे ठरविण्यास तशा खरोखरच घडलेल्या विवाहांच्या आणि विवाहविषयक घटनांच्या वैयक्तिक सत्यकथा ह्याच, निर्भेळ वृत्तान्ताचे खालोखाल, उपयोगी पडणाऱ्या असतात; आणि केव्हा केव्हा काल्पिताहून अधिक आकर्षक नि रोमहर्षक असू शकतात.

समाजाच्या वास्तव परिस्थितीवर लख्ख प्रकाश पाडणारी अशीच एक सत्यकथा आणि त्याच विवाहविषयक प्रकरणी आम्हांस श्री. पित्रे ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळाली, ती पूर्वी त्यांच्या स्वतःच्याच होऊ घातलेल्या दुसऱ्या लग्नाची. त्यांच्या स्वतःचीच फसगत तीत असताही ती त्यांनी स्वतःच न लपविता सांगितली. ह्यावरून नि त्यांच्यासारख्या सरळ मनाच्या सद्गृहस्थाने ज्या निष्कपट सहजपणे ती सांगितली त्यावरून ती जवळजवळ अक्षरशः खरी आहे अशी ग्वाही आमचे मन देत होते. पण तरीही ती आम्ही त्यातील दोघातिघा महत्त्वाच्या शिष्टपात्रांकडून पडताळूनही पाहिल्यामुळे तिच्या सत्यतेविषयी आम्हांस शंकाच उरली नाही.

आजचा काळ तर बोलूनचालून शारदा निर्बंधाच्या कलियुगाचा ! पण जेव्हा ‘ अष्टवर्षा भवेत्कन्या ’चा अगदी सत्ययुगीन काळ होता तेव्हा त्या सनातन सूत्राप्रमाणे चालणाऱ्या धर्मशील लोकांचीही विवाहनीती प्रसंगी काय काय रूपे धरी हे यथातथ्य दाखविण्यासही सत्यकथा

एखाद्या आरशासारखी कामी येते. त्या संभाषणाचा महत्त्वाचा भाग असा :

'म्हणजे? तुम्ही पेशावरकडे नौकरीवर असतानाच तुमचे पहिले कुटुंब इकडे वारले? त्या कुठे असत?'

'माझ्या पत्नी म्हणजेच सौभाग्यवती इंदिराबाई पित्रे! तुमच्या शितूत डॉक्टरांच्या नातलग लागत त्या, आले ध्यानात? त्या वारल्याचे कळताच मी ती दीडशे रुपये दरमहाची पेशावरची नौकरी सोडून तडक महाराष्ट्रात परत फिरलो. तिकडील मंडळींनी पुष्कळ म्हटले की, 'पित्रे तुम्ही असे बैरागी काय होता एकदम! नौकरी सोडू नका. पण मी काही ऐकले नाही. तडक पंढरपूरला परत आलो. पहिले कुटुंब जे वारले त्यापासून झालेली माझी दोन लहान मुले त्यांच्या आजोळी पोचविली आणि रामभाऊंनी बोलावल्याप्रमाणे त्यांच्या भेटीस गेलो. जाताच रामभाऊंनी मला स्पष्टपणे सांगितले की, 'तुमच्या मनात असेल तर छान मुलगी कोकणात आताचे आता मिळण्यासारखी आहे. तेव्हा, पित्रे, तुम्ही ही लग्नसराई हातची जाऊ देऊ नये. तुम्हास दुसरी काही एक उठाठेव करावयास नको. ज्यांनी माझे दुसरे लग्न गेल्या वर्षी असेच बिनबोभाट जुळवून दिले ते धोंडभट जोशी हेच तुमचे हे लग्नही जुळविणारे! मग चिंता काय! त्यांनी कोकणातल्या अशा अनेक मुलींची लग्ने देशावर जुळवून आपल्या घरी पार पाडली आहेत. तुम्ही नुसते एकटे जरी तिकडे जाल तरी बाकीचे सगळे सोहाळे ते जोशीबुवा उरकून घेतील नि येताना तुम्ही नवीन बायको खाकोटीस मारून जोडीने याल! माझे पहिले कुटुंब निवर्तल्याचे ऐकताच मला धोंडभटजींनी असेच एकटे कोकणात बोलावून नेले आणि आठदहा दिवसांत सारा विधी उरकून मुलगी माझ्या पदरात टाकून माझी सहकुटुंब पाठवण करून दिली. या, आत या असे. ही पाहा ती मुलगी. हे आमचे द्वितीय कुटुंब. गेल्याच वर्षी लग्न झाले आमचे!' रामभाऊंनी असे उत्तेजन दिल्यावर मीही विलंब न करता लग्न उरकून घेण्याचे ठरविले. रामभाऊ माझे बालमित्र. त्यांना स्वतःच्या अनुभवाने जो जितका कर्ता नि विश्वासार्ह वाटला तो कोकणातील ह्या धोंडभटजीसारखा साहाय्यक काही वारंवार मिळणार

नाही हे मी जाणून होतो. त्यातही रामभाऊंनी केलेली ती कोकणातील त्यांची दुसरी बायको चांगली चुणचुणीत, अकराबारा वर्षांची, त्या वेळच्या समजुतीप्रमाणे उपवर पोर दिसली. श्रीमान विधुरांना अशा मुली कोकणात मिळू शकतात असा त्या वेळी भारी लौकिक असे.'

'म्हणजे ही गोष्ट अशी घडली तरी किती वर्षांपूर्वी? आपले वय काय होते तेव्हा?'

'सरासरी वीस वर्षांपूर्वी. मी चाळिसाव्या वर्षाच्या आतबाहेर असेन.'

'बरे, पुढे? तुम्ही मग काय कोकणात एकटेच गेलात की धोंड-भटजींशी आधी मुलीच्या माहितीविषयी काही पत्रव्यवहार केलात?'

'छे! मला गाजावाजा नको होता. पुन्हा लग्नसराई जवळ आलेली आणि रामभाऊंचे यशस्वी उदाहरण डोळ्यांपुढे. यास्तव त्यांनी सांगितल्या-प्रमाणे पंधराशेच्या नोटांचे पुडके एका पैशाच्या कशात घालून नि तो कंबरेस बांधून कोकणात निघालो, तो थेट धोंडभटजींच्या गावी जाऊन त्यांच्या घरी उतरलो. रामभाऊंनी सगळे कळवून ठेवलेच होते. धोंडभट माझी वाटच पाहात होते. ओटीवर त्या खेड्यातले काही भंडारी होते. त्यांना मी का आलो हे कळलेले असावेसे दिसले. कारण ते मी थोडा इकडे तिकडे उभा राहिलोसे पाहून आपापसात बोलत होते की मुळ्यांच्या मुलीचं बामणाशी जमलं तर बेश होईल बुवा. धोंडभट काय म्हणतील ते करतील. त्या मुळ्यांच्या तोंडचं पाणी पळालं आहे. मुलगी तर गळी लागली. आता अकरावं वर्ष लागणार. समद्या बाया विचारतात लगीन कधी करणार! पण गाठी दमडी नाही! मुळ्या तरी करणार काय! आता हा आपला उपकारी भटजीबुवाच तारील तर तारील त्या मुलीला. पाहुणाबी सज्जन दिसतोय!' त्यांच्या या माझ्यामागे बोललेल्या पण मला ऐकू येणाऱ्या संवादाने मला बरीच तरतरी आली. धोंटभटजी विषयी आदर, त्या कोणच्याशा मुळ्यांच्या मुलीविषयी आतुरता नि ह्या भंडारीबिंडारी गावकऱ्यांविषयी आपुलकी भासू लागली.

'स्नानाची वेळ होताच मला एका मोकळ्या शेतासारख्या आगरात मोठेमोठे धोंडे मांडून केलेल्या चुलीवर पाणी तापत होते तिकडे नेण्यात

आले. पाल्यापाचोळ्यात एक चिरा होता. तिथे अगदी उघड्यावर स्नान करताना मी धोंडभटजीस पाहिले – तसेच मीही स्नान करू लागलो. कोकणी खेडेगावचे ते सगळेच नवीन ठाण. ते हे पाहा, ते पाहा, करण्यात मन बावचळले होते. त्यामुळे अंगावर उभ्याउभ्या तीनचार तांबे पाणी ओतून अंग हाताने घासू लागेतो नोटांचा कसा कंबरेला बांधलेला आहे याची मला आठवणच राहिली नाही. हात कंबरेला लागताच चमकलो. घाईघाईने कसा सोडला तो नोटा भिजत आलेल्या ! तसाच पुढे होऊन, उन्हात त्या नोटा पसरून, त्यावर दगड ठेवून स्नान उरकून मी धोतर नेसलो. तो धोंडभटांनी दुरून कोकणात जे सहज बोलणे म्हणतात पण ज्याला देशावर ओरडणेच म्हटले जाईल अशा उंच आवाजाने 'मुलीला पाणी भरायचेय, किंचित इकडे यावे' असे घाईघाईने सांगितले. मी झटकन तिकडे गेलो, तो संध्येचा पाट ठेवलेला पाहिला. त्यांच्या कोकणी भावना दुखवू नयेत म्हणून पाटावर बसून भस्म लावतो न लावतो तोच एका मुलीने धावत येऊन सांगितले की, 'ते कागद कोणाचे पडले आहेत, कावळ्याने उडविला की एक ! मी तिकडे दृष्टी ठेवली होती नि लगेच परतणार होतो नोटा उचलण्यास, तोच ती मुलगी हे ओरडली. झटपट जाऊन पाहातो तो शंभराची एक नोट नाही ! अर्थात कावळ्याने नेली ! कावळ्याचे काय घेणार ? धोंडभटाने, त्याच्या बायकोने, त्या भंडाऱ्यांपैकी एकाने कावळ्याच्या उपद्रवास शिव्या हासडल्या; कावळ्यांच्या उपद्रवाचे प्रकार सांगण्यात येऊ लागले, कोकणचे कावळे नि देशी कावळे यांच्या जातीपातीपर्यंत गोष्टीवरून गोष्ट गेली; पण नोट काही परत आली नाही.

'तरी देखील ती खेडवळ माणसे किती हळहळली ! एका भंडाऱ्याच्या डोळ्यात तर टिपे आल्यासारखी दिसली. मोठ्या नगरातील लोकांपेक्षा खेडेगावची माणसे दयाळू, सरळ साधी असतात म्हणून कवी जे गोडवे गातात ते काही खोटे नव्हे ! मी मनात म्हणू लागलो – माझ्याएवढा प्रौढ बिजवर मिळेल ती मुलगी पदरी पाडून घेण्यास आला असता अजून एकानेही मला खिजवले नाही – नाहीतर नगरातील ती हलकट सभ्यता ! एवढ्यात एक शंभरदा मजकडे बोटे दाखवून फिदी फिदी हसली असती ! लागट बोलली असती !

'या विचाराने नोट गमावल्याचा मला जवळजवळ विसरच पडला. सारखी आठवण होत होती ती एवढीच की, दोन दिवस उलटून गेले पण धोंडभटजी मुळ्यांच्या मुलीकडे मला अजून कसे नेत नाहीत.'

'तोच मजविषयी प्रथमपासून कळकळ दाखविल्यामुळे ज्यासंबंधी मला ममत्व वाटे तो शिदू भंडारी येऊन मला म्हणाला, 'महाराज, आले की एकदाचे मुळे बाहेरगावाहून परत ! आज धोंडभट तुम्हासनी नक्की नेणार बघा मुलगी बघायास.'

'मी म्हटले, अरे ! धोंडभटजींना पसंत, ती मला पसंत आहेच की; बघायची कसली ! ठरवूनच टाकायचं एकदम !'

त्यावर शिदू म्हणाला, 'तांदुळाचे गोण भारी सस्तावले आहेती. आमचा तोच व्यापार, आज खरेदीस्नी जाणार मी. तुमचेभी लगिनसाहित्य सस्तात घेऊन शानी येतो तर !' मी म्हटले, 'जाच तू.' तोच धोंडभट आले नि मुलीकडे निघायचे म्हणाले. मी अगदी प्रसन्न झालो, त्या निघण्याच्या लगबगीतच धोंडभट मला झटकन थांबवून म्हणाले, 'शिदू जिवास जीव देणारा मनुष्य, तांदूळ खरेदीसाठी नडला आहे. आज न गेला तर लग्नापर्यंत परतू शकणार नाही. पण तो नसला तर साऱ्या गावास वेळी दटाऊ शकून कार्य पार पाडणारा दुसरा दंडम माणूस कोण मिळणार ! तर त्याला हवे ते २०० रुपये लगेच द्यावे. तो येताच रुपये परत देईल. आपल्या लग्नाचे तांदूळ पण स्वतात घेऊन येईल. हं चला; मुलीकडे लवकर गेलं पाहिजे.'

मुलीकडे जायच्या माझ्या धांदलीत यांच्या हिरमोडाची आडकाठी मुळीच नको, या विचारावाचून दुसरा विचार मला सुचूच न शकल्यामुळे मी २०० रुपयांच्या नोटा शिदूला देऊन लगबग मुळ्यांच्या घरी गेलो.

'मुलगी ठीक होती. त्या खेडेगावात त्या काळपर्यंत 'अष्टवर्षा भवेत् कन्ये 'चेच युग नांदत होते. त्यामुळे त्या अकरा वर्षांच्या मुलीस लोकांनी घोडनवरी म्हणू नये म्हणून मुळ्यांनाही लग्नाची घाई आहे, हे मी जाणून होतो. पण तरीही माझ्यासारख्या बिजवराकडून मुलीच्या नावे

उलट हुंडा उपटणारे कित्येक आईबाप आमच्या नगरातून मला आढळले असल्यामुळे तशा टग्यांशी माझी गाठ पडते की काय अशी मला भीती वाटत होती; पण देण्याघेण्याची कोणतीही भानगड मुळ्यांनी केली नाही. मी म्हणेन त्यात त्यांचा संतोष ! मला पुन्हा वाटले, हे खेडवळ लोकच खरे धर्मभीरू ! किती साधाभोळा व्यवहार यांचा ! रामकृष्णपंत मुकादम नावाचे कुणी गृहस्थ तिथे शेजारच्या गावाहून सहजासहजी आले होते. त्यांस बोलावून, त्यांचे समक्ष लग्न नक्की ठरून, मला एक गडंगनेराची जेवणावळही त्याच दिवशी झाली.

'रात्री धोंडभटजींनी पंधरा दिवसांवरचा मुहूर्त नक्की केला. माझ्याबरोबर एक भंडारी माणूस देऊन ते म्हणाले, 'तुम्ही मुंबईस जाऊन ठरलेले दागिने घेऊन या; पण त्या आधी लग्नाचीही तूपसाखरप्रभृती किराणासामग्री ह्या भंडाऱ्याचे हाती उलट बोटीने धाडावी. दागिने झाले की तुम्ही यावे. तोवर शिदू भंडारीही तांदूळ खरेदीहून येईल.

'आम्ही दोघे मुंबईस आलो. शंभरसवाशेचे किराणा सामान नि कापड ह्या भंडाऱ्याबरोबर बोटीने लगेच धाडून दिले. पाचसहा दिवसांत मनाजोगे दागिने घडवून मीही परत धोंडभटजींकडे आलो.'

'पाहातो तो माझ्यामागे धोंडभटजींच्या मुलाची मुंज साजरी झालेली आहे नि लग्नासाठी म्हणून धाडलेले तूपसाखर, कापडचोपड त्या मुंजीसाठी खर्च झालेले आहे ! आणि ही गोष्ट स्वतः धोंडभड मला साळसूदपणे अशी सांगते झाले की, तुम्ही गेल्यावर त्या भंडाऱ्याचे हाती जे सामान धाडलेत ते येताच मी मुळ्यांना मांडवबिंडव घालण्याची विनंती करावयास जो गेलो तो त्यांनी मुलगी देण्याचा बेत रद्द केल्याचे कळविले; तेव्हा म्हटले, हे सामान आता उगीच सडवून का टाका ? यासाठी त्यातच मुलाची मुंज उरकून घेतली !' धोंडभटाचे हे बोलणे ऐकताच मला राग आला. मी म्हटले, मला मुलगी तरी द्या. नाहीतर माझे पैसे तरी भरून द्या आणि तो शिदू भंडारी आला की नाही ? त्याने नेलेले दोनशे रुपयेही मला तुम्हीच दिले पाहिजेत !

'माझ्या या रागीट मागणीने मुळीच न रागावता अधिकच थंडपणे धोंडभट म्हणाला, 'तुमची दमडी न् दमडी आम्ही देऊ. इतकेच नव्हे,

पण दुसरी मुलगीही मी शोधीत आहे. तुम्ही काही दिवस धीर धरून इथेच राहावे. '

' मी पुन्हा गोंधळलो. क्षणभर वाटले, हा मनुष्य लुच्च्या असता तर इतक्या न्यायाची गोष्ट बोलता ना ! पण आता आपण थोडे सावध राहावे, आणि पुन्हा दमडी देऊ नये म्हणजे झाले. असा विचार करीत जेवून जो ओटीवर येतो तो माझी दागिन्यांची लहान ट्रंक तिथे नाही, माझ्या उरात आता मात्र धडकीच भरली जवळजवळ ओरडूनच मी उठलो, ' पण माझी ट्रंक कुठे आहे ! ' ट्रंक ! तोच आतून धोंडभटजी आले नि त्या पहिल्या शांतपणाहूनही शांतपणे म्हणाले, ' ओटीवर ट्रंक कशी ठेवावी ? आत नीट माळ्यावर ठेवून देणेच सुरक्षित ! पण तुम्हांस हवी तर इथे जवळ ठेवा. ' मी निक्षून म्हटले, घेऊन या ती. त्यांनी आणूनही दिली ती.

' माझ्या उरात भरलेल्या धडकीसरशी माझ्या मनात आता मात्र एक चमत्कारिक अवसान आले. पंजाबपर्यंत नाना देशचे पाणी प्यालेला मी मनुष्य — हा धोंडभट खरा असो, खोटा असो; ह्याच्या हातात इतके मी सापडावेच का, की हा मला फसवील की काय ह्या शंकेने मला असे सारखे व्याकूळ व्हावे लागावे ! जे गेले ते गेले समजून ती परत आलेली दागिन्यांची ट्रंक तरी इथे ठेवणे नाही, असा विचार करून आजूबाजूस पाहिले तो धोंडभट मागे दूर आगरात गेल्याचे नि जवळपास कोणी नसल्याचे आढळले. तडक उठलो, ट्रंक चक्क डोक्यावर घेतली नि सपासप जो समोरच्या घाटीने चढू लागलो तो मागे म्हणून पाहिले नाही.

' थोडीशी घाटी चढून एका दाट झाडीत वाट फुटलेली पाहताच तीत वळलो. दोनचार माणसांना—त्या मुळ्यांच्या घरी झालेल्या गडंगनेराचे वेळी जे रामकृष्णपंत मुकादम मला भेटले होते त्यांच्या गावाचा पत्ता विचारला. ते गाव त्याच वाटेने संध्याकाळपर्यंतच्या चालीवर आहे असे कळताच तिकडेच जावे म्हणून चाललो. आमचे एक नाते त्या दिवशी बोलता बोलता निघाले होते.

' संध्याकाळी मुकादमांचे घर गाठले. त्यांनाही फार आनंद झाला. ते म्हणाले बाबा ! सुटलास का एकदाचा त्या धोंडभटाच्या जबड्यातून ? जाऊ-

घ्यात हो जे गेले ते पैसे ! हे वाचविलेत तेच विशेष समजा ! अहो कसला मुळ्ये, कसली मुलगी, कसला शिंदू भंडारी नि कसले तांदूळ घेऊन बसला आहात महाराज ! ती एक चांडाळ चौकडी आहे नि त्या धोंडभटाने आजवर असे तुमच्यासारखे दहापाच उतावळे नवरे फसविले आहेत ! तुमची नोट तुम्ही स्नान करता करता ज्या कावळ्याने पळविली ना, तोच कावळा तुमची ही ट्रंक पळविण्याच्या बेतात होता. पण उचलली नाही त्याच्या चोचीला झटकन, इतकेच ! आम्ही त्या गडंगनेराच्या दिवशीच तुम्हांस सावध करणार होतो. पण बोलावे कोणी ! तुम्हीच ते खोटे मानलेत तर आमचेच दात पडते. कारण तो धोंडभट, तो मुळ्ये नि ते दोनचार भंडारी गुंड, गाजावाजा तर होऊ नये, शिकार पण शिकार गवसावी, अशा बेतानेच, निर्बंधाचे कैचीत स्वतःला न गवसता, गळा कापतात दुसऱ्याचा ! इतक्या सावधपणे की, त्यास गळेकापू म्हणून जो कोणी म्हणेल त्यावरच उलट मानहानीचा खटला भरून कोर्टात खेचता यावे !

‘ मुळ्याच्या माझ्या मुळावरच आलेल्या मुलीच्या पायी मी पडत असलेल्या खड्ड्यातून शिरसुरक्षित सुटलो ह्याचा मला आनंद होतो न होतो तोच काय सांगू राव, पुन्हा एक लग्नाचे नवे संकट तिथल्या तिथेच दत्त म्हणून उभे राहिले ! कारण वरील भाषण संपते न संपते तोच रामकृष्णपंत म्हणाले, ‘ आता हे पाहा, ही आमची मुलगी; ही आम्ही तुम्हांला देतो आणि कोकणात येण्याच्या तुमच्या श्रमाचे शेवटी सार्थक करतो !’ हे बोलतबोलतच त्यांनी मुलीला मजसमोर उभी केली तरी ती माझ्या गुडघ्याहून फारशी काही उंच दिसली नाही. त्या काळी शिष्ट-संमत असलेला ‘ अष्टवर्षा भवेत् कन्ये ’ चा परकर देखील तिला मोठा होईलसे स्पष्ट दिसत होते. मी देखील थोडे ओशाळतच विचारले, ‘ मुलीचे वय किती ? फारच लहान दिसते ! ’

‘ रामकृष्णपंत निश्चित निश्चयाने उत्तरले, ‘ वयच विचाराल तर सातवं लागलं आहे, पण आम्ही एकदोन वर्षे तिला माहेरीच सांभाळू म्हणजे झाले, तुमच्या पहिल्या कुटुंबाची दोन लहान मुले आहेत. त्यातच हीही वाढेल. मुलीची जात ! दोन तीन वर्षांत अशी उफाडेल की यंव !’

‘ हसता काय महाराज ? आज मलाही त्या भाषेचे जरी तुमच्या-

सारखेच हसू येते तरी कोकणातील खेडेगावातून केवळ वीस वर्षांपूर्वीपर्यंत ही भाषा अगदी परिचयाची, अगदी शिष्टाचाराची असे. अहो, गुजराथ, राजपुतान्यात जर मी अजूनही तीनतीन चारचार वर्षांच्या मुलींची लग्ने पाहात होतो तर त्या काळी मला ह्यात काय विशेष आश्चर्य वाटणार ? त्यातही कोकणात आल्यासरशी मुलगी मिळवायचीच असा मला एक अभिनिवेशच चढलेला. आता हसा वा हसू नका. त्या वेळी तरी मी अगदी आनंदाने लग्नास होकार दिला. म्हटले, झाली आमची मुलगी ! जवळ दागिन्यांची ट्रंक होतीच. ते सारे दाखवून बोलता बोलता त्याच बैठकीवर मुहूर्त ठरविला. त्या मुळ्यांच्या मुलीशी ज्या दिवशी तो धोंडभट माझे लग्न लावणार होता ना, त्याच दिवशी तिच्या सवाई ठिकाणची मुलगी वरणारच तर मी ! असा सूड उगवल्यासारखा एक आवेशच चढला मला.'

'अगदा शेजारी देखील फारसा गवगवा न होऊ देता ठरल्या दिवशी विवाह संस्कारास आरंभ झाला. मला नि मुलीला हळदही लागली. तोच—

'दूरवरून दहापाच दांडगट लोक मोठमोठ्याने बोलत येताना दिसले. बोलता बोलता शिदू भंडारी त्या धोंडभटाच्या बैठकीतल्या इतर भंडाऱ्यांसह दाराशीही येऊन ठेपलेला नि मला भेटण्यासाठी दंडम हट्ट धरून उभा असलेला पाहिला. मनात कसलीशी भीती वाटली, पण रामकृष्णपंतानी याच म्हटले म्हणून तसाच हळद लावलेला मी पुढे आलो. त्या शिदू भंडाऱ्याचे डोळे लाल, फिरलेले, माडी पिऊन तर्रर्र झालेले ! त्याच्या साथीदारांच्या तोंडातूनही माडीच्या उग्रट गंधाचे भपकारे येत होते. मला पाहाताच ते दटावून ओरडले, ' अरे बामणा, त्या मुळ्याच्या मुलीशी ठरलेले लग्न मोडून आमच्या गावाला काळोखी लावून इथं आलास काय पळून !' मी शक्य त्या सौजन्याने दादा-बाबा करीत म्हणालो, ' अरे, धोंडभटांनी मला सांगितले ना की, मुळ्यांनीच मुलगी देण्याचे नाकारले म्हणून !

' ते वेड्यावाकड्या शिव्या हासडीत म्हणाले, ' चुलीत गेला तो पाजी धोंडभट ! आम्ही तुला या कोकणातली कोणाचीच मुलगी आता करू देणार नाही. चल, धुऊन टाक ती अंगाला माखलेली हळद ! चल खंडोबा दिसतुया जसा !'

इतक्यात रामकृष्णपंतानी मधे पडून शिदूला बाजूला घेऊन काहीसे गयावया करून सांगताना मी दुरून पाहिले. शिदूची नाडी त्यांच्या चांगली परिचयाची दिसली. तो थोडा थंडावल्यासारखा झाला. पण त्याच्या रोगावर कोणते औषध इतके तत्काळ रामबाण ठरले?

'आम्ही त्यांची समज काढण्यासाठी पन्नास रुपये दंड द्यावा हे! हूं का चूं न करता मी ते रुपये रामकृष्णपंतासमोर त्या गुंडांच्या हाती टाकले! ते वाटेला लागले आणि मी तसाच असलेल्या स्नानाच्या पाण्याकडे जाऊन अंगावर भराभर लोटे ओतीत हळद धुऊन टाकली!

'बिचारी अर्भक ती मुलगी – आत हळद लावून तशीच बसविलेली होती! बिचारा रामकृष्णपंत! 'अहो पित्रे, आता त्या गुंडांची समजूत झाली आहे, आता काही वांधा नाही, हळद का धुता?' म्हणून काकुळतीने पुसू लागले मला!

मी म्हटले, आता त्यांचा नव्हे माझाच वांधा आहे! त्यांची जशी एका अर्थी पटली – तशीच दुसऱ्या अर्थी माझीही समजूत पटली! आता या जन्मात पुन्हा लग्न म्हणून कर्तव्य नाही! छे! पाहिजे तर तुम्हालाही लग्न मोडल्याचा म्हणाल तो दंड देतो पण असे अपशकुनी लग्न आता लावणे नाही!!!'

'पण रामकृष्णपंतांनी मात्र माझ्याकडून काहीही दंड न घेता माझे दागदागिने परत केले नि मी आल्या वाटेने परत फिरलो! तेव्हापासून—

'खेड्यातील लोक म्हणजे गोगलगाय' साळसूदपणाचे आगर म्हणजे खेडे. नागर तेवढा काय तो लुच्च्या! अशी एक एक कविता ज्यावर लिहिलेली आहे आणि मी स्वतः, ते धोंडभट, तो शिदू भंडारी ते त्या ओटीवरच्या बैठकीतले इतर सालस खेडवळ, ते मुळये आणि आम्हा सर्वांच्या पायदळी त्या दोन आठदहा वर्षांच्या निरपराध अर्भक मुली वरमाला घेऊन ज्यामध्ये विवाहहोमाच्या पेटलेल्या कुंडात उडी घेत आहेत, असे एक छायाचित्र काढून त्यांची एकेक प्रत जुन्या नीतीच्या अमर्यादित अभिमान्यांना भेट द्यावी अशी मला लहरीवर लहर येते!!'

—१९३५

* * *

## ४. नंदीबैल आणि माणूस बैल

‘ घे ग बाई एवढ्या भाऱ्या ! ’ लाकडांच्या मोळीवाल्या बाया नानू-शेठजींच्या पत्नीला गळ घालून म्हणत होत्या.

‘ टाका तर मग. पण अडीच आण्यापेक्षा मी एकेका मोळीला दमडी-सुद्धा अधिक देणार नाही. ’ शेठाणी म्हणाल्या.

‘ नको ग ताई असं करूस ! अग, चार चार आणं येतात बरं ह्या एकेका मोळीचे ! आम्ही घरी मुलंबाळं टाकून झुंजुरक्याला जे निघालो, ते ह्या नगरात ही दोनप्रहरची वेळ येईतो बोजा डोक्यावर घेऊन भटकत आहो ग दारोदार ! अडीच आण्यात मिरची, मीठ, दाणं काय नेणार घरी ? साडेतीन आणं मोळीमागं दे बया नि घे साऱ्या मोळ्या ! ’

‘ तुला सांगितलं नं एकदा ! अडीच आणे मोळी टाकायची तर टाक नाहीतर जा आपली कशी ! तुला चार नाही आठ आणे कोणी दिले भाऱ्यामागं तर मी नको का म्हणते ! तुला परवडेल तिथं दे आपली तू ! अं ? छे, तीन आणे नाही नि दोन आणे नाहीत ! अडीच आणे मोळी, परवडलं तर साऱ्याजणी टाका ! काय ? जा पाहू आपल्या ! उगीच ताईबाई करीत बसू नका ! मला किचकीच करायला वेळ नाही. नसलं पटत तर चालू लागा पुढं ! ’

‘ पुढं कुठं जाणार आता ? दोनप्रहर दिवस डोक्यावर आला, घरी लेकरं ! बरं एकेक पैसा जास्त – ’

‘ मी धरून का ठेवले आहे तुम्हांला ? जास्त पैसा देईल तिकडे जा ! अडीच आणे मोळी मिळाली तरच मला हवी. माझ्यावर तरी तुझं बळ का ?’

सौद्याच्या दृष्टीने शेठणीचे हे बोलणे सरळच होते. तिलाही तिचा संसार होताच !

शेवटी आंबट तोंड करून जळफळत–बडबडत त्या भारेवाल्या बायांनी अडीच आणे मोळीप्रमाणे भाऱ्या टाकण्याचे मान्य केले. त्या बायांच्या कटींना एकेक लहानसे लुगडे त्यातल्या त्यात काऱ्या मारून गुंडाळलेले,

कटीखाली मांड्यांची वीतदेखील पुरती न झाकणारे ! वर एक फाटकी-तुटकी चोळी, अंग घामात डबडबलेले, हातात पितळी, कथली नि काचेच्या राकट बांगड्या तेवढ्या भरपूर ! अशा त्या चार पाच मोळीवाल्या बाया शेठाणीने दाखविलेल्या बोळात वळून त्या घराच्या मागच्या दाराकडे त्या मोळ्या टाकण्यास गेल्या. धडाधडा एकावर एक मोळ्या पडल्या. शेठाणीने गणन करून पैसे त्यांच्या हाती टाकले. तोच त्या भारेवाल्या बायांनी ठराविक भांडण काढले आणि जिने अडीच आणे मोळीला 'हो' म्हटले होते, ती सोडून बाकीच्यांनी मोठा गलका केला.

'नाय ! नाय ! आम्ही नाय म्हटलं अडीच आणं ! तीन तीन आणं म्हणालीस बाई तू, म्हणून आम्ही आमच्या मोळ्या टाकल्या. तिची अडीच आण्याची असेल, नाय, नाय, नाय ! नगत आम्हांसी तुझं पैसं ! मोळ्या दे परत आमच्या !' असा कोलाहल करीत दोघीतिघींनी आपले पैसे फेकले नि भाऱ्या उचलू लागल्या ! अर्थातच शेठाणी संतापली. तिचा वडील मुलगा दारातच होता त्याला ओरडून म्हणाली, गंप्या ! उचल ते पैसे नि हात लावू देऊ नको या लुच्च्या बायांना त्या मोळ्यांना !'

गंप्या हा हायस्कुलात शिकणारा उंच नि दंडम पोऱ्या होता, तो लगेच धावला.

पैसे उचलीत गंप्याने दटावले, 'हट् दूर ! हात लावशील मोळीला तर ध्यानात धर ! हो हो ! देत नाही जा ! पैसे नाहीत नि मोळ्या पण देत नाही जा ! लबाडी करता काय ?'

शेवटची युक्ती पण फसली ! 'बुडव बाई आम्हां बापड्यांना.' 'लूट केलीस बया आमच्या मोळ्यांची' असे शाप तोंडाने देत त्या भारेवाल्या बायांनी शेवटी फेकलेले पैसे अडीच आण्याच्या भावानेच परत घेतले. ते वाटून घेण्याच्या अवधीत मागचा सगळा रागलोभ त्या विसरल्या आणि नेहमीच्या प्रघाताप्रमाणे मोळ्यांच्या सौद्यात भांडणापायी उणावलेले उत्पन्न गोडीगुलाबीने भरून काढण्याचा ठराविक असा दुसर अंक चालू झाला.

‘ पाणी तरी दे वया थोडं ! ’ ‘ लोणचं दे ग ताई लेकराला एक फोड ! ’

‘ शिळा घास हाय का एखादा ? थोडा भात-भाकर तरी इवलीशी दे ग मावली. ’ असे गयावया करू लागल्या. ‘ जात कोण ’ ते आधी विचारून शेठाणीने जातीच्या कोष्टकानुरूप कोणाला ओंजळीने, कोणाला तपेली देऊन पण यथेच्छ पाणी पाजले, थोडी शिळी ताजी भातभाजी हातांवर टाकली. त्या भारेवाल्या बायांनी सौद्यात लबाडी केल्याचा शेठाणीसही राग उरला नाही – मोळ्या फार स्वस्तात गेल्याचे दुःख भारेवाल्याही विसरल्या. दोघांनाही त्या ठराविक बाचाबाचीची नि हो – नाची सवयच होती – रीतच होती ती – शिष्टाचारच होता तो मोळ्यांच्या व्यवसायामधला !

थोडेसे हुश्श्य करून त्या बाया तो भाकरतुकडा खात नि पाणी पीत बसल्या. झुंजुरक्यापासून जे भारे डोक्यावर वाहात आपल्या खेडेगावाहून त्या नगरानगरातून घरोघर भर दुपारपर्यंत हिंडत हिंडत त्यांची कंबरडी बसली होती, नाकी नव आले होते ! आणि शेवटी तो लाकूडफाटा तोडून आणून विकीतो झालेल्या कष्टांची मिळकत झाली अडीच आणे !

त्या शेठजीच्या घरासमोरच आपल्या माडीच्या खिडकीत रामभाऊ उभे होते. त्या मोळीवाल्या बापड्या बाया शेठजींच्या पुढच्या दारी मोळ्यांच्या अडीच आणे की तीन आणे दराविषयी घासाघीस करीत असताना ती ते पाहात होते. त्या बाया शेठजींच्या मागच्या दारी मोळ्या टाकण्यासाठी बोळात वळेतो त्यांना दिसल्या नि त्यांच्या कष्टाळूपणा-विषयीचे विचार रामभाऊंच्या मनात घोळत होते. शेठजीच्या मागल्या दारी शेठाणीची नि त्या बायांची तिकडे गडबड चालली असताच इकडे शेठजींच्या पुढच्या दाराशी, हातातील एक डमरू ‘ डुम डुम डुमक्, डुम डुम डुमक् ’ असे वाजवीत एक बुवाजी आणि त्याच्यामागे एक नंदीबैल नि एक गाय असे लटांबर येऊन ठेपले. सारी वाट अडवून तो बुवा शेठजींच्या पुढच्या दाराशी तळ ठोकून डमरू वाजवीत ओरडू लागला —

‘ गोमातेला धर्म करा बाई ! अहो बाई, नंदीबैलाची पूजा करा ! ’

त्या बुवाच्या गळ्यात एक पायघोळ भगवी कफनी होती, वर एक रुद्राक्षाची माळ, डोक्याला भगवा फेटा, रंगाने काळा, उच्चारांचा अडाणी, दिसण्यात जन्मदरिद्री नि अजागळ पण चिंता किंवा विनय असा काहीच नव्हता त्याच्या चर्येवर वा ध्वनीत ! भीक म्हणून तो काही मागत होता असा कोणचाही भाव त्याच्या त्या ओरडण्यात नव्हता. उलट; त्या दारात तो येण्याच्या आधीच कोणीतरी 'धर्म' घेऊन आपल्या स्वागतास उभा नव्हता, बरे नव्हता तर नव्हता, पण आता मी दाराशी ओरडत असता अजून कुणी लक्षही देत नाही याचा त्याला राग येत चाललेला दिसत होता. तो याचना करीत नव्हता तर 'धर्माची' मागणी करीत होता ! नंदीबैल आणि गोमाता दोन दैवतांचा पुरोहित तो !

'काय ? कुणाला ऐकू येतं की नाही ? नंदीबैलाची पूजा नाही करायची का ? डुम डुम डुमुक डुम डुम डुमुक ! अहो बाई ? धर्म करा !'

त्या आरडाओरडीने एकदाची घरातील दोनचार मंडळी येतातशी पाहून त्याने धर्मोपदेशाचे संगीत छेडले; पण ते देखील कसे ? कोणताही भिकारी निदान एखादा अभंग, श्लोक, गाणे तरी पाठ करण्याचे श्रम घेतो. पण त्या नंदीबैलाच्या नि गोमातेच्या भांडवलावर चरितार्थ चालविण्याचे भाग्य पदरी असलेल्या साधुपुरुषास तेवढेदेखील कष्ट करावयाची आवश्यकता नव्हती ! त्याचा धर्मोपदेश, शीघ्रकवित्व, छंद–मुक्तछंद !! तो साधे गद्य जे सुचे तेच एका कोणत्या तरी सुरात मनात येईल तिथे मनात येईल तो शब्द ताणीत वा आखडीत बोलणेच गाऊ लागला ! त्यातील प्रकार साधारणतः असा —

'द्या ऽऽ हो बाई । द्या गोमा ऽऽ तेला कपडा कु ऽऽ डता द्या । हळदकुंकू गो ऽऽ मा तेला महादेवाचा । चा ऽऽ नंदीबै ऽऽ ल देवाचा ऽऽ नंदीरा ऽऽ जा । पैसा ऽ पैसा । गोमाता तेतीस ऽऽ कोटी देवांची । ची ऽऽ पैसा चारा घाला ऽ हो बाई । ध ऽ र ऽ म करा ऽ बा जी ।। डुम् डुम डुमुक । डुम डुम डुमुक । डुम डुम डुमुक् । द्या हो बाई । नंदी माग ऽऽ तो पैसा ऽऽ दानाचा ! महादे ऽऽ वाचा ऽ ।। '

तो गोंगाट ऐकून शेठाणीही पुढल्या दाराशी आली, तिला पाहाताच

साधुबुवा धर्मोपदेशकाच्या अधिकारी स्वरात म्हणाला –

' माई ! दारी नंदीराजा आला, महादेवाला दान दे ! ही आदिदेवी गोमाता कामधेनू दारी आहे, तिच्यावर दया कर ! चाऱ्यासाठी धर्म काहीतरी कर ! — काय मागतोस नंदीबा ? पाठीवर एक कपडा ! हातातले दावे प्रश्नार्थकपणे बुवाने खेचताच नंदीने मान हालविली ! पोरे हसली. शेठाणीही हसल्या नि चार आण्यांचा तुकडा त्यांनी गाईवरून ओवाळून त्याला दिला ! '

रामभाऊही हसले – पण उपहासाने ! महादेवाचा जो नंदी, त्याला म्हणे फाटकातुटका कपडा पाठ झाकायला हवा ! त्यासाठी महादेव माणसापाशी दान मागतो आणि जिला हा आदिदेवी कामधेनू म्हणतो त्या गाईला म्हणे चाऱ्यासाठी भीक घाल ! कामधेनू चाऱ्यासाठी दारोदार भटकते ! ! ह्या भिकाऱ्यांना भीकदेखील सुसंगतपणे कशी मागावी, ते कळत नाही ! ! भीक मागणारे एकपट मूर्ख, तर भीक घालणारे दसपट मूर्ख ! धार्मिक भाबडेपणाने साध्या शब्दांचा अर्थही कळेनासा होतो. इतर सर्व व्यवहारात जे डोळस नि चाणाक्ष तेही आंधळे नि मूर्ख होतात. कधी न फसणारे हौसेने स्वतःस फसवून घेतात ! मघा त्या कष्टाळू मोळीवाल्यांशी सुद्धा अडीच की तीन आणे दर, इतकी बारीक घासाघीस ज्या ह्या शेठाणीने केली, तिने घसदिशी या ऐतखाऊ भिकाऱ्याला नंदीबैलाची नुसती ओवाळणी म्हणून चार आणे देऊन टाकले ! जी कामधेनू, ती भीक मागेल तरी कशी, हा प्रश्नसुद्धा तिच्या मनात आला नाही !

शेठाणीने खुणावल्यावरून तिच्या मुलीने हळदकुंकू आणून त्या गाईला लावले, नंदीलाही लावले नि नमस्कार केला. इतके झाले तरी तो गलेलठ्ठ साधू आपले डमरू डुमुक् डुमुक् वाजवीत भिकेचा पाल्हाळ करीतच होता. ' चारच आणे दिले ते गोमातेला पुरेसे नाहीत. हा नंदी कपडा मागतो, देवाच्या घरी तू देशील त्या दानाच्या शंभरपट तुला परत मिळेल ग बया । ' म्हणून मागतच होता, नि डमरू वाजवून नि दावे हिसडून आपल्या मागण्या नि वचने महादेवाच्या नंदी देवाचीच आहेत, असे प्रमाणपत्र देण्यासाठी त्या नंदीबैलाची मान हालवून त्याचा

होकार घेतच होता. त्याची कामधेनू ही काडी खा, त्या कचऱ्याच्या ढिगात तोंड खुपस, अंगणाच्या बाहेर आलेल्या झाडाचा फांदीपाला ओरबाड, अशी मागेपुढे वाट अडवून वावरत होती.

इतक्यात त्याच वाटेने नगरसंस्थेची ( म्युनिसिपालिटी ) मोठी मैला-गाडी आली. त्या गाडीवर नगराच्या मैल्याने भरलेल्या गाडीवर आडवा ठेवलेला एक बंद अवजड बंब होता. त्या ओझ्यांना दिवसभर वाहणारा एकच बैल जुंपलेला होता नि नगरसंस्थेचाच भंगी तिला हाकीत होता. मध्यान्हपर्यंत घामट, ओंगळ नि अवजड ओझे उचलीत, फेकीत, बंबात भरीत, गाड्यावर चढवीत उतरीत तो भंगीही त्या बैलासारखाच मेटा-कुटीस आलेला होता. निढळाच्या घामाच्या, काबाडकष्टाच्या, रक्ताच्या केलेल्या पाण्याच्या धारा त्या बैलाच्या नि त्या भंग्याच्या डोक्यावर नि तोंडावर निथळत होत्या. बारा वाजण्याच्या आत ती मैलागाडी कशीबशी ठिकाणावर पोचवून भाकरीच्या मधल्या सुटीत घरी जातो कधी, नि थोडा मोकळा होतो कधी, असे त्या भंग्याला होऊन गेले होते. आपली गाडी तो मार्गातून शक्य तितक्या सावध वेगाने जरी हाकीत होता, बिचारा बैल हूं का चूं न करता जरी ती ओढीत होता, तरी त्या भंग्याच्या मैलागाडीच्या घाणीने आलेल्या शिसारीचा राग, आजूबाजूच्या घरातील लोक नि मार्गावरील साबणचुवट लब्धप्रतिष्ठित त्या भंग्यावरच काढीत होते ! त्याला अद्वातद्वा बकत नि तिरस्कारीत ' हट जावो ! ' ' वाट काय अडवतो आहे हा गाढव ! ' ' अरे रामा ! आली ह्या चांडाळाची गाडी ! ' ' अरे ले जाव साला जलदी ! घाणीनं जीव नकोसा करतात हे हरामखोर ! ' अशा अपशब्दांचा नि धमक्यांचा मारा जो तो त्या बिचाऱ्या काबाडकष्ट करीत मेटाकुटीस आलेल्या भंग्यावर करीतच होता ! जणू काय ज्या घाणीने त्या दूषक नागरिकांचा जीव त्यांना नकोसा होत होता, ती मैलाबंबातील गाडाभर घाण त्या भंग्यानेच केली होती ! जणू काय ती ह्या दूषक नगरसभ्यांनी केलेलीच नव्हती ! पण जे घाण करणारे, तेच नागरिक नाकास रुमाल नि उपरणी लावून ती त्यांची नगरघाण काढणाऱ्या नि नेणाऱ्या भंग्यालाच नेहमी अत्यंत तिट-काऱ्यानेच हिडीसफिडीस करतात, हा किती अधम अन्याय आपल्या

हातून प्रत्यही घडत असतो, हे आपल्या बहुधा ध्यानात येत नाही! भंग्याची गाडी पाहाताच आपण जेव्हा चटकन आपल्या घाणीचा राग त्या बिचाऱ्यावर काढतो नि त्याची चहूबाजूंनी हिडीसफिडीस होते— 'घाणीने जीव नकोसा करतो हा गाढव, भर वाटेनं मैलागाडी नेऊन!' तेव्हा आपण ध्यानात धरावे की, कोणत्यातरी वाटेनं ते घरोघरच्या मैल्याचे डबे नि शेवटी गाडी नेण्याची त्या भंग्याला काही हौस नसते! तुम्ही विमानातून वरचेवर अलगत ती मैलागाडी नेवविली वा खालून पाताळातून, तर तो ती तशी नेईल; आणि विशेष हे गाढव तसे अत्यंत घाणेरडे काम करून ती मैलागाडी दाखविलेल्या वाटेने तशी हाकीत असता तुम्हांला क्षणभर तुमचा जीव नकोसा करतो—म्हणूनच तुम्ही दीडशहाणे सभ्यजन तुम्हांला हवा तो जीव जन्मभर सुखरूपपणे उपभोगू शकता, नगराचे स्वास्थ्य नि आरोग्य निर्वेध राहू शकते!

ती भंग्याची गाडी तिकडून जो येते, तो ह्या भीकमाग्या साधूचे ते लटांबर ती वाट अडवून उभे होते. भंग्याने दोनदातीनदा ओरडून सांगितले की, 'ते गायबैल बाजूला घ्या! ए बुवाजी!' पण भीक मागण्याच्या त्या त्याच्या रडगाण्यात तो बोवा मग्न होता, त्याच्या त्या गायबैलालाही त्या भंग्याने हॅट हॅट करून पाहिले; पण त्या पशूंना नंदीबैल नि कामधेनूपणाचे भीकमागे पावित्र्य आल्यापासून त्यांना सहसा कोणीही वाटेत हिडीसफिडीस करीत, हुसकीत वा चपराकीत नसल्यामुळे आपण एक अवध्यच नव्हे, तर अताड्य दैवी जीव आहोत, अशीच जणू काय जाणीव असलेली दिसली. मारील तर हा आपला साधू धनीच आपणांस मारील— बाकीचे लोक पूजाच करणारे – त्यांचे काय ऐकायचे, अशी सवयीने जणू त्यांना निश्चिती पटलेली असल्यामुळे त्या भंग्याच्या हॅट-हॅटला न जुमानता ती गाय नि नंदीबैल वाटेतून दूर म्हणून होईनात. तो साधूही ऐकेना. हा घोळ पडला आहे, तोच त्या भुकेल्या गाईला तो मैल्याचा वास येऊन ती बंबाच्या पुढच्या टोकाला खेटून जिभेने चाटू लागली. तिला जरी म्हटली आदिदेवी जगज्जननी गोमाता— तरी होता तो एक पशूच!

निरुपायाने ती गाडी थोपवून तो भंगी थोडा थांबतो तोच आजू-

बाजूच्या घरांतून, वाटसरांतून नि प्रत्यक्ष शेठाणीच्या तोंडातून एकच धिक्कार उठला ! ' ए भंगडा, हाक ती गाडी ! घाणीने जीव नकोसा केला या गाढवानं ! – अरे, हाक ! ने ती ब्याद एकदाची येथून ! '

भंगी ओशाळला. जसा काही तो कोणी चोर चोरी करताना धरला जातो आहे, असा घाबरला ! त्याने गाडीच्या बैलाला एक चाबूक हासडून गाडी पुढे घातली. मैलाबंबाचे पुढील टोक चाटणारी गाय मधे लुडबुडू लागली, म्हणून तिला त्याने चाबकाच्या काठीने मागे ढोसली.

हे पाहाताच तो गलेलठ्ठ भीकमाग्या ' साधू ' एखाद्या सैतानासारखा खवळून, ' ए साल्या ! त्या माझ्या पवित्र गोमातेला शिवलास ? मारलंस ? तुझ्या... ' अशा आईमाईवरून शिव्या हसडून त्या साधूने एक धोंडा उचलून भरकन त्या भंग्याला मारला. थोडे चुकले म्हणून तो भंग्याला लागला नाही. यासाठी दुसरा टोला उचलून तो साधू त्या भंग्यावर फेकू पाहात आहे तोच सारा प्रकार पाहून खवळलेले रामभाऊ माडीवरून ओरडले, ' हां ! ध्यानात धर ! ए भिकारड्या, जर त्या भंग्याला मारलंस तर—! थांब आलोच मी खाली ! ' असे ओरडत रामभाऊ मागच्या पायी जिना धडधड उतरले आणि वाटेशी आले.

' टाक तो दगड खाली ! वाटेतून दूर हो ! भिकारड्या ! ऐतखाऊ ! तो बिचारा भंगी काबाडकष्ट करून आपल्या निढळाच्या घामावर पोट भरतो. ती आपली गाडी हाकीत असता त्याची वाट अडविलीस ती अडविलीस नि उलट त्यालाच्च शिक्षा देतोस, मारतोस ! ' रामभाऊ गरजले.

' मग माझी पवित्र गोमाता त्यानं विटाळली, तिला ढोसलं ते नाही का दिसलं तुम्हांला ? ' भिकारडा साधू दटावू लागला, ' गाईला तो शिवला, ती मला शिवली, मलाही विटाळ झाला ! हे कसं पाहात नाही तुम्ही ? '

' तेवढंच पाहात नाही मी, तर मघापासून मी हेही पाहात आहे की, तुझी ही पवित्र गोमाता आपण होऊन मोठ्या आवडीनं तो मैलाबंब चाटीत होती ! मग तेव्हा नाही का ती बाटली ? आणि त्या भंग्याचा विटाळ तुला झाला म्हणून जे म्हणतोस ना, त्याचं असं की, जर कोणी

शिवलं म्हणून विटाळ होत असेल, तर काबाडकष्टांवर स्वतःचं पोट भरणारा नि अत्यंत किळसवाणं काम तेन्ह आपल्या वाट्याला घेऊन समाजाची घाण स्वच्छ करून समाजाच्या आरोग्याची साधना करणारा हा भंगीच तुझ्यासारख्या ऐतखाऊ साधुड्यापेक्षा अधिक पवित्र आहे; त्याच्या शिवण्यानं विटाळ होत नाही. होतच असेल, तर तुझ्यासारख्या ऐतखाऊलाच जो शिवतो त्याला विटाळ होतो!'

'मी ऐतखाऊ काय! मी दिवसभर आमच्या ह्या नंदीबैलाचं दर्शन लोकांना घडविण्याचे कष्ट करीत नाही की काय? आज तीन पिढ्या आमचा धंदा आम्हीही करीत आहो!'

'तर मग तूच एक ऐतखाऊ नसून तुझ्या तीन पिढ्या ऐतखाऊ आहेत म्हणायच्या! समाजाचं कोणतंही उपयुक्त काम न करता दारोदार भीक मागत फिरायचं ह्याला का बाबा धंदा म्हणतात? कष्ट म्हणतात? भीक मागणं हाही एक धंदाच आहे, अशी तुम्हां भीकमाग्या लक्षावधी लोकांची सोयीस्कर समज असते हे खरं. त्याचा दोष जितका तुमच्यावर आहे तितकाच तुम्हांसारख्या ऐतखाऊंना पोसण्यातच धर्म घडतो असं मूर्खपणानं समजणाऱ्या ह्या आम्हा भीक घालणाऱ्या लोकांचाही आहे हेही खरं! पण म्हणूनच आता यापुढं अशा ऐतखाऊंना भीक घालणं हा धर्म नसून अधर्म आहे, असं लोकांना शिकवणं आम्हांस भाग आहे हेही खरंच!'

गंप्याला ते म्हणणे तत्काळ पटले! तो होकार भरू लागला, 'अगदी खरं आहे बरं भाऊंचं म्हणणं. मी मघाच ताईला म्हणालो की, देऊ नकोस चार आणे चटकन ह्या ऐतखाऊला म्हणून. त्या बिचाऱ्या कष्टाळू भंग्याच्या डोक्यात दगड घालण्यापेक्षा या आळशी भिकारड्याच्या डोक्यात दगड घालायला हवा बरं का ताई!' शेठाणीला गंपूने बजावले!

'दगडच नको काही घालायला! त्याची खोड मोडायची म्हणजे त्यांना कोणी भीक घालू नये म्हणजे झाले! भीक मिळते आयती म्हणूनच ते भीक मागण्यालाच धंदा म्हणतात ती भीक अशा नंदीबैल घेऊन मिरवत राहणाऱ्यांना न घातली की बसतोच त्यांचा भिकेचा हा हा धंदा!' रामभाऊने शेठाणीकडे पाहिले.

शेठाणीताई आपली बाजू सावरू लागल्या, ' अहो भाऊ ! पण त्या नंदीबैलानं नि ह्या गोमातेनं काय केलं आहे पाप ? ह्या भिकाऱ्यावर काही मी दया केली नाही, तर त्या नंदीबैलावरून नि गाईवरून ओवाळून टाकली ती पावली ! ते तर दैवत आहे ना ? '

' पशूला दैवत म्हणणंही पापच ! पण जर म्हणायचंच ना, तर ह्या भंग्याच्या गाडीचा हा बैलच ह्या नंदीबैलापेक्षा अधिक पूज्य, दयार्ह नि देवलसी म्हटला पाहिजे बरं ताई. हा भंगीबैल पाहा बरं समाजाचे काबाडकष्ट किती करतो आहे ! हे घाणीचे जिवापाड बोजे सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो वाहात असतो. त्याला एक सोडून चार पेंढ्या चारा घाला. त्या चाऱ्यावर समाजाचं केवढं हित साधता येईल ! पण ह्या भिकारड्या साधूनं समाजाच्या कष्टावर स्वत:सच ऐतखाऊ बनविलं नाही, तर ह्या त्याच्या बैलालाही ' नंदी ' नि गाईला ' आदिदेवी ' बनवून ऐतखाऊ करून सोडलं आहे ! समाजाचं शेता, गाडीभाडं असं कोणतंही उपयोगी काम न करणारा हा बैलही ह्या भिकाऱ्यानं ऐतखाऊ करून सोडला ! हा माणूस बैल नि तो ह्याचा नंदीबैल ! दोघांच्याही श्रमांना समाज अंतरतो ह्या भाबडेपणापायी ! एक रिकामटेकडा ऐदी मनुष्य नि एक रिकामटेकडा ऐदी बैल ! दोघांना समाजाला म्हणजेच तुमच्या-आमच्यासारख्यांना, व्यर्थ पोसावं लागतं ! त्यापेक्षा ह्या नंदीबैलाला जुंपावा नांगराला नि ह्या माणूसबैलाला धरावा समाजाच्या वेठीला, हेच योग्य नव्हे काय ? तोच खरा धर्म !

' आणि ह्या गाईचं तरी काय ! अहो भाऊ ! भाऊ ! ' गंप्या हसला, मी दोन दिवस धर्मशाळेपाशी पाहातो आहे की, हा बुवा तिला नावाचा चारा घालतो; तिचं दूध काही पितो व काही विकतो ! दुसऱ्याच्या पैशाचं गवत नि दूध पितो हा ! ' गंप्या खो खो हसला !

' खरं काय रे साधुबुवा ? ' शेठाणी पण थोड्या तिरस्काराने हसली. ' इश्श, मला हे माहीत असतं तर मी पावली तर काय पण गवताची काडीदेखील घातली नसती ह्याला ! पण नंदी पूजावा हा धर्म –'

' ह्या धर्मछापानंच डोळ्याला अंधेरी येते ताई आपल्या ! नाहीतर त्या मोळीवाल्या बायांच्या चार आणे मोळीच्या थापांना कसं डोळस-

पणानं परीक्षून पाहिलंत ! त्या मोळीवाल्या बायांनी जर तुम्हांला सांगितलं असतं – 'बाई, ह्या सोन्याच्या मोळ्या आहेत, तेव्हा ह्यांना चार आणे देशील तर तुला देवाच्या घरी सोन्याच्या मोळ्या मिळतील,' तर तुम्ही हसला असतात ! त्यांना म्हणाला असतात, 'ह्या मोळ्या एवढ्या सोन्याच्या आहेत तर तू का दारोदार चार आण्यावारी विकीत फिरतेस !' पण हा लुच्च्या जेव्हा म्हणाला, 'बैल, नंदीदेव आहे, ही गाय कामधेनू आहे' तेव्हा तुम्ही त्याला काही हासडलं नाहीत की, 'जर ही कामधेनूच तुझ्या घरी तू पाळतोस तर तू दारोदार भीक का मागतोस ? गाईला, नंदीला चारा घालणं हा धर्म आहे तर तू आपल्या देहास कष्टीव, चार पैसे मिळव नि त्यातून त्या गाईनंदीला पोसून स्वतःच त्या धर्माचं पुण्य का जोडीत नाहीस ?' पण तो विचार काही तुम्हांला सुचला नाही; कारण गाईला चारा द्यावा, नंदीला पुजावं हा धर्म आहे, हे पोथ्यातून तुम्ही ऐकलेलं ! मोळीवाल्यांना दान द्यावं, मागतील त्या दराने मोळ्या घ्याव्या, हा धर्म आहे, असं पोथीनं शिकवलं नाही ! ताई, आता यापुढे तरी मोळी घेताना जसे डोळे उघडून वस्तू पारखून घेता, तसाच धर्म पण पारखून घ्यावा ! नाहीतर आंधळेपणानं केलेला धर्मच असा अधर्म होतो. कोणत्याही भिकाऱ्याला पारखल्यावाचून 'धर्म' करणं हे पाप आहे. तेच दान, काबाडकष्ट करून समाजाची कामं करतात, दुसऱ्यानं मिळवावं नि यांनी खावं, असे आळशी, ऐतखाऊ नाहीत, अशांनाच जे देणं ते दान द्यावं. पोटचा मुलगा जर न मिळवता घरबशा झाला तर त्यालाही आपण सांगतो की, धंदा कर तर जेवायला मिळेल ! पण नुसती एक कफनी किंवा रुद्राक्षमाळा किंवा टाळ विकत घेण्यापुरतं तेवढं भांडवल हे लुच्चे लोक खर्चतात आणि त्या भांडवलावर जन्मभर 'साधू' 'बुवा' बनून, समाजाचा पैसा उकळून, चरितार्थ चालवितात ! ते आळशी, लुच्चे, ऐतखाऊ बनतात ! समाज त्यांना पोसण्यात त्या मानानं दरिद्री बनतो ! दोन्ही पापं अशा आंधळ्या दानानं आपणा स्वतःस न कळत लागतात ! न्यूनात न्यून दहा लक्ष भिकारी आपल्या समाजाचं धनरक्त असं

गोचिडांसारखं आज शोषीत आहेत !'

'भाऊ, आता पुन्हा कोणीही असा नंदीबैल्या वा मरतुकडी गाय घेऊन लोकांच्या धर्मभावनेवर धंदा करीत, तिच्या नावे मिळालेल्या पैशावर स्वतःचं पोट भरीत नि तिचं दूध स्वतःच गट्ट करून गलेलठ्ठ बनत फिरणारा भोंदू माझ्या दाराशी आला ना, तर बघा मी त्याला एक दमडी तरी देतो का ते ! ए ताई, तुला गाईला धर्मच करायचा ना, तर एक छान गाय स्वतःच विकत घेऊ तिला खूप चारा पाणी घाल, नि स्वतःच पाळ ! नंदी देव म्हणशील, तर शेतीत राबणारा बैलच खरा नंदी. कारण त्याच्या कष्टानं नांगर-ओखर करून जो धान्य उगवितो नि घरीदारी सगळ्यांना जो आनंदवितो, तोच खरा नंदी ! त्याला शेतावरून थकून जाताना हिरवीचार गवताची पेंढी सोडीत जा– !' त्या शेतकऱ्यांना चवली पावली त्या नावे देत जा. गंप्या धर्मोपदेशक बनला !

'आणि त्या घरी पाळलेल्या गाईचं दूध एकदोन निर्धन पण सच्छील विद्यार्थ्यांना प्यायला देत जा हवं तर ! किंवा गाईची वीण नि समाजाला प्रत्यक्ष उपयोगी असे गुण वाढविणाऱ्या ज्या गोरक्षण संस्था असतील, त्यांतील गाईच्या खिल्लारांना ते दान देत जा हवं तर !'

'पण ऐकलंत का ताई, गाय नि बैल पशू आहेत – समाजाला उपयुक्त पशू आहेत – म्हणून त्यांचा समाजाला उपयोग होईल, अशा पद्धतीचं दान दिलं तरच पुण्य, ही दृष्टी धरा की, मग तुमचं दान आपोआप डोळस होईल नि त्या पशूंची उपयुक्तता वाढेल. अशाच प्रकारं पारखून दान देण्याची तुमच्यासारख्या व्यवहारचतुरांना बुद्धी होईल. पण गायबैल ह्या स्वयमेवच देवता आहेत, असा धर्मछाप डोळयांवर मारून ठेवलात की, तुमच्या दानबुद्धीचे डोळे फुटून हा असा आंधळा धर्म तुमच्याकडून अधर्म घडवीत गेलाच म्हणून समजा !'

'आणि गंप्या, नंदीबैलवाले हे असे आले म्हणजेच नव्हे, तर कोणीही भिकारी दाराशी आला की, त्यालाही हेच सांगत जा की, समाजाला उपयोगी असा काहीतरी उपार्जक कष्ट तू करतोस की नाही ते आधी बोल ! काम कर नि पोट भर ! काम नसलं तर मी तुला झेपेल ते काम देतो. ते काम देणं एवढंच खरं दान ! कामाचं प्रतिमूल्य त्याला दयेनं

योग्य वाटलं तर थोडं अधिक द्या, पण ऐतखाऊ भिकाऱ्याला नुसती कफनी वा रुद्राक्ष घालतो वा शंख फुंकतो म्हणून दमडीची देखील भीक घालू नका ! '

इतक्यात रामभाऊंना घरात कोणी हाक मारली 'आलो अं' असे म्हणून ते लगबग घरात निघून गेले. ते दिसेनासे झाले, असे पाहाताच तो नंदीबैलवाला तावातावाने म्हणाला, 'तो मैलागाडीवरचा एक भंगी तर हा बामन सवाई भंगी दिसतो ! देतेस ना एखादा कपडा नंदी-राजाची पाठ झाकायला ?' डुम डुम डुमुक् डुम डुम डुमुक् ! – त्याचे भिकेचे डमरू पुन्हा वाजू लागले !

'चल चालता हो येथून !' दंडम गंपा ओरडला !

ताई म्हणाली, 'गंप्या भांडतोस कशाला ! फार तर देऊ नये त्याला काही ! तू जा अं बाबा आता ! पावली दिली न तुला !'

ताई अजून बोटचेपी आहे असे तर्कून त्या साधूने आपल्या त्राग्याचे शेवटचे अस्त्र सोडले ! भावड्या लोकांपुढे त्रागा केला की अधिक दान हटकून मिळते, निदान दिलेले कोणी परत घेत नाही, हा ह्या भिक्षे-कऱ्यांचा नेहमीचा बहुधा अचूक अनुभव असतो. 'घे ताई घे ! तुझी ही पावली पण घे परत ! देव बघून घेईल ह्या तुझ्या पोराला ! गोमाता, नंदीराजा. महादेव—'

तोच त्याने फेकलेली ती पावली पटकन उचलून गंप्याने अक्राळ-विक्राळ अवसानाने त्याच्यावर चालून जाऊन दटावले, 'चल, होतोस की नाही येथून चालता ! होतोस की नाही ?'

त्याबरोबर तो नंदीबैलवाला एकदम दबला आणि नंदीचे दावे ओढून दहा पावले चुपचाप मागे हटला. पण तेथून पुन्हा एकदा अगदी गया-वया करीत 'माझी पावली तरी दे रे दादा ती परत !' म्हणून त्याने हात पसरला ! पण गंप्याचा तो 'चालता हो !' पुन्हा गडगडताच पुन्हा चुपचाप पुढे चालता झाला, गंप्या पण काही बडबड करीत घरात परतलेला जेव्हा त्या साधूजींना दिसला, तेव्हा एकदा त्यांनी स्वतःच्या मनासमोर तरी स्वतःची पत राखण्यासाठी झालेल्या अपमानाचा सूड उगवला – ओठातल्या ओठातच त्या गंप्याला, एक शिवी हासडून,

'हा एक तिसरा भंगीच दिसतो ! ह्या आळीत भंग्यांचेच बेटे राहातातसे दिसतात सगळे !'

तिथेच ती आळी संपली होती आणि गंप्याच्या मागच्या दाराशी जाणारा बोळ लागला होता. गंप्याचे मागचे दार त्या बोळातच उघडते ही कल्पनाच नसल्याने, नवी वाट म्हणून साधू, त्याचा नंदी नि ती कामधेनू असे ते सारे लटांबर त्या बोळात घुसले. इतक्यात त्या दारातून त्या मोळीवाल्या बाया हातात मोळ्यांच्या सुट्या घेऊन, त्यांना मिळालेल्या त्यांच्या काबाडकष्टाच्या त्या अडीच अडीच आण्यांच्या प्राप्तीत किती मीठ–मिरची–तेल विकत घ्यायचे ते बेत योजीत तिकडून येत होत्या, त्या त्याला भेटल्या. त्या नव्या गिऱ्हाइकांना पाहाताच साधूचे डमरू पुन्हा वाजू लागले—

'डुम डुम डुमुक्, डुम डुम डुमुक् ! !

'गोमाता ! कामधेनू ! द्या ऽ वा हो चारा पैसा द्यावा ऽ ऽ हो । काही दान नंदी ऽ ऽ राजाला । घाला ऽ ऽ हो । पै ऽ सा पू ऽ ऽ जा ऽ । हो नंदी रा ऽ जा । डुम डुम डुमुक् ! डुम डुम डुमुक् !'

साधूची चर्पटपंजरी सुरावर चालू झाली. त्या मोळीवाल्या बायांनी नंदीला नमस्कार केला. गाय तर अगदीच आडवी आली. साधू हात पसरून पसरून 'ध ऽ र ऽ म गायी ऽ ला ! गायी ऽ ला ।' म्हणून पिच्छा पुरवू लागला. गायीच्या नावे त्या बायांना नाहीच म्हणवेना. त्या आपसांत कुजबुजून एक-दोन पैसे काढून आता त्याच्यापुढे फेकणार तोच –

'ए बायांनो, थांबा ! दमडीसुद्धा देऊ नका त्या लुच्च्या भिकारड्याला !' असा दरडावणारा आवाज आला !

गंप्याचाच तो आवाज ! पण ही ब्याद बोलते आहे कुठून असे गोंधळून त्या साधूने बोळाच्या तोंडाकडे वळून पाहिले, तो गंप्या तिथे नाही ! पुढे पाहिले तो गंप्या त्याच्या मागच्या दारातून खवळून बाहेर पडताना दिसलाच त्या भयभीत साधूजींना !

'बायांनो, देऊ नका काहीएक ह्या असल्या भोंदू भिकाऱ्याला ! हा माणूस बैल नि हा त्याचा नंदीबैल दोघेही ऐतखाऊ आहेत ऐतखाऊ ! आणि तुम्ही ? कुठे रानावनात श्रमून ती लाकडे तोडलीत, फोडलीत,

पहाटेसच भारे बांधून खेड्यातून नगरात अनवाणी येऊन तो बोजा माध्यान्ही दिवस येईतो डोक्यावर वाहून दारोदार भटकलात, तेव्हा कुठं अडीच आणे पदरात पडतात ! ते तुमच्या निढळाच्या घामाचे पैसे हा ऐतखाऊ आता आयते उपटणार ? देऊ देणार नाही मी ते त्याला ! त्या अडीच आण्यांत तुमच्या घरच्या मुलालेकरांना मीठ, मिरची, तेल ते तुम्ही काय नेणार ! ए साधू. अरे, तू त्यांना या पशूवर ' दयाधरम ' करायला सांगतोस पण त्यांच्या लेकरांची दया तुला नको का यायला ? आपल्या मुलालेकरांच्या तोंडाचा घास हिसडून, बायानो, कशाला ग देत होतात तुम्ही त्याला पैसे ? गंप्याने कळवळून विचारले.

' गोमातेच्या पायाचा अंगारा देत होता साधू आम्हांला ! '

' साधू ! भोंदू आहे तो भोंदू ! पशूच्या पायाचा अंगारा माणसांना विकतो ! बायांनो, तुमच्या घरी शेतीचे बैल नि गायी, गुरंढोरं असतीलच ना ? मग त्या कष्टाळू गुराढोरांचा अंगारा आपल्या माथी लावीत जा जर काही लावायचाचं तर ! कारण ते पशू तुमच्या कामास तरी येतात ! हे पाहा, ह्या ऐतखाऊ साधूला मघा माझ्या आईने चार आणे दिले होते दान म्हणून ! ते कुपात्री दान मी देऊ दिलं नाही सत्पात्री द्यावं म्हणून ! जा, हे घ्या ते चार आणे ! तुमची ती मुलंलेकरं नि तुमची ती गुरंढोरं दानाला खरी सत्पात्र ! घ्या हे. '

' नग नग आम्हांसनी ते, दादा ! ' त्या बाया अगदी कळवळून म्हणाल्या, ' तुझं पैसं आम्ही कशापायी घेणार ! काबाडकष्ट करून खातो दादा आम्ही दोन घास, अंधळ्या पांगळ्या थोड्याच आहोत ! आम्हां-सनी कशाला हवं दान ! '

' ए साधू ! ऐकलंस का ? दिसत आहे का हे तुला ? बघ ह्या कष्टाळू बायांची थोर हृदयं ! अरे तुझ्या त्यांच्यात खऱ्या साधू ह्या मोळीवाल्या आहेत, नि तू निव्वळ भोंदू ! आता तरी सोडून दे हा ऐतखाऊपणा आणि हे अंगारा विकणं ! अरे, जर कोणाच्या पायाचा अंगारा लावाय-चाच ना, तर त्या तुझ्या ऐदी पशूच्या पायाचा अंगारा ह्या बायामाण-सांना लावण्यापेक्षा ह्या काबाडकष्ट करून समाजाच्या काहीतरी उपयोगी पडणारी कामं करून त्यावर पोट भरणाऱ्या त्या भंग्याच्या, ह्या मोळी-

वाल्या शेतकरणी कामकरिणींच्या पायांचा अंगारा तुलाच लावावयास हवा ! समाज जो अजून जीव धरून आहे तो ह्यांच्याच काबाडकष्टांवर होय ! तुझ्यासारखे माणूसबैल, नि ही पशुपूजा, नि हे अंगारे; नि ही ऐतखाऊ साधुता, नि हे तुझे नंदीबैल ही समाजाच्या भाबडेपणाची मैलागाडी आहे—त्या भंग्याच्या मैलागाडीहूनही तिरस्कार्य, टाकाऊ ! कारण त्या भंग्याच्या मैलागाडीचे शेतांना तरी खत होते–पण ह्या भाबडे-पणाच्या मैलागाडीने बुद्धिभ्रंशाची रोगराईच काय ती जिकडे तिकडे फैलावते ! उपयोग असा काही नाही ! बायांनो, दान म्हणून नाही, पण तुमच्या लेकरांना खाऊ म्हणून फुटाण्यासाठी मी ते देतो हं चार आणे बरं ! ओशाळू नका ! घ्या ते अं ! '

गंप्याने बळे बळे ती पावली मोळीवालीच्या हाती टाकली. त्या भिकाऱ्याच्या तावडीतून सुटून त्या बाया बोळाबाहेर पडेतो गंप्या तिथे उभा राहिला. तो बाबा त्या बोळाच्या दुसऱ्या तोंडाकडे जात आहे असे पाहिले, तेव्हाच काय तो गंप्या घरात परतला.

गंप्या दिसेनासा होताच त्या साधूच्या पोटात साचलेला गंप्यावरचा सारा राग एकदम वर उसळला आणि त्याचा वचपा ज्या एकाच वस्तूवर त्या भिकारड्याला काढता येण्यासारखा होता, त्या वस्तूवर, म्हणजेच त्याच्या नंदीबैलावर त्याने हातातील काठीचा एक रट्टा असा बळाने हाणला की, तो बिचारा बैल धूम पुढे पळाला. आणि लगेच मागे वळून गवतकाडी वेचून खात रेंगाळत चालणाऱ्या त्या बिचाऱ्या गाईच्या नाकावरच त्याने दुसरा रट्टा हाणला की, गाईला देवता न मानता केवळ एक उपमुक्त पशू म्हणूनच काय ते मानणाऱ्या मनुष्याचेही हृदय त्या निष्कारण क्रूरतेने कळवळून यावे ! ज्या नंदीला देव आणि गाईला देवी म्हणून लोकांनी पोसावे असे ढोंग तो लोकांना शिकवी, त्यांनाच तो भोंदू स्वतः पशूइतक्या देखील दयेने वागवीत नव्हता ! असे हे नंदीबैल काहीतरी दहा हजार आणि ऐतखाऊ रुद्राक्षे टाळकुटे, भोंदू दहा लाख गावगन्ना भटकत आहेत ! समाज जर गंप्यासारखा होईल, तर अशा दहा लाख ऐतखाऊंना काम करून पोट भरणे भाग पडेल ! भोंदूपणाचा नि भाबडेपणाचा रोग प्लेगासारखाच समाजाला पोखरीत आहे ?

## ५. अंगरख्याला माणसे बेतणारा शिंपी

माणसाच्या अंगास जुळेल असा अंगरखा बेतणारे शिंपी आपणा सर्वांच्या चांगल्या परिचयाचे आहेतच. माणूस उंच असेल तर अंगरखा लांब होईल इतके कापड फाडून त्या माणसाच्या छातीचा घेर जितका रुंद असेल तितका अंगरख्याचाही घेर रुंद धरून आणि ज्या माणसाला अंगरखा शिवायचा असेल त्याच्या हाताच्या लांबीप्रमाणे अंगरख्याच्या बाह्या लांब वा आखूड अशा कापून, एकंदरीत त्या माणसाला ठीकठाक बसेल असा अंगरखा शिंपी बेततात; मनुष्याच्या आकाराप्रमाणे अंगरखा मोठा वा लहान कापतात.

पण अंगाला जुळेल असा अंगरखा न कापता अंगरख्याला जुळेल असे अंगच कापणारा शिंपी तुम्ही पाहिला आहात काय? त्याच्या अंगरख्याचा आकार ठरलेला आहे. तो अंगरख्याचा आकार काही कधीही बदलणारा नाही, इतका घोळ, इतकी लांब बाही, इतकी मोठी मान. त्या ठरलेल्या आकारापेक्षा निराळा अणुमात्र अधिक मोठा किंवा अधिक लहान असा अंगरखा शिवणे वा घालणे हे त्या जातीच्या शिंप्यांच्या शास्त्रात पाप समजले जाते. प्रत्येक माणसाने अंगरखा म्हटला की, तसाच घातला पाहिजे. अगदी शिवणाचे टाके देखील ठरलेले. ह्या नियमामुळे त्या जातीच्या शिंप्यांच्या दुकानी कोणीही माणूस गेला की, ते शिंपी त्या मनुष्याच्या अंगाप्रमाणे अंगरख्याचे कापड फाडीत नाहीत, तर त्यांच्या त्या ठराविक अंगरख्याप्रमाणे त्या माणसाचे अंग बेतून घेतात. त्या अंगरख्यापेक्षा माणूस लहान असेल तर त्याने अंगरख्या-इतके मोठे होईतो उघडे फिरावे किंवा अंग लहान असले तरी तो अंगरख्याचा लफ्फालोळ तसाच, जसा जमेल तसा, अंगावर वागवावा. अंगरखा अंगात घालण्याच्या ठायी अंगच अंगरख्यात घालावे. बरे, पण जर अंगरखा अंगास लहान होईल असा मनुष्य आला तर? तरी देखील शिंप्यांची ही जात अंगरख्याच्या त्या ठराविक प्रमाणापेक्षा अधिक

मोठ्या आकाराचा अंगरखा बेतणार नाही, ठराविक प्रमाणाहून जास्त कापड कापणार नाही, तर अंगरख्यास अंग बेतून घेईल. अंगरख्याची बाही शास्त्राप्रमाणे जितकी लांब असावी म्हणून त्यांचा पूर्वापार जाति-नियम आहे त्या बाहीहून जास्त लांबीचा हात असल्यास ते शिंपी गिऱ्हाइकाचा हात कापतील, बाहीची लांबी वाढविणार नाहीत, अंगरख्याच्या शास्त्रीय मानेहून त्या माणसाची मान अधिक घेराची असल्यास हे शिंपी ती मान तासून बेताची करतील, पण अंगरख्याच्या मानेचा घेर वाढवून त्यांच्या जातीचा परंपरागत कुलधर्म ते मोडणार नाहीत.

त्यांच्या जातीच्या ज्या कोण्या एका महनीय पूर्वजाने ह्या सृष्टीच्या उत्पत्तीच्या पहिल्या दिवशी ब्रह्मदेवाने दिलेल्या कापडाचा पहिला अंगरखा शिवला त्या कापडापेक्षा अधिक पातळ वा अधिक जाड कापड वापरणे किंवा कोणास वापरू देणे म्हणजे हे शिंपी एक अधार्मिक कृत्य समजतात. एक ठराविक प्रकारच्या कापडाचा तो ठराविक साच्याचा अंगरखा घालून माणसाने अत्यंत थंड अशा उत्तरध्रुवावर असो किंवा अत्यंत उष्ण अशा सहारा वाळवंटाच्या आसपासच्या प्रदेशात असो, राहिले पाहिजे. जर ते त्यास करवत नसेल तर त्याहूनही उत्तम मार्ग म्हणजे त्या कापडाचा अंगरखाच वापरणारे धार्मिक लोक ज्या गावात वसत आले त्या गावाच्या बाहेर काही झाले तरी जाऊच नये. गावात भीक मागण्याचा प्रसंग आला आणि बाहेर कुठे जरी सोन्याच्या खाणीत फुकट सोने धुवायची सोय असली तरी त्याने त्या सोयीसाठी आपल्या गावची अटक ओलांडता कामा नये. कारण न जाणो तिकडे तो अंगरखा बदलण्याचा मोह पडायचा !

ह्या शिंपीधर्माचा आणखी एक महत्त्वाचा सिद्धान्त आहे. तो हा की, मनुष्य पापी की पुण्यवान, थोर की हलकट, उच्च की नीच हे त्या मनुष्याच्या अंगच्या गुणावगुणावरून ठरविणे पाखंड आहे. तर तो मनुष्य ह्या ठरविक प्रकारच्या लांबीरुंदीचा हा धार्मिक अंगरखा घालतो, की आपल्या अंगास येईल नि बदलत्या वायुमानास जुळेल असे भिन्न आकाराप्रकाराचे अंगरखे बदलीत राहतो ह्या वरून तो धार्मिक वा अधार्मिक, सात्त्विक वा तामसी, साधू वा ठग आहे ते ठरविले पाहिजे.

जर तो अंगरखे अंगास बेतील तर तो हलकट असलाच पाहिजे; जर तो आपले अंग त्या शास्त्रीय अंगरख्यास बेतील तरच तो थोर होय, साधू होय, धार्मिक होय !

अशा या शिंपीधर्माच्या शिंपीमंडळीस त्यांच्या अंगरख्यास आपली अंगे बेतू देणारी माणसे तरी, गिऱ्हाइके तरी, कसची मिळणार ? असे जर आपणांस वाटेल तर ती चूक ठरेल. कारण ह्या ठराविक अंगरख्यावाचून दुसऱ्या प्रकारच्या अंगरख्यास मनुष्य केवळ आपल्या अंगाच्या लांबीरुंदीच्या वा वायुमानाच्या सोई-गैरसोयींच्या बदलत्या आवश्यकतेप्रमाणे वापरील तो माणूस घोर अशा नरकात 'सान्वय' पडेल असा शाप देणारी एक पोथी ह्या शिंपी जातीच्यापाशी आहे; आणि ती पोथी कोण्या मनुष्याने लिहिलेली नसून प्रत्यक्ष ईश्वराने स्वतःच्या चाकूने स्वतःचा बोरू तासून त्या स्वतःच्या लेखणीने स्वतः लिहिलेली आहे अशी मुसलमानांची निष्ठा आहे. म्हणजे हिंदूंच्या वेदाला ज्या अर्थी हिंदू 'श्रुति' म्हणतात त्याच अर्थी 'कुराण' ही मुसलमानांची 'श्रुति' आहे. यास्तवच त्यात दिलेले बारीक सारीक आचारदेखील त्रिकालाबाधित म्हणून मानले जाऊ लागले. इतकेच नव्हे तर महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर त्यांचा घालावयाचा जो अंगरखा असे तो देखील त्यांच्या राजदंडाप्रमाणेच मुसलमानी धर्मपीठाच्या आणि राजपीठाच्या अध्यक्षत्वाचे एक प्रतीक — न बदलता येणारे दिव्य चिन्ह—समजले गेले. महंमदमहाशयांच्या मृत्यूनंतर त्यांच्या गादीचा धनी आणि मुसलमानांचा सर्वोच्च धर्माध्यक्ष म्हणून जो झाला त्यास खलिफा म्हणत. आणि खलिफासच काय तो महंमद पैगंबराचा पवित्र अंगरखा घालण्याचा अधिकार असे. खलिफाच्या पदवीसाठी अनेक इच्छुक उभे राहात, लढत, परस्परांच्या हजारो सैनिकांच्या कत्तली करीत, मुसलमान मुसलमानांच्या रक्ताचे या यादवीत पाऊस पाडीत आणि एकेका वेळी निरनिराळ्या भागांत तीन तीन निरनिराळे प्रबळ सेनापती स्वतःस खरा खलिफा तो मीच म्हणून म्हणवीत राज्य करीत. त्यात बगदादच्या ओमेयेड खलिफांचा वंश मोठा प्रबळ निघाला. महंमदाचा राजदंड, धर्मदंड नि हा पवित्र अंगरखा त्यांच्याच हाती असे.

ह्या बगदादच्या खलिफात काही खलिफा मोठे प्रबळ आणि साधुशील असे निपजले. ते महंमदाचा हा पवित्र अंगरखा धर्मोपदेशाच्या वेळी घालीत.

जो खलिफापदास योग्य ठरेल किंवा ते पद छिनावून घेण्याइतका प्रबळ ठरेल त्याला खलिफा होताच अंगरखा घालण्याला अधिकार येई. पण भावड्या धर्मभावनेची शेवटी जी विकृती होत जाते तीच मनुष्य-स्वभावानुसार मुसलमानांतही होत जाऊन जो पूज्य खलिफा असेल त्याच्या अंगात हा पवित्र अंगरखा असतो हे पाहाता पाहाता हा पवित्र अंगरखा ज्याच्या अंगात असतो तो खलिफासारखा पूज्य होय अशी वृत्ती बोकाळली !

आपल्या इकडे पूज्य संन्यासी असतो, तो भगवी कफनी घालतो; हे पाहाता पाहाता ज्याच्या अंगावर भगवी कफनी दिसते तो सन्याशासारखाच सहजगत्या पूज्य वाटू लागला आणि भगवी कफनी पाहिली की संन्यासी म्हणून चोरांनाही सन्मान नि भिक्षा मिळविणे अगदी सोपे होऊन बसले. तशीच हीही गोष्ट.

अशा बुद्धिहीन धर्मभोळेपणाची शेवटी त्याच बगदादच्या मुसलमानी राजधानीत इतकी पराकाष्ठा झाली की, खलिफाचा हा अंगरखाच जवळ-जवळ खलिफा होऊन बसला ! खलिफापदाला योग्य ते गुण त्या व्यक्तीत असोत वा नसोत, तिच्या अंगावर हा पवित्र अंगरखा आहे का? असल्यास तो खलिफा ! दुबळ्या-खुळ्या अनुयायांचे पुढारीही दुबळे खुळे असेच निपजतात. ओमेयेड खलिफांचीही तशीच अवनती झाली. खलिफापदावर विक्षिप्त व्यक्ती येऊ लागल्या. पण बाह्य आचाराच्या पोकळ मुखवट्यालाच जिथे मुख म्हणून समजले जाऊ लागले तिथे मुखवटा तेवढा सांभाळला की पुरे होई. अशाच पडत्या काळी या पवित्र अंगरख्याने मोठ्या गमती केल्या ! उदाहरणार्थ, या ओमेयेड वंशातील या पडत्या काळाचा खलिफा दुसरा वालिद याचीच गोष्ट पाहा !

ह्या खलिफा वालिदला, मुसलमानी साम्राज्याचा सम्राट नि अवघ्या जगाचा धर्माध्यक्ष, 'शंकराचार्य' ह्या नात्याने राजधानीतील भव्य मशिदीत प्रार्थना चालवायची असे; त्या समारंभासाठी जायचे असता एका

वेळी त्याला आळस आला. यास्तव त्याने आपल्या एका सुंदर रमणीला खलिफापदाचे मुख्य प्रतीक असा तो ' पवित्र ' अंगरखा घालून प्रार्थनेचे पौरोहित्य करण्यास धाडली[1] ! ! अवघ्या मुसलमानी साम्राज्याच्या वतीने मुसलमानी धर्माचा खलिफा म्हणून तिने प्रार्थना चालविली आणि खलिफाच्या त्या पवित्र वेषाचा तो अधिकार खलिफाप्रमाणेच समजून त्या रमणीची ती प्रार्थना खलिफाच्या प्रार्थनेप्रमाणेच त्या धर्मनिष्ठ अनुयायांनी अनुवादिली ! ! व्यक्ती कोणीही कशीही असो – तो मुख्य खलिफा नव्हे; मुख्य खलिफा म्हणजे तो खिलाफतीचा पवित्र अंगरखा !

पुढे अनेक उलाढाली होत होत अरबी मुसलमानांची सत्ता आपसांतील हाणामारीत इतकी दुर्बळ झाली की, बगदादच्या खलिफांच्या वाड्यात पगारी तुर्क, मूळचे मुसलमानी धर्माचे अनुयायी नसून ते आपल्या शौर्याच्या बळावर ह्या मुसलमानी खिलाफतीच्या सत्तेस खाऊन टाकीत आले होते. खलिफा त्यांच्या हातातले बाहुले झाले. कोणास गादीवर बसवावे, कोणास काढावे ते ह्या भाडोत्री तुर्की सैन्याचे सरदार ठरवीत ! अशा एका प्रबळ तुर्क सेनापतीचे प्राबल्य असता आब्बासाईड खलिफा वासिक हा वारला. मरणाच्या आधी आपला वारस सांगण्याचा अधिकार खलिफाकडे असे. त्याप्रमाणे त्या खलिफा वासिकने मरणाच्या आधी सांगितले की, ' माझ्या मागे माझा मुलगा खलिफा व्हावा. '

ती रीतच होती. मुसलमानी समाजाने खलिफाची आज्ञा शिरोधार्य करून म्हटले, ' ते मूलच खलिफा करावयाचे ! '

पण ते त्या तुर्क सेनापतीस इष्ट नव्हते. त्याला त्याच्या पुढ्यातील एका खलिफावंशीयास खलिफा बनवावयाचे होते. ते खरे कारण न सांगता तो इतकेच म्हणाला, छट् खलिफाचा मुलगा, ते मूल, खलिफा होण्यास अयोग्य आहे ! ! '

' का अयोग्य ? '

खलिफाच्या आज्ञेला लाथाडून दुसरा मनुष्य खलिफा करण्यास त्या मुसलमानांच्या धर्मभावनेस पटेल असे काहीतरी कारण सांगणे भाग होते.

---

१. हिस्टरी ऑफ सारासेन्स–अमीरअल्ली पृ. १९६.

तुर्क सेनापतीस आपल्या मनातले कारण सांगता येईना; कारण ते धार्मिक कारण– ‘ सनातनी ’ कारण नव्हते. बरे तो मुलगा लहान आहे म्हणून खलिफापदास शोभेसा दुसरा कोणी पराक्रमी या साधुशील पुरुष हवा हे कारणही अप्रस्तुत होते. कारण पराक्रमाच्या दृष्टीने व्यक्ती योग्य की अयोग्य हा प्रश्न त्या मुसलमानी बहुजनांचा मुळी नव्हताच. ते बहुतेक त्या धर्मभोळया ‘ सनातनी ’ शिंपी जातीचेच लोक ! व्यक्ती कशी असो– तो योग्यतेचा ठराविक जुनाट मुखवटा तिने घातलेला आहे ना ! एवढाच त्यांचाही प्रश्न असणार ! खलिफा सांगेल तो त्याचा उत्तराधिकारी हा धर्मदंडक. त्याप्रमाणे तो मुलगाच खलिफा व्हावयास योग्य ! मग तो अयोग्य का म्हणावा ?

केवळ धर्मभोळेपणाच्याच आक्षेपाची अडचण असल्याने त्या धूर्त तुर्क सेनापतीने धर्मभोळेपणालाच तंतोतंत पटेल असे, त्या मुलाची अयोग्यता निर्विवादपणे सिद्ध करणारे कारण सांगितले.

तो तुर्क सेनापती म्हणाला, ‘ जरी खलिफाने मरताना त्या आपल्या मुलास खलिफा करण्यास सांगितले असले तरी तो त्या खलिफापदास अयोग्य आहे, कारण, तो इतका लहान आहे की, खलिफा होण्यास जो एक मुख्य संस्कार करावा लागतो तोच त्यास करता येणार नाही. खलिफास जो अवश्यमेव घातलाच पाहिजे तो पवित्र अंगरखाच मुळी त्या मुलाच्या अंगास येत नाही. तो अंगरखा नि तो धर्मदंड त्यास झेपणार नाही, फार मोठा होईल. यास्तव तो मुलगा खलिफापदास अयोग्य. तो अंगरखा ज्याच्या अंगास होईल नि तो धर्मदंड ज्यास झेपेल असा माणूस खलिफा हवा ! ’

‘ सनातनी ’ जातीच्या शिंपीशास्त्रास तो शास्त्रनिर्णय अगदी धरून होता. खलिफापदास शोभेल असा योग्य पुरुष कोण ? खलिफापदाचा तो जुनाट, पवित्र अंगरखा ज्याच्या अंगास होईल तो ! त्याप्रमाणे त्यांनी तो अंगरखा ज्याच्या अगास होईल असा खलिफा नेमला ! अंगरख्यास माणसे बेतणारा शिंपी असावा तर असा !

—१९३४

* * *

## ६. बाळंतीण

तो गाव दहाबारा हजार हिंदू वस्तीचा. एक पडवीसारखी धर्मशाळाही, बोर्डाने बांधलेली, गावच्या मध्यवस्तीपुढील वाटेच्या टोकास होती. आज त्या धर्मशाळेपाशी पाचपंचवीस लोक जमून हे करताहेत तरी काय, असे वाटेने जाताना स्वतःशी पुटपुटत, श्री गोदास सुखे तिकडे वळले. पाहातात तो एक मरतुकडी, वाटचुकार नि वीण संपलेली एक जख्खड गाय तिथे मटकन बसलेली आहे आणि जमलेले ते दहापाच लोक एकमेकांस विचारीत आहेत, ' मारले ? कोठे ? कुणी ? गायीला छडी मारली ? '

गायीला छडी मारली हे शब्द ऐकताच गोदास सुखे त्या लोकांस हाताने ढकलीत एकदम गाईजवळ गेले. त्यांना पाहाताच एका मुलाने सांगितले की, ' ही जख्खड गाय चार दिवस संध्याकाळी येथे बसलेली असते. शेजारच्या एका काम करणाऱ्या मनुष्याने वाटेत आली म्हणून तिला माझ्या समक्ष छडी मारली. मी ओरडलो नाही—नाहीतर तो मला मारता. पण तिला वाटेतून उठवून तो गेला, तेव्हा मी या दोघाचौघा जात्यायेत्यास ते सांगितले. हे पाहा इथे मारले ! ' असे म्हणून त्याने गाईच्या पाठीकडे बोट दाखविले. पण तिथे वळबीळ काही दिसत नव्हता. गोदास सुखे अगदी मोठमोठ्याने बोलण्याच्या आवेशात येऊन मुलास फटकारू लागले; ' चूप भित्र्या ! गोमातेला छडीने मारणाऱ्या त्या माणसाचा तू शिरच्छेद का केला नाहीस ? गाय वाटेत येऊन बसली होती, तर माणसाने वाट सोडून गटाराच्या बाजूने जायचे होते. छडी मारून तिला उठविणारा असला वाटसरू कसाईच असला पाहिजे. बिचारी म्हातारी गाय ! आईसारखी पूज्य ! तुम्ही इतके हिंदू लोक इथे टकमका बघत असता तिची जोपासना करण्याचा यत्न एकजण तरी करतो आहे काय ? '

असे म्हणत गोदास सुखे यांनी आपल्या उपरण्यातील एक गोग्रास-पेटी बाहेर काढली आणि खुळखुळवीत सगळ्यांपुढे फिरवली, ' गोग्रास-

भिक्षा घाला!' एका दोघांनी तीत चवली-पावली टाकली.

गोदास सुखे एक फिरते गोसेवक होते. पूर्वी ते एका संस्थेच्या वतीने हिंडत. पण त्या संस्थेने त्यांचे नाव लबाड म्हणून छापले, त्यांनी ती संस्था लबाड म्हणून छापले, आणि आता ते स्वतंत्रपणे गोसेवाप्रचार करीत करीत त्या गावास अलीकडेच आले होते. त्या गाईचे प्रकरण पाहून त्यांना थोडे मनापासून वाईटही वाटले. नि आपले प्रचारकार्य प्रस्तावि-ण्यास हे प्रत्यक्ष उदाहरण त्या गावी चांगलेच उपयोगी पडेल अशीही अटकळ त्यांनी बांधली. लगेच त्या गाईस उठवून त्यांनी एक दावे तिच्या गळयात बांधले नि ते धरून एक गोसेवागीत म्हणत त्या घोळक्या-सह ते रस्त्याने चालले.

जे त्यांचे मूळचे नाव गोपाळराव, ते त्या गोरक्षणसंस्थेत ते होते तोवर वापरीत असत. पण त्या संस्थेतून ते जेव्हा फुटून निघाले तेव्हा त्या संस्थेविषयी त्यांनी जे आक्षेप आणले त्यात हाही एक आक्षेप होता की, कोणत्याही हिंदू संस्थेने गोरक्षण संस्था म्हणविणे म्हणजे हिंदुधर्मास कलंक लावणे होय. कारण गाय ही हिंदूंची देवता. तिचे पूजन, सेवन, भजन करणे हे हिंदूंचे कर्तव्य! पण स्वतःस गोरक्षणकर्ता म्हणवणे म्हणजे देवतेचे रक्षण मनुष्य करतो, असा विपरीत भाव प्रकटवून त्या देवतेची थोरवी नि शक्ती मनुष्याहूनही कमी लेखणे होय; त्या देवतेची ती निंदा होय! गाय ही देवता, मनुष्य तिचे रक्षण करणारा, तिचे पालन करणारा, तिच्याहून कोणी महादेव आहे की काय? मनुष्याने 'मी गाईची सेवा करतो' असे म्हणणे शोभेल; 'गाईचे रक्षण करतो' असे म्हणणे म्हणजे देव दुर्बळ नि भक्त सबळ असे म्हणण्यासारखे होते. यासाठी साऱ्या गोविषयक हिंदू संस्थांनी गोरक्षणसंस्था हे नाव टाकून गोपूजक वा गोसेवक संस्था असे म्हणावे आणि प्रत्येक कार्यकर्त्याने स्वतःस गोदास, गोभक्त, गोरज इत्यादी गाईची थोरवी व्यक्तविणारी नावे घ्यावीत. गोपाळ हे नाव श्रीकृष्णास शोभेल, कारण तो गोदेवतेहूनही श्रेष्ठ असा जो जगाचा पालक त्या परमेश्वराचाच अवतार होता. पण मनुष्याने स्वतःस गोदेवीचे, या 'विश्वजननी'चे पालक वा रक्षक म्हणवून घेणे म्हणजे काय? असे सावेश प्रतिपादीत गोपाळराव सुखे यांनी भरसभेत आपले मूळचे गोपाळ

हे नाव टाकून गोदास सुखे हे नाव घेतले होते.

धर्मशाळेपुढे त्या गाईचा हा गौरव चाललेला असताना त्या पडवीवजा धर्मशाळेच्या आत समोरच एक पंचवीस वर्षांची बाई लक्तरे कमरेस गुंडाळलेली, जवळ एक चिंध्यांचे बोचके, एक दोन खापराची भांडी, तोंड अगदी रडकुंडी झालेले–कोणी दुरून पाहिले, की चटकन तोंड फिरवून घेणारी अशी–अगदी त्या गाईसारखी केविलवाणी होऊन एका कोपऱ्यात बसली होती. गाईची दया येऊन गोदास सुखे कळकळताना आणि स्वहस्ते त्या गाईस वारंवार कुरवाळताना पाहून तिला दहादा वाटले की, या दयाळू पुरुषापाशी जाऊन आपणही हात पसरावा. पण ती समाजाला भीत होती. त्या गावातील काही लोकांना ती गेल्या महिनाभर भीक मागत असता माहीत झाली असून ती बाळंतपणास टेकलेली दिसत असल्यामुळे तिच्याविषयी भल्याबुऱ्या गोष्टीही गावअड्यावर दबून दबून लोक बोलत आणि तिला घरापुढेही बसू न देता शिव्या देऊन हुसकून देत. म्हणून ती दबून बसली होती. पण त्या नव्या गोसेवक बुवांच्या दयाशीलतेचा आसरा त्या जख्खड गाईस देखील मिळाला -- गाईहून गाय झालेल्या मला तर मिळेलच मिळेल ! अशी योग्य अटकळ बांधून त्या गाईची मिरवणूक चालली असता लटपटत्या पायांनी ती आसन्नप्रसवा स्त्री, बुवा थोडे रस्त्याच्या कडेस झालेले पाहाताच त्यांच्यापुढे पदर पसरून उभी राहिली.

‘ मी चार दिवसांची भुकी ! बाळंतपणास टेकले आहे ! मला दोन पैसे– ! ’

तिचे ते वाक्य पुरे होण्याच्या आधीच बुवा चवताळले.

‘ भिकारडे, ह्या गोमातेच्या भुकेलाच पुरेसे पैसे जमत नाहीत; तिथे तू माणसासारखे माणूस – जा, काबाडकष्ट कर नि पोट भर ! गाईच्या तोंडचा घास हिसडून स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यास तुला लाज वाटत नाही ? माणुसकी आहे, की नाही तुला ? अहो आपल्या देशाचे कोट्यवधी रुपये ह्या ऐदी भिकाऱ्यांस पोसण्यास मातीत मिळतात. आणि या बिचाऱ्या जख्खड गोमाता भुकेने तडफडत राहतात. ’

इतक्यात बुवांच्या कानाशी एकाने त्या स्त्रीच्या पोटाकडे बोट दाखवून

कागाळी केली. त्यासरशी सात्त्विक संतापाने उसळून बुवा ओरडले,

' हुसका तिला ! अस्से काय ? काळतोंडी ! ' असे हातवारे करीत लोक गात असलेल्या पदाच्या पालुपदाची वेळ आलेली पाहून बुवांनी आपल्या उंच व घोगऱ्या आवाजाचीही त्या पालुपदात भर टाकली.

' गाईस द्याच भिक्षा । हा हिंदुधर्म रक्षा ॥ '

दोघाचौघांनी तेवढ्यात त्या बाईची चेष्टाही चालविली. पण इतक्यात रामभाऊ वैद्य तेथे आले आणि लोकांस तसे न करण्याविषयी सांगून बाईस आश्वासीत विचारू लागले, ' तू कुठली बाई ! सासरमाहेरचे कोणी नाही का तुला ? ' रामभाऊ तिच्याशी हे विचारतात न विचारतात तोच त्यांच्या दहापाच स्नेह्यांनी त्यांचा हात ओढीत एकच गोंगाट केला, ' हा ! हा ! रामभाऊ तिच्याशी काय बोलता ? तुमच्यासारख्या प्रतिष्ठित माणसावर नसते किटाळ येईल. पुढे चला – चला – आम्ही सांगतो सारे ! '

' गाईस द्याच भिक्षा । हा हिंदुधर्म रक्षा ॥ ' ह्या पालुपदाने सारा रस्ता दुमदुमवीत नि येत्याजात्यास अडवून पै-पैसा काढीत, त्या जखखड गाईची मिरवणूक पुढे चालली.

समोरून एक भारेवाली हिरव्यागार गवताचा भारा घेऊन येत होती. वाटेच्या अगदी कडेने ती चालली होती की त्या गाईच्या मिरवणुकीची वाट अडू नये ! गोदास सुख्यांचे लक्ष त्या बाईच्या आधीच त्या हिरव्या भाऱ्याकडे गेले. त्यांनी खूण करताच दोघा-चौघांनी बाईला अडवून ' भारा टाक ' म्हणून दरडावले. ' पैसे कोण देणार ? ' हे तिने विचारताच एकदम गलका उठला, ' गोग्रास गाय आहे ही ! धर्माच्या गाईच्या गवताचे पैसे मागतेस काय ? '

' पण मग घरच्या मुलालेकरांना तांदूळ कशाचे नेऊ दादा ! खातील काय ती आज ! '

' आणि ही गोमाता काय खाईल ! गोदेवीच्या नावे लेकरांना उपास करूदेत आजची रात्र ! स्वर्गात तुला कामधेनू मिळेल ! ' बुवांनी समाधान केले.

' बघता काय ? घ्या तो भारा तिचा ! ' असे म्हणत दोघे तिघे

भारा ओढू लागले. तेव्हा तिला आपला बचाव करण्याची शेवटची युक्ती सुचून ती म्हणाली, ' हा, हा ! मी म्हारीण ! विटाळाल दूर व्हा !'

तो तिच्या अटकळीचा परिणाम अगदी उलट झाला. झोंबून भारा ओढणारे ते लोक चेकाळले आणि तिच्या तोंडात देऊन ओरडले, ' तुझी पहिल्याने दातखीळ बसली होती काय ? चांडाळणी ! विटाळ झाला ना आम्हाला ! '

तिला सोडविण्यास रामभाऊ धावत आले. समाजास गोंजारून म्हणाले, ' त्या गाईसारख्या एका पशूला मघाचे कुरवाळता आहा — आणि महार माणूस असता, ज्याचा विटाळ मानता ? ही काय भूतदया की धर्म ? '

हे ऐकताच बुवा चिडले, ' अहो दीडशहाणे, गाईला पशू म्हणताना तुमची जिव्हा झडत कशी नाही ? गाय पशू असली तरी देव विश्वव्यापी; पशूत नाही की काय ? '

बुवास शांतविण्यासाठी रामभाऊ त्यांच्या पाठीवर हळूच हात फिरवीत म्हणाले, ' तर मग जो विश्वव्यापी देव पशूंतदेखील आहे, तो माणसांत नाही काय ? आणि महार माणूस नाही काय ? '

ह्या प्रश्नापेक्षा रामभाऊ महाराच्या स्पर्शाने विटाळले असता आपल्यास शिवून आपणासही विटाळवीत आहेत, याचाच जास्त संताप आल्यासारखे करून, त्या बिनतोड प्रश्नाने झालेली धांदल बुवांनी लपविली. त्या प्रश्नाकडून लोकांचेही लक्ष काढून, लोकांस पटणारी विटाळाचीच बाजू पुढे धरावी म्हणून बुवा रामभाऊंचा हात हिसडून गरजले, ' भंगी आहात भंगी ! महाराला म्हणे शिवा ! शिव शिव ! कोण पाखंड ! ' लगेच बुवांनी गाईचे शेपूट डोळ्यांवर फिरविले आणि त्या पशूच्या खुराखालची मूठभर माती—ते पावक गोरज, समाजाच्या अंगावर फेकून स्वतः तो अंगारा लावून त्या महार माणसाच्या झालेल्या विटाळाचे तात्पुरते प्रायश्चित्त केले. गाईच्या तोंडात त्या हिरव्या गवताचे जुडग्यावर जुडगे स्वहस्ते चारीत मिरवणूक पुढे चालली, ' गाईस द्याच भिक्षा । हा हिंदुधर्म रक्षा ।। '

वाटेत मुसलसान मिरवणुकीत सगळ्यास खेटत येत जात होते. काही फिदीफिदी हसून टवाळी करीत होते. त्यांचा विटाळ कुणाला झाला नाही, त्यांच्या वाटेस कुणी गेले नाही.

थोड्या वेळाने ते गोदासबुवा ज्या एका गोभक्त बाईच्या घरी उतरले होते त्या घराशी आले. त्या बाईचा मुलगा घरचा कर्ता, हिंदू संघटनाचा अभिमानी पण बुद्धिवादी ( Rationalist ) तरुण वकील. आईच्या भिडेने त्याने गोदासबुवांना घरीच उतरविले होते. दाराशी मिरवणूक येताच बुवांनी वकिलास आज्ञा सोडली की, त्या गाईला त्यांनी घरी पाळावी. वकील हसून म्हणाले, ' अहो, आमच्या घरास गोठा नाही, अंगण नाही; तुम्हां गोसेवकांना बंगल्यात उतरविले तेथेच गायीला बांधतो पाहिजे तर. त्या गायीला थोडे गवत घेऊन देतो—त्या मोकळ्या मैदानातील झाडाला बांधीत जा हवे तर !

इतक्यात त्यांची आई बाहेर आली. बुवांनी कथा सांगताच मुलावर रागावली नि म्हणाली, ' घराशी चालत आलेली लक्ष्मी विन्मुख दवडायची ? आजची रात्र तरी घरीच बांधायची तिला ! या ओसरीवर '— अगदी घरात बांधा. उचला त्या बैठकी ! तुझी वकिली बंगल्यात, खाली सत्ता माझी. बाईच्या आज्ञेसरशी वकील हसून चूप उभे राहिले.

गायीला वर आणली; गाद्या, बैठकी, खुर्च्या काढून ओटीचा गोठा केला, बाईंनी घरातून ताम्हनात आरती आणली. त्या मळमातीने बरबटलेल्या गाईस हळदकुंकू लावून, फुले वाहून ओवाळून, संतोषून वकिलास म्हणाल्या, ' तेहतीस कोटी देवांची पूजा एकत्रच करायची तर बाळ, गाईची पूजा करावी ! '

बुवा ठरीव गोसेवक ठेक्यात म्हणाले, ' सर्वाभूती परमेश्वर आहे ! ही आमच्या हिंदुधर्माची अत्युदार शिकवण अंगी बाणण्यासाठीच पाहिलीत ना गोपूजा हेच कसे उत्कृष्ट साधन आहे ते ? पशू नि माणूस ह्यांचे आत्मैक्य ! भूतदयेची परिसीमा ! '

दोनतीन दिवस ती गाय तेथेच होती. गोभक्त बाईचे हे धर्मकृत्य पाहून जो तो ' धन्य ' म्हणत होता. शेजारपाजारच्या बायांनी कुणी फुले आणून वाहिली, कुणी पक्वान्ने, चटण्या, भाज्या, खीर, तूप

यथास्थान वाढलेली पाने नैवेद्य म्हणून त्या गाईपुढे ठेवली. शेजारची एक वापडी बाई–मुले माधुकरी; पण तिने कानवल्याच्या गोग्रासाचे व्रत घेऊन नऊ कानवले गुळाचे करावे, आठ त्या गाईला सोवळ्याने येऊन चारावे नि एक पोटच्या माधुकरी मुलांना द्यावा! – गाईचा प्रसाद म्हणून!

अशा बडेजावात तीन दिवस गेल्यावर त्या गाईस एका शेठजींनी भक्तिभराने जेव्हा आपल्या घरी पाळावयास नेली तेव्हा दहापाच इतर भाविक मंडळींची तिला पाळावयास नेण्याची इच्छा पुरली नाही, म्हणून निराशा झाली.

इकडे त्या धर्मशाळेत – ? त्या मिरवणुकीत धक्काबुकी करून लोकांनी हुसकून दिलेली ती बाळंतपणास टेकलेली हिंदू स्त्री त्या धर्मशाळेत जाऊन त्याच कोपऱ्यात तोंड खुपसून रडत बसली. रात्री तिच्या पोटात भयंकर वेदना होऊ लागल्या. ते कण्हणे वाटेवरील दोघाचौघा हिंदूंनी ऐकले. धर्मशाळेत ते काय आहे ते बघण्यास गेले. पण एक बाई रडतकढत पडलेली पाहून 'आहे झालं कुठलीतरी ब्याद!' म्हणून तिटकारीत निघून गेले. एकदोघांनी तिला ओळखले. ते तर तिच्या बाळंतपणाचे लफडे आपल्या अंगाशी चिकटते की काय अशा शंकेने 'मरूद्यात! अहो ती–ती आहे! भोगील पापांची फळे! आम्हांला काय त्याचे! असे आपसांत कुजबुजत तेथून सटकले.

रात्री काळोख, डोळ्यांत बोट घातले तरी दिसेना अशा, त्या काळोखात त्या कोपऱ्यात ती बाई बाळंत झाली. तिने चिंध्यांचा एक काकडा बाळगलेला असे तो पेटवला. मूल पाहिले, ते जिवंत! नाळ कापायला काही नव्हते. दोन धारेचे दगड तिने कोपऱ्यातल्या ढिगाऱ्यातून घेतले नि त्याची आडवीतिडवी नाळ कापली. मूल किंचाळू लागले तरी लपेटून ठेवून पहाटे ती एकटीच गेली आणि जवळच्या नदीवर स्नान करून आली!

आपत्तीच कधी कधी आरोग्यप्रद असते, रामबाण औषध होते! न वाज, न सुईण, न शांतिपाठ, न शेक, न पाळणा! बाळंतपणाची कोण आकुल शुश्रूषा असावयाची! पण ते काही नसता ते मूल नि ती बाई

जिवंत राहिली. लोक येता जाता हसून बघत. शाळेतली वा भटकती मुले मात्र कधी जवळ येत, गंमत पाहून जात, पण सभ्य गृहस्थ असा कुणीही ढुंकला नाही. धर्मात्मा, भट, गोसेवक, साधू, ब्राह्मण, पाटील, शेठजी तिकडे कुणीही ढुंकला नाही ! ती गाय थोडीच व्यालेली होती की तिची सेवा ' हिंदू धर्म रक्षावया 'साठी आवश्यक असावी ? ती एक परित्यक्ता हिंदू स्त्री नि ते एक अनाथ हिंदू बेवारशी कारटे ! त्यांच्या रक्षणाशी ' हिंदू धर्म रक्षा ' वयाचा काय संबंध ! उलट त्यांची विचार-पूस करणेदेखील पाप, असभ्यता ! ! म्हणून तिकडे कोणी ढुंकला नाही ! अड्ड्याअड्ड्यावर टवाळी मात्र चालली. मधूनमधून कोणी विचारी दात विचकून स्नेह्यासोबत्यांत, ' का ? धर्मशाळेतल्या चिरंजीवांसाठी पेढे कोण वाटणार तुम्ही की काय ? '

पण रात्री नऊ वाजण्याच्या संधीस एक मनुष्य मात्र तिन्ही दिवस तिथे जाऊन येई. त्या बाईपाशी काही संबंध असला तर त्याचाच !

कोण तो ? कुणी साधू ? कुणी डॉक्टर ? अंधेरात चोरून का जातो असा ?

टवाळीच्या एका विषयापेक्षा त्या बाईची अधिक चूटपूट जर कोणास लागली असेल तर ती एका रामभाऊ वैद्यांना होती. त्या मिरवणुकीत बाईशी बोलताना त्यांना हात धरून ज्या स्नेह्यांनी हिसडले, त्यांच्या व इतरांच्या तोंडून त्यांनी इतके ऐकले होते की, ती बाई लहान असता तिचा नवरा मुंबईस बेपत्ता झाला. गेली पाचएक वर्षे ती शेजारच्या खेडेगावी एका मराठा पाटलाच्या घरी काबाडकष्ट करीत असे. तिला दिवस लोटल्याचे दिसताच त्या खेडेगावात हिंदुसमाजाने जातीचा प्रश्न काढला. पाटलाने तिला हुसकून दिली. मूल पाटलाचे असे ती म्हणते. मारहाण झाल्यामुळे खेडेगाव सोडून आली आणि मोठ्या गावी धर्मशाळेत येऊन बसली–त्या गाईसारखीच मटकन ! हे ऐकल्यापासून रामभाऊंस तिची दया आली. आणखी एक भीती त्यांना वाटली की, न जाणो, शेजारच्या मिशनबिशनच्या जाळ्यात तर ती फसणार नाही ना ? ते तिला पाहण्यास जाण्याचे मनात आणीत, पण त्यांना देखील ते साहस करण्याइतकी धमक मनात येण्यास तीन दिवस लागले. शेवटी समाज

काय वाटेल ते म्हणो, तिची चौकशी एकदा करायचीच, असे निर्धारून दोन तरुण विद्यार्थी बरोबर घेऊन ते भरदिवसा एका दुपारी धर्मशाळेत गेले. बाईपाशी थोडे शिळेपाके अन्न होते. त्यांनी गोड बोलून तिची माहिती विचारली; तो त्यांना कळले की, तिला जो एकच मनुष्य रात्री येऊन भेटतो, थोडे अन्न देतो, एकदोन फाटकी वस्त्रेही ज्याने दिली, तो दुसरा कोणी नसून होता त्या गावचा एक मुसलमान भंगी !

तो काय तिची दया येऊन भूतदयेसाठी ते दान देई? काही एक प्रतिमूल्य घेतल्यावाचून तो ते धर्मकृत्य करी? भुकेल्याला अन्न देणे हे धर्मकृत्य तो मानी म्हणून तो अन्न देत नसे, तर काफरास बाटविणे धर्मकृत्य होते अशी त्याची समजूत असल्याने तो ते अन्न त्या बाईस देई नि सांगे, 'बघ ! तू हिंदू, मुसलमानांचे खातेस; आता हिंदू राहिली नाहीस हं !' आणि त्या अन्नाचे प्रतिमूल्य म्हणून त्या बाईस त्याने सांगितले होते, 'ते मूल मला दिले पाहिजे अं, मी मागताच? – नाही-तर ठार मारीन ठार !!'

रामभाऊंना ती हकीकत सांगत असताच ती थरथर कापत होती – नाहीतर तो मुसलमान भंगी येऊन तिला नि त्यांना पण ठार करील ! रामभाऊंनी तिला धीर दिला, 'जर तुला आम्ही सर्व साहाय्य दिले तर तू त्या मुसलमानाचे अन्न घेणार नाहीस ना? मूल देणार नाहीस ना? तू हिंदुधर्माच्या रक्ताबीजाची ना?' तिच्याही अंगी आवेश येत होता, पण झटकन हताश होऊन ती म्हणाली, 'पण आता काय त्याचे? मी मुसल-मानाच्या हातचे खाल्ले आहे ! कोणता हिंदू मला जातीत घेईल? माझे मूल बिनजात ! ते हिंदू कसे राहील?'

'राहील ! ती चिंता तुला नको. मी रत्नागिरी हिंदुसभेचा या गावचा एक कार्यकर्ता आहे. आम्ही तुला जातीत घेऊ. प्रत्यही मी तुला अन्न नि मुलास दूध देईन ! पोलिसांना सांगून त्या मुसलमानास पायबंद घालीन. हे घे थोडे पैसे. अन्न नि दूध आत्താच धाडून देतो !'

कोण्या हिंदूच्या तोंडून असे शब्द ऐकण्याचा तिचा पहिलाच प्रसंग ! तिला सुद्धा मुसलमानाचे खाल्ल्यावर मनुष्य हिंदू राहतो कसा ते पटेना. पण साहाय्य मिळते ते पाहून ती चूप राहिली. रामभाऊंच्या पायावर

तिने मूल ठेविले. ' माझा धर्म वाचवणारा तू देवच भेटलास ! पण मला धर्मशाळेतून प्रथम घरी न्या. नाही तर तो मुसलमान मला खाऊन टाकील ! न्याल तर तुमच्या शब्दावर विश्वास ! ! '

रामभाऊ परत आले. थोडे अन्न नि दूध त्यांनी तिला पोचविले; पण ते नेण्यास त्या साऱ्या गावात एकदोन तरुणच काय ते धजले; बाकी ज्याला रामभाऊ विचारीत त्याने त्याने उलट ' बाटगा ! लुच्च्या ! याचा तर नसेल काही संबंध त्या बाईशी ? ' असे म्हणून रामभाऊंची पाठ फिरताच कुटाळकी करण्यास सोडू नये !

रामभाऊ स्वतः भाड्याच्या घरी राहात. त्यांनी त्या बाटलेल्या बाईस कोणाच्या तरी घरी आणण्याचा योजलेला बेत ऐकताच आगाऊच सावध राहावे म्हणून घरधन्याने सांगितले, ' आधीच तुम्ही महारास शिवून येऊन घरात विटाळ कालविता म्हणून कागाळ्या होतात. आता मुसलमानाचे खाल्लेल्या त्या भटक्या बाईची ब्याद जर आणणार असाल, तर घर सोडून चालते व्हावे लागेल. बाहेर काय नंगा नाच घालायचा तो घाला, आम्हांस उपद्रव नको ! '

रामभाऊ म्हणाले, ' मी आणीत नाही त्या बाईस बळेबळे तुमच्या घरी. पण ती गाय पाळावयास मागत होता तीही भटकीच नव्हती का ? मुसलमानांच्या हातचे तीही खाईच ना ? '

' पण तो पशू होता, पशुधर्म तो... '

' हाय हाय ! तर मग हे समजत असूनही त्या पशूस गोठ्यात ठेवता, सोवळ्याने पूजता, तिचे गोमूत्र पिऊन तिला पक्वान्नाचे गोग्रास स्वहस्ते घालता ! मग ही हिंदू बाई तर माणूस, मूल मराठ्याचे, माणसाचा जीव तो, त्याला मुसलमानांच्या हातून सोडवून हिंदूने घरी आणून दोन घास – ! ' रामभाऊंनी वाक्य पुरे करण्याच्या आधीच घरधन्यांनी त्यांचे तोंड बंद केले.

' पूर्वीचे ऋषी गाढव नि तुम्ही शहाणे ! कुठे ती कुलटा नि ते बिनवारशी कारटे, कुठे ते महारडे आणि कुठे ती विश्वजननी पवित्र गायत्री गोमाता ! होऊ द्या मुसलमान तिला ! अशा कुलटा मुसलमानात गेलेल्याच बऱ्या ! '

'अशाच हिंदूंतून हिसडलेल्या स्त्रियांच्या पोटी हिंदूंचे कट्टर शत्रू जन्मले ! आणि हे मूल ? मुसलमान होताच अठरा वर्षांच्या आत ह्याच गायत्रीस मारणारा एक कसाई होईल ! त्याचा वंशचा वंश गोमांस खाणारा – गोघ्न होईल. गोभक्तांची संख्या घटून गोघ्नांची वाढेल ! तेव्हा गोसेवेच्या दृष्टीने देखील ! '

' पुरे करा ते ब्रह्मज्ञान ! मला माझे घर बाटवून घ्यावयाचे नाही ! बस्स ! '

रामभाऊ त्या गावी शेठजींच्या, भटांच्या, मराठा पाटलांच्या शक्य त्या त्या घरी हिंडले. ती मरतुकडी गाय पाळावयास सिद्ध झालेल्या भूतदयावान लोकांपैकीसुद्धा कुणीच त्या बाईस आश्रय देईना, गोठ्यात-देखील राहू देईना ! मग इतरांची गोष्टच बोलणे नको !

तो गाव बारा हजार हिंदू वस्तीचा. मुसलमानांची वसती तीनशे माणसांची असेल नसेल. ह्या बारा हजार हिंदूंस त्यांच्या धर्माची एक स्त्री नि एक मूल परधर्मात जात आहे याची रेसभर चिंता नव्हती ! एक घर, अंगण, गाईला मिळणारा गोठादेखील कोणी त्या बाळंत बाईला देईना ! त्या तीनशे मुसलमानांतील बाया देखील त्या ' काफर ' स्त्रीला नि मुलाला इस्लाम धर्मात कसे ओढून, बळाने देखील पळवून आणता येईल, याचा कट करीत होत्या. आपल्या गोषातदेखील वेळी तिला लपवून ठेवू म्हणून आपण होऊन त्या कटास पाठिंबीत होत्या.

तिकडे त्या धर्मशाळेत तो मुसलमान भंगी, रामभाऊंनी अन्न दिले त्याची गुणगुण कळली म्हणून लगोलग संध्याकाळ होते न होते तो तिथे आला. बाईने माहिती सांगताच ते पोर हिसकू लागला. बाई ओरडू लागली. एकदोन करता करता वीसपंचवीस हिंदू तिथे जमले, पण दूर ! त्या मुसलमानाने ' काफरांस ' काफरांच्या धर्मास शिव्यांची लाखोली वाहिली ! त्या बाईस मूल देत नाहीस तर टाक माझी चीजवस्तू म्हणून दरडावले. तिचे चिंध्यांचे गाठोडे नि मुलावरचा लुगड्याचा तुकडादेखील त्याने हिसकला. मूल उघडेवाघडे घेऊन ती बाई कोपऱ्यात स्फुंदून स्फुंदून रडत हिंदूंकडे बघत होती की कुणी पुढे यावे ! पण कुणी पुढे होईना ! मुसलमानाने ते कपडे घेतले, धर्मशाळेसमोर भर वाटेवर त्यास

आग लावली आणि कोण तुला कपडा नि खाणे देतो ते बघून घेईन ! मी रात्री पुन्हा येईन ! त्याला नि तुला ठार करीन ! अशा धमक्या देत त्या होळीपाशी ठाण मांडून राहिला !

त्या दाटीत ते गोदासबुवाही थोडा वेळ उभे होते. त्याच धर्मशाळे-समोर मटकन बसलेल्या गाईच्या पाठीवर एक छडी कुणी मारली ती ऐकून त्यांचे हृदय पिळवटले होते; पण ह्या बाईस तो दुष्ट छळताना पाहून त्यांनी हूं का चूं न करता असले प्रकार आपल्यासारख्या सभ्याच्या दृष्टिक्षेपात घेण्याच्या योग्यतेचे नव्हते, अशा ऐटीने ते लगेच वाटेने पुढे गेले. संकटातून सोडविण्यास ती कुणी जखड गाय थोडीच होती ! ती एक जातिबाह्य हिंदू बाळंत बाई, नि तीनचार दिवसांचे 'बिन-वारशी मूल !

त्या एका मुसलमानास जाणीव होती की, तो एकटा तिथे असला तरी मुसलमान तितका त्याच्या मागे. तिथे असलेल्या प्रत्येक हिंदूसही तीच जाणीव होती. आणखीही एक जाणीव होती की, आपल्यामागे हिंदुसमाज असा नाहीच, आपण खरोखरच एकएकटे आहो ! तेवढ्यात इतके मात्र कोणी साहस केले, की धावत जाऊन रामभाऊंस ती बातमी दिली; रामभाऊंनी पोलिसास दिली आणि एक पोलीस त्या वाटेकडे येताना दुरून दिसताच त्या भंगी मिय्यासाहेबाचा धर्मोन्माद उतरून ते तेथून पाय काढते झाले !

तरीही ह्या बाईस त्या धर्मशाळेत एक मिनिटभरही ठेवणे धोक्याचे आहे असे रामभाऊंना वाटले. पण तिला नेणार कुठे ? गावात कोणी गोठासुद्धा देईना ! म्हणून त्यांनी रत्नागिरी हिंदुसभेस तार केली.

पण रात्री मध्यंतरी हलवून तिला लगेच कुठे ठेवायची ? ते तरुण वकील रामभाऊंचे सहकारी. त्यांनाच शेवटी रामभाऊंनी अगदी गळ घातली, त्यांची आई, किती दयाळू, देवलसी, गोभक्त वृद्ध आई ! त्या दीन गाईची देखील त्या दिवशी तिला किती हळहळ वाटली ! मग ही बाई तर माणूस, त्यात एक बाळंतीण स्त्री, छातीस तीन दिवसांचे पिते मूल घेऊन येणार ! तिला दया आलीच पाहिजे. 'थोडे नाकतोंड

मुरडलेच तरी आमची आई नको म्हणणार नाही. घेऊन या त्या बाईस आजची रात्र ! उद्या मात्र ताबडतोब मोटारीने रत्नागिरीस धाडली पाहिजे हं ! ' त्या तरुण वकिलांनी पाठबळ देताच रामभाऊ त्या बाईला नि मुलाला मोठ्या प्रयासाने त्या दोघा तरुण शिष्यांच्या साहाय्याने रातारोत घेऊन आले –

तो घरात तरुण वकिलाच्या आईचे रागारागाने चाललेले बोलणे त्यांनी ऐकिले. दार उघडण्यास ते वकील धजेनात. रामभाऊंनीही जोर-जोराने दार खडखडविण्यास आरंभिले. शेवटी वकिलांनी दार उघडले— दिवा बाहेर केला. ती बाई थरथर कापत ते मूल छातीशी धरून पाजत पायरीवर बसली आहे; ती उठत आहे, तोच वकिलांची ती गोभक्त आई धावतच ओसरीवर आली ! त्या बाळंत बाईस तिने पाहिले नि मोठ्याने किंचाळी फोडून म्हणाली, ' कुठली मेली अवदसा ही ! नि ते कारटे ! ना जात ना पात ! तिला आत घेऊन घर बाटवशील तर ही मी घराबाहेर पडते. पुन्हा पाणी घेणार नाही या घरात ! ' स्वभावाने त्या वृद्ध बाई दयाळू होत्या, पण पोथी ! पोथीने त्यांच्या दयेला जी आरशी लावली त्यातूनच त्या बघणार !

गोदासबुवाही तिथेच उतरलेले. त्यांना हात जोडून रामभाऊ म्हणाले, ' वकिलांच्या आईस थोडे समजावा ना ! ' कपाळास आठ्या घालून ताठ्याने गोदासबुवा गरजले, ' आम्ही गोदास, वर्णाश्रमधर्माचे अभि-मानी ! तुम्ही लोक सब गोलंकार करू पाहाता ! महारामांगांना शिवता ! या कुलटा बाया तुमची प्रेमपात्रे ! मुसलमानांच्या हातचे तिने खाल्लेले, तिला म्हणे हिंदू म्हणा ! अशा पतितेला ह्या कुलीन सदाचारी ब्राह्मण कुटुंबाच्या घरात घेण्यास मी संमती देऊ ? ती कोणी गायत्री गोमाता आहे की काय तिच्या पदरजांनी हे कुल पवित्रविण्यास ?

वकील बहुतेक हिंदू ( Rationalist ) बुद्धिवाद्याप्रमाणे कृतीने पंगू, इच्छा असून आईस बाजूस सारण्यास धजेना ! इतक्यात तो गोंधळ, ते मुलाचे रडणे, बाईचे स्फुंदणे ऐकून शेजारीपाजारी वाणी-ब्राह्मण बायामाणसे आली ! ' भ्रष्टाकार ! या बाटग्या वकिलास वाळीत टाकले पाहिजे, विहीर बंद करा उद्यापासून. ' जो तो धिक्कारू लागला, वकील

गांगरले ' साह्यार्थ पैसे देतो पण बाईस परत न्या ' म्हणाले !

शेवटी एका चौकाच्या कोपऱ्यात दुकानाच्या फळीवर एका दुकानदाराने त्या बाईस रात्रभर निजू देण्याचे औदार्य दाखविले, रामभाऊंनी पहारा दिला. सकाळी रत्नागिरीची मोटार सुटताच त्या बाईस नि मुलास घेऊन रामभाऊंनी रत्नागिरीस हिंदुसभेकडे पोचविली.

रत्नागिरीस पाय टाकताच त्या बाईच्या नि मुलाच्या पायातील स्पर्शबंदीच्या, जातबंदीच्या बेड्या आपोआप तडातड तुटून गळून गेल्या. ' मुसलमानाच्या हातचे खाल्ले ? हात्तिच्या, त्यात काय झाले ? धर्माचे स्थान हृदय; पोट नव्हे. जात रक्तात नि बीजात असते, भाताच्या तपेल्यात नव्हे. ' संघटनस्मृतीचे राज्य झालेल्या हिंदुत्वाभिमानी रत्नागिरीत तिच्याभोवती जमलेल्या हिंदू मंडळींत असे म्हणत जो तो तिला धीर देऊ लागला. अखिल हिंदू उपहारगृहात ब्राह्मण-वाणी-मराठा मंडळी जी त्या वेळी होती त्यांनी, ज्या बाकावर ती होती, त्याच्याच सलग बाकावर बसून हेतुत: उपाहार केला, पतितपावनाच्या सभामंडपात नेऊन मूल देवापुढे ठेवले. सभ्य कुटुंबातील येत्याजात्या स्त्रियांनी लुगडी देऊन, साबण देऊन, औषधे देऊन, धीर देऊन तिला अगदी घरासारखे वागविले. ब्राह्मणादिक स्त्रियांनी तिला पंक्तीस घेतले. दोन दिवसांत तिला चारपाच कुटुंबांतून पाळण्यासाठी मागण्या आल्या. सध्या एका प्रतिष्ठित मराठा कुटुंबातील हिंदू संघटनाभिमानी महिलेने तिला नि त्या मुलाला पाळलेले आहे !

( या गोष्टीतील प्रकार डोळे उघडून पाहणाऱ्याच्या अनुभवास पदोपदी येत असतीलच; पण या गोष्टीस आधार म्हणून सांगतो की, ' देव सर्वव्यापी, पशूतही नाही काय ? ' विचारणारे अनेक पुढारी गोभक्त गाईस सोवळ्याने पूजणारे पण महाराच्या सावलीचा विटाळ मानतात. आणि स्वहस्ते गाईस गोग्रास चारणारी मंडळी शुद्धीकृत ब्राह्मणासही आपल्या घरी जेवणास घेत नाहीत. हे जे वारंवार आम्हांस आढळते तो एक आधार आणि अलीकडेच अशा संकटात सापडलेल्या एका स्त्रीस एका मुसलमान भंग्याने अशी जाळपोळ करून मुलास हिसकून नेण्याचा धाक दाखविला असता त्या बाळंत परित्यक्ता हिंदू स्त्रीस त्या मोठ्या

गावी अंगणातही कुणी ठेवीना म्हणून रत्नागिरी हिंदुसभेकडे धाडण्यात आले, हा आधार दुसरा ! ह्या वास्तविक अनुभवांची विणलेली ही गोष्ट कथा असली तरी सामान्यतः सत्यच म्हणावयास नको काय ? ’ )

* * *

## ७. प्रार्थना

'माझे पत्ते ग कुठं आहेत आई ?'

'ते बघ त्या कोनाड्यात; अग ह्या गणपतीच्या मखराच्या कोनाड्यात ! हात नाही पुरत ? थांब हो बाबी, मी देते अं काढून तुला.' असे म्हणून विमल–त्या दुडदुड धावत आलेल्या मुलीची आई–उठली नि तिने तिच्या त्या चिमुकल्या लहान बाबीला खेळायला पत्त्यांचा जोड काढून दिला. त्या मखराच्या रंगविलेल्या कोनाड्यात, तो पत्त्यांचा जोड ती काढावयास गेली असता विमलेला एक जाळे लागलेले दिसले. तिने 'इश्श' म्हणून तिरस्काराने ते कोळिष्टक जाळे इतक्या झट्किनी नि सहजपणे त्या पत्त्यांच्या जोडाचे दोन तीन फटकारे मारून मोडून तोडून टाकले, की तिला ते जाळे मोडल्याची आठवणसुद्धा बाबीकडे वळताच राहिली नाही.

पण कोळ्याच्या त्या कोळिष्टक जाळ्याची एकदोन चिकट गुंडाळी त्या पत्त्यांच्या जोडास लपेटलेली पाहून लहानशी बाबी जेव्हा म्हणाली, की 'ते बघ कायसं चिकटलं आहे पत्त्यांच्या जोडाला !' तेव्हा विमलचं लक्ष पुन्हा तिकडे गेलं नि ती गुंडाळी झटकीत ती बाबीला म्हणाली, 'जाळं ते ! तो किडा नसतो का तो कोळी ! त्याचं हे घर असतं !–'

'मग ते तर तू चुरगाळून तोडलंस. आता ग तो कुठं राहील आई ? रडत असेल न तो आता ?'

'असेल रडत मेला. बांधील पुन्हा दुसरं घर त्याला हवं तर ? दिवसभर कोळी विणतच असतो आपली जाळी नि कोणीतरी येताजाता झाडूनच टाकीत असतो ती सारी ! कसा सुंदर मखराचा रंगीत कोनाडा तो आपला ! या किड्याच्या जळमटांना सोय हवी म्हणून का असा शिमेटाचा गिलावा लावून सुरेख केला, रंगविला ?'

'अग आई, पण त्या किड्याला तसंच वाटत असेल न ?' विमलेचा सतरा-अठरा वर्षांचा पाणीदार मुलगा ती गमतीची बोलणी ऐकून तिथे आला नि म्हणाला, 'मी त्या कोळ्याला ते जाळं विणताना परवा बघितलं,

किती दंग होता तो ते विणण्यात नि किती पटाईत! एखादा मोठा यंत्रशिल्पी (एंजिनीयर) इतका हातखंडा नसेल! त्या जाळ्याला हवे तिथंच काय ते बारीक तंतूंचे ताण त्यानं दिले. ती मोठाली तंतुवर्तुळं प्रथम रचून मग त्याच्या उभ्या तंतूंचे धागे कसे झटपट गुंतवीत, थांबत, चिकटवीत, ती त्याची चिकट धाग्याची पोटातील गुंडी सपसप कशी उकलीत चालला होता म्हणून सांगू? जसा कोणी पटाईत विणकर मागात आडवेउभे दोरे दांडया सटासट मारीत, गुंडया झरझर उकलीत चालला आहे! त्याच्या त्या तिळाएवढ्या डोक्यात ते विणकामाचं शास्त्रच्या शास्त्र नि त्याच्या तांदुळाएवढया पोटात अर्ध्या अर्ध्या मैल लांब धाग्याच्या गुंडया मावलेल्या पाहून मला इतका अचंबा वाटला की, आपल्या मखराच्या कोनाडयात ते जाळं बांधीत असतानाही त्या किडयाला मारायचं वा ते जळमट सुपकनी झाडून टाकायचं माझ्याच्यानं होईनाच! मधे एकदा मी गंमत म्हणून त्याच्या जाळ्यास जोराने बोट लावलं. त्यासरशी घाबरून तो या धाग्यावरून त्या धाग्यावर पळत, त्याच्या मते त्याच्या राज्याचा सुरक्षित जो भाग त्या टोकावर जाऊन थांबला. मग परचक्राचं संकट गेलंसं पाहून पुन्हा आपल्या राजधानीच्या मध्यबिंदूत येऊन राहिला. आपण जसे वास्तुशांती करून आपल्या राजवाडयात प्रवेशतो नि देवाचे आभार मानतो की, 'केवढी त्याची कृपा! त्यानं आम्हांस हे घर दिलं!' तसा तोही देवाची प्रार्थना करीत नि आभार मानीत असावा!'

'तर तर! हे एवढं मोठं घर नि तो माझा सुरेख मखराचा कोनाडा तो त्या किड्याला जाळं विणून त्यात सुखानं नांदता यावं म्हणून बांधला वाटतं! देवाची सोडून मोठी महादेवाची प्रार्थना किड्यांनी केली म्हणून किड्यांच्या सोईसाठी काही देव माणसांची घरं राखून ठेवीत नसतो! ही तिनीसांज झाली म्हणून मी जो हा दिवा लावते आहे तो जसा त्या किड्याला दिसावं म्हणून लावीत नाही, तसंच हे टोलेजंग वाडे नि राजवाडे माणसं जी बांधतात ती कोळ्यांना जाळी विणून त्यात नांदता यावं म्हणून नव्हेत, हे त्या किड्यांना कळलं नाही तरी देवाला कळतं हो बाळा!'

'आणि देवाला कळतं तरी आम्हां माणसांना कळत नाही, की

आम्हां माणसांना हे टोलेजंग वाडे नि राजवाडे बांधता यावे नि त्यात नांदता यावं एवढ्याच सोईसाठी हे जगड्व्याळ विश्व रचलं नाही. हा दिवा त्या किड्याला दिसण्यासाठी आम्ही लावीत नाही असं आम्ही म्हणतो, पण तो प्रचंड सूर्य मात्र मनुष्यांना दिसावं, त्यांनी जगावं, म्हणूनच काय तो देवानं पेटविलेला आहे असं आमच्या वेद – बायबल – कुराणासारख्या धर्मग्रंथांतूनदेखील सांगितलेलं आहे! किड्यांच्या वेडगळ प्रार्थनेसाठी माणसांची गैरसोय जर देव दूर करणार नाही, तर या अनंतकोटी ब्रह्मांडाच्या सोईगैरसोई न पाहाता, 'आम्हां माणसांच्या घरकुल्यांनाच तेवढं रक्षावं' अशा आम्हां माणसांच्या प्रार्थना तेवढ्या देव ऐकेलच हे तरी कशावरून? मग प्रार्थनेस देव पावतोच पावतो, रामनाम जपा, अल्ला अल्ला म्हणा, की देव साहाय्यास आलाच म्हणून समजा, हे जे आमच्या पुराणकुराणादिक पोथ्यातून सांगतात ते भाबडे-पणच नाही का?'

'हं विक्रम, पुरे झाला अं पाचकळपणा!' विमलेची वृद्ध सासू नि तिच्या या विक्रम नावाच्या मुलाची नि छोट्या बाबीची आजी देव-घराशी बसून स्तोत्रे पुटपुटत होती ती हा संवाद ऐकत असता विक्रम जरा बेतालपणे बोलत चालला आहे असे वाटून त्याला दाबू लागली. 'इंग्रजी चार अक्षरं शिकली नं, की पोरं अशी चटोर होतात मेली! पोथ्याबिथ्यांविषयी असं पाचकळपणानं बोलू नये हो विक्रम! कधी तुला कळणार आता हे?'

हे त्यांचे बोलणे चालले आहे तो त्या लहानग्या बाबीने त्या पत्त्यांचा तंबू हळुवार हाताने बांधला होता. ते कठीण शिल्पकार्य संपून तिसऱ्या मजल्याच्या शिखरासारखा शेवटचा तंबू उभारण्यात यश येताच सफळ तेच्या अत्यानंदाने बाबी टाळ्या पिटीत नाचू लागली. 'बघ माझा तंबू! आई, भाऊ, आजी! माझ्या बाहुलीचा वाडा अं हा! तुम्ही आता बोलत होतेत त्या राजवाड्यापेक्षा पक्का चिरेबंदी आहे अं! दूर अं भाऊ! फुंकर मारलीस तर बघ माझ्या पत्त्यांच्या राजवाड्यावर!'

विक्रम हसला. 'हो का? आमच्या चिरेबंदी राजवाड्यापेक्षा तुझा पत्त्यांचा तंबू पक्का आहे नं? नि फुंकराला भितेस?'

बाबी मानेला एक ऐटीचा हिसडा देत उपहासली, ' पुरे हो ! तुमचे चिरेबंदी राजवाडे नाही पडत वाटतं फुंकरासारखे ! काल तूच मला ते चित्र दाखविलंस न ! बिहारला एक नगरच्या नगर भुई फाटून धडाड-धडाड कोसळलं ते ! ' हे वाक्य म्हणताच त्या सातआठ वर्षांच्या बालिकेच्या गोजिरवाण्या अल्लड तोंडावर भावी संसाराच्या चिंतेची छाया पडल्यासारखे होऊन ती केविलवाण्या स्वरात आजीला पुसू लागली, ' आजी ! तशी भुईबिई फाटून आज रात्री माझा हा तंबू तर कोसळणार नाही न तसा ? उद्या माझी बाहुली राहायला यायची आहे हो त्यात ! '

' चूप ! असं अशुभ काही बोलू नाही हो बाबी ! ये, मी स्तोत्र म्हणते आहे, देवापाशी तू हात जोडून बैस. ये अशी. देवाची प्रार्थना करीत ही स्तोत्रं म्हटली न म्हणजे देव सारी इडापिडा दूर करतो बरं. नाही पडणार हो तुझा पत्त्यांचा तंबू. ये, देवबाप्पाला हात जोडून प्रार्थना करू–ये ! '

आजीपाशी ती बालिका मनोभावाने जाऊन बसली. आजी काही संस्कृत, काही प्राकृत स्तोत्रे नित्याप्रमाणे अगदी श्रद्धेने म्हणत असता बाबी मनातल्या मनात देवाला हात जोडून विनवीत होती, ' माझा हा पत्त्यांचा तंबू कधी कधी पडू देऊ नकोस हं देवबाप्पा ! '

प्रतिदिन संध्याकाळी म्हणायचा तिचा परिपाठ असे ती ती स्तोत्रे आजी म्हणत होती. त्या प्रत्येकाची फलश्रुती अगदी अगदी खरी आहे ही तिची श्रद्धा असल्यामुळे ती सारी स्तोत्रे इतक्या मनोभावाने म्हटल्या-वर संसारात दुःख, दारिद्र्य, रोग, अपघात, अपमृत्यू यांची भीती आपणांस बाळगावयास नकोच अशी निश्चितता तिच्या मनाला लाभे. सात चिरंजीवांचा तो ' अश्वत्थामा बलिर्व्यासो ' हा श्लोक म्हणून तिने हाही श्लोक म्हटला, ' सप्तैतान् संस्मरेन्नित्यं, मार्कंडेयं यथाष्टमम् । जीवेत् वर्षशतं साग्रमपमृत्युविवर्जितः ॥' ' वाराणस्युत्तरे तीरे सुमंतुर्नाम वै द्विजः । तस्य स्मरणमात्रेण निर्धनो धनवान् भवेत् ॥ ' हा श्लोकही म्हटला. ' हरिं हरं हरिश्चंद्रं हनुमंतं हलायुधं । एतेषां स्मरणात् सायं हानिस्तस्य न बाध्यते ॥ ' अशा अनेक स्तोत्रांच्या पठणाने अपमृत्यू, निर्धनता, हानी

प्रभृती सारी इडापिडा दूर सारल्यासारखे समाधान तिला झाले. नुसत्या 'स्मरणमात्रेण' हा चमत्कार घडून येतो, या विश्वासाने तिने ह्या लहानग्या नातीकडूनही ती ती नावे स्मरविली. स्तोत्रे म्हणविली. विक्रम-देखील आजीच्या मनधरणीसाठी नि एक गंमत म्हणून हात जोडून चुपचाप ती स्तोत्रे ऐकत होता. एकदा काय ते त्याने मधे तोंड घातले. त्यांच्या आजीने जेव्हा 'सोमनाथ वैजनाथं धन्वंतरिमथाश्विनौ। एतेषां स्मरणात् हानिर्व्याधिस्तस्य न बाध्यते ॥' हा श्लोक म्हटला तेव्हा तो तरुण हसला. 'आजी सोमनाथाचं स्वतःचं देऊळ त्या दुष्ट महंमदानं फोडलं तेव्हा त्याच्या स्वतःच्या देवळाची नि मूर्तीची हानीदेखील जर तो दुरावू शकला नाही तर त्याच्या नुसत्या 'स्मरणमात्रेण' साऱ्या जगतास तो कसा रक्षील?' पण लगेच आजीने दटाविले, 'तुला सांगितलं ना बाष्कळपणा करू नकोस म्हणून!' तेव्हा तो पुन्हा आपला वरवर सुतासारखा सरळ दिसू लागला, मनात हसत राहिला.

सारी स्तोत्रे झाल्यावर देवाचा अंगारा आजीने मुलानातवांसुनेस लावला. साऱ्यांना निर्विघ्न ठेव म्हणून हात जोडले. छोट्या बाबीने पण तो अंगारा आपल्या पत्त्यांच्या तंबूस लावला. आता तो तंबू ढासळणार नाही नि उद्या त्यात राहावयास येणारी आपली बाहुली त्या तिच्या वाड्यात आनंदानं मुलाबाळांसह आजीएवढी म्हातारी होईतो निर्विघ्नपणे नांदेल अशा लाडिक विश्वासाने आनंदून ते मूल स्वस्थपणे झोपले. विक्रमने आजीस गमतीने म्हटले, 'या अंगाऱ्यानं बाबीचा पत्त्यांचा तंबू राजवाड्यासारखा चिरेबंदी पक्का झाला नाही का आजी? बोटानं डवचळून पाहू का?'

'जाऊ दे रे विक्रम! लहान मुलीची समजूत पटली, काम झालं.'

'आणि आजी, त्या तुझ्या स्तोत्रांनी म्हाताऱ्या-मुलांची समजूत पटते याहून त्यांचा तरी काय खरा उपयोग? आता या स्तोत्रात सांगितल्या-प्रमाणं केवळ 'स्मरणमात्रेण' आपण सारे शंभर वर्षं जगू; धनधान्य, आरोग्य पावू; अपघात–अपमृत्यु सारे टळेल; ही तरी आपली एक मनाची, मुलासारखी समजूत घालणंच नाही का?'

'तुला कनी विक्रम, लहान तोंडी मोठा घास घ्यायची फारच सवय

झाली आहे हो!' विमलने विक्रमचे बोलणे पटले असताही सासूबाईंचा पक्ष घेतलासे करून आपल्या तरुण मुलास हसत हसत दटावले. 'बरं बुवा राहिलं!' असे म्हणत विक्रम त्याच्या निजायच्या खोलीकडे गेला. छोटी बाबी आपल्या पऱ्यांच्या तंबूच्या निर्विघ्न भविष्याने जितकी आनंदून निजली होती तितकीच देवाच्या प्रार्थनेनंतर देव आपल्या प्रामाणिक भक्तिभावास पावलाच पाहिजे आणि स्तोत्रातील फलश्रुती खरी ठरून आपले घरदार, मुलेबाळे, संसार, सुख, यात निर्विघ्नपणे नांदलेच पाहिजे अशा श्रद्धाळू विश्वासाने देवलसी आजीबाई पण आनंदून निजल्या.

त्या संध्याकाळी ह्या कुटुंबातील देवघरापाशी त्या आजीबाई नि बाबी जशा मनोभावाने देवास आपले चांगले कर म्हणून प्रार्थीत होत्या तसेच ते सारे नगरच्या नगर, घरोघर, देवळादेवळांतून, मशिदीमशिदींतून, चर्चोचर्चोतून आपल्या नित्यक्रमाच्या सायंप्रार्थना करीत होते. देवळातून 'सर्वेपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात्।' हे अत्युदार शब्द प्रशांत स्वरात ब्राह्मण उच्चारीत होते. दिवसातून पाचपन्नास शंभर वेळा निमाजाची प्रार्थना करण्याचे व्रत घेतलेले निरनिराळ्या संप्रदायांचे मुसलमान आपल्या दर्ग्यांतून वा मशिदींतून शेवटचे निमाज पढत होते. चर्चोतून ख्रिश्चन, अग्यारीतून त्या नगरात असलेले मूठभर पारशी, काही ज्यू, बहुतेकजण स्वतःचे चांगले करण्यासाठी नि शत्रूचे तेवढे वाईट करण्यासाठी देवाची प्रार्थना करीत होते! कोणी सगळ्यांचेच चांगले कर म्हणूनही प्रार्थीत होते. परंतु 'माझे स्वतःचे वाईट कर; मला अपघात घडू दे, आम्हांला अपमृत्यू दे, माझे घरदार कोसळू दे. माझी मुलेलेकरे ठेचून ठेचून मारा असे त्या नगरात घरांतून वा देवळांतून वा मशिदींतून वा चर्चमधून, हिंदू वा मुस्लिम वा खिस्ती, वृद्ध वा बाल, पुरुष वा स्त्री कोणीही प्रार्थीत नव्हते! जर प्रार्थनेच्या पायावर उभारलेल्या आशा, दगडमातीच्या पायावर उभारलेल्या साध्या कौलारू घराइतक्या तरी बळकट पायावर आधारलेल्या असतात असे समजावयाचे असेल, तर त्या संध्याकाळी नि रात्री, प्रत्येक

संध्याकाळ–रात्रीप्रमाणेच त्या नगरातील सहस्रावधी कंठांतून एकच प्रार्थना ज्या अर्थी उठत होती की – देवा, आयुष्य दे, धन दे, आरोग्य दे, संतती दे, माझे बरे कर!' त्या अर्थी ते नगर हिमालयाइतके चिरंजीव नि चिरस्थिर असावयास हवे होते; निदान त्यातील प्रार्थनारत, मनोभावे देवास आळविणारे असे शतावधी नागरिक तरी मुळीच प्रार्थना न करणाऱ्या त्या पाखंड मास्कोमधल्या नागरिकांइतके तरी संकटापासून मुक्त राहावयाला पाहिजे होते. कारण त्या नगरात जो तो 'माझे बरे कर, देवा, माझं घरदार बायकामुले सुरक्षित राख' असेच प्रार्थीत होता. कोणीही असे प्रार्थीतच नव्हे, तर चिंतीतदेखील नव्हता की, 'देवा, माझा, माझ्या मुलाबाळांचा, सर्वांचा, चल, चटकन सत्यानाश कर! आकाश कोसळून पडू दे! पाताळ फाटून जाऊ दे!!'

– पण हाय हाय!! जे सगळेजण प्रार्थीत होते, तेच नेमके झाले नाही, देवाने केले नाही! जे कोणीही प्रार्थिले नाही, चिंतिले नाही, देवाने तेच नेमके केले!

– आकाश कडकडकड कोसळू लागले, विजांचे चाबकावर चाबूक उडवीत कोणी महारुद्र साऱ्या महाभूतांची पाठ सडकीत चवताळून उठला—पाताळ फाटले!!

प्रचंड सुरुंगांची रांगची रांग भूमीच्या पोटातून फुटून टेकड्यांच्या टेकड्या दगडासारख्या वर फेकल्या जाऊन खाली आदळल्या! भूमीच्या चिंधड्या चिंधड्या उडून समुद्राच्या लाटा फाटाव्या तशा पृथ्वीची फरशी फाटून मोठमोठे अतल खड्डे पडले, नि त्यात, मडक्यांच्या उतरंडी धडधडत कोलमडाव्या तशी नगरातील यच्चयावत् देवळे, मशिदी, चर्चे, घरे, वाडे, बंगले धडाडधडाड कोसळत गडप झाले. सारे नगर हादरून राहिले. धक्क्यावर धक्के खात घरे घरांवर आदळून चूर्ण झाली. बसलेले उठता उठता, उठले ते पळता पळता, घरातले घरात, बाहेरचे बाहेर, पाय टाकावा तिथे भुई दुभंगून हजारो लोक पाताळात गडप झाले. वर मोठमोठ्या बांधकामाचे प्रचंड दगड; वृक्ष, भिंती, राशीच्या राशी कोसळून हजारो जिवंत पुरले गेले, ठेचले गेले. एक दोन तासांच्या आत भयंकर भूकंपाच्या जबड्यात ते क्वेट्टयाचे नगरच्या नगर गडप झाले!

देवळाला देवाने रक्षिले नाही, न मशिदीला अल्लाने! न जीजस न जेहोव! निसर्गाच्या इच्छेस मनुष्याच्या प्रार्थनेसाठी म्हणून कोणीही आड येऊ शकला नाही! आडवू शकला नाही!!

विमलेच्या घरी मखराच्या कोनाड्यातील जाळे तिच्या सोयीच्या आड येताच तिने, त्या कोळ्याच्या लाख आशाआकांक्षा, सोयीगैरसोयीस न जुमानता एका फटकाऱ्यासरशी मोडून चुरगळून टाकले. तसेच सृष्टीच्या त्या कोनाड्यात माणसांकिड्यांनी विणलेले ते क्वेट्टा नगराचे जळमट सृष्टीच्या स्वतःच्या सोयीच्या आड येताच तिने रागाच्या झाडूच्या एका फटकाऱ्यासरशी झाडून चुरगाळून टाकले, होते की नव्हतेसे केले! भुकेली दूधपिती लेकरे दुधाचा ओठावरचा घोट गिळू देखील न देता त्यांच्या डोक्यावर दगड लोटून जिथे ज्या सृष्टीने ठेचून टाकली, तिथे ती सृष्टी वा तो सृष्टिसंचालक, पोथ्यांतील लांबलांब संस्कृत स्तोत्रे वा कुराणातील अरबी आयते थोडीच ऐकून घेणारा होता! भूगर्भात जे अत्युग्र स्फोटकांचे समुद्रासारखे हौद शतकोशतके कढत, तापत स्फोटाच्या बिंदूस आले होते, त्या प्रचंड सृष्टिशक्ती काय 'सप्तैते चिरंजीविनां'च्या वा सोरटी सोमनाथाच्या 'स्मरणमात्रेण' किंवा निमाजानंतर केलेल्या कोणा मुल्ला-मौलवीच्या 'दुव्या'ने द्रवणार होत्या! आपला वैश्वनियमाचा आखलेला बेत बदलणार होत्या!

प्रार्थना! त्या लडिवाळ छोट्या बाबीची प्रार्थना मात्र एका अर्थी सफळ झाली. 'माझा पत्र्यांचा तंबू चिरेबंदी वाड्याइतका टिकाऊ होऊ दे अं देवा!' असे ते अल्लड मूल मनोभावे प्रार्थून झोपले. ते मात्र देवाने ऐकलेसे वाटते! तिचा पत्र्यांचा तंबू क्वेट्टा नगरच्या चिरेबंदी वाड्या-इतका खरोखरच टिकाऊ ठरला! कारण त्या चिरेबंदी क्वेट्टा नगरातील यच्चयावत् चिरेबंदी वाडे त्या पत्र्यांच्या तंबूसारखेच भूकंपाच्या फुंकरा-सरशी, हबक्यासरशी, एका क्षणात कोलमडून पडले. त्या पत्र्यांच्या तंबू-इतकेच टिकाऊ ठरले!!

छोट्या बाबीला पोटाशी घेऊन आजी निजल्यानंतर दोन तासदेखील झाले नाहीत, तोच बाहेर दूरवर तोफांच्या बातेऱ्यांच्या बातेऱ्या एकदम भडकाव्या तसे भयंकर आवाज दणाणले; हजारो लोकांच्या आरोळ्यांच।

किंकाळ्यांचा आर्तस्वर एकदम उठला ! अभ्यासाच्या खोलीतून विक्रम खाड्‌दिशी उठला. त्या क्वेट्टा नगरात धर्मवेड्या कडव्या मुसलमानांची वसती मुख्य, हिंदू मूठभर. नेहमी हिंदूंवर शेजारच्या बलुची टोळ्या दरवडे घालून मारहाण करीत. विक्रम हा हिंदुसंरक्षकदलाचा स्वयंसेवक, त्याचे कुटुंब महाराष्ट्रातून नोकरीसाठी क्वेट्टयाकडे गेले तेव्हापासूनच झाला होता. त्याला वाटले, हिंदूंवर दरवडा पडला, तो झटकन खंजीर, लाठी घेऊन दार उघडून बाहेर पडतो तो–उंच माडावर चढलेला मनुष्य वादळात ते माडाचे झाड हलताच जसा गदगद हलतो तसा पायाखालची सारी पृथ्वी भूकंपात थरकापून झोकांड्या घेत पायरीवरच पडला–मागोमाग कडकड आवाज होऊन त्याचे घर कोसळले !

घर भुईत पुरुषभर खड्डयात दगड पडावा तसे खचून गेले. त्यामुळे अंगणातली मोठमोठ्या शिळापट्टांची एक टेकडीही कोलमडून त्या खड्डयात तिचे पुरुष पुरुष उंचीचे दगड धबधबा आदळले. ‘ अपमृत्यू ’ स्मरणमात्रेण टाळणाऱ्या मार्कंडेयाचे स्तोत्र सारखे स्मरत निजलेल्या नि तो अंगारा लावलेल्या नातीस पोटाशी धरलेल्या आजीचा त्या छोट्या बाबीसुद्धा त्या प्रचंड दगडाखाली चेंदामेंदा झाला ! ! पण त्याच खड्डयात चार हातांवर रुतलेली विमला ! तिने कोणतेही स्तोत्र म्हटलेले नव्हते, पण तिचा चेंदामेंदा झाला नाही. तिच्या तिन्ही बाजूंनी मोठ्या शिळा पडून त्या धक्क्याने ती सुन्न झाली, इतक्यात पटईची लाकडे तिच्या छातीवर पडून बेशुद्ध झाली–पण मेली नाही.

जेव्हा ती अर्ध्या शुद्धीवर आली तेव्हा तिच्या शून्यपणे उघडलेल्या डोळ्यांना वरून त्या खड्डयात उतरत आलेला एक सूर्यकिरण दिसला. रात्री झालेल्या भयंकर अपघाताची अंधुक जाणीव तिला होऊन ‘ बाबी ! माझी बाबी ! माझा विक्रम ! माझी लेकरं ! ’ अशी तिने अर्धबेशुद्ध किंकाळी फोडली !

‘ थांबा ! इथं कुठंतरी कुणी घायाळ माणूस आहे ! ’ असे एक सैनिक ती खड्डयातील किंकाळी ऐकून वर ओरडला. चारपाच सैनिकांची ती तुकडी कालरात्री झालेल्या भयंकर भूकंपात जे गाडले गेले त्यांना तत्काळ शक्य ते साहाय्य पुरविण्यासाठी सरकारी आज्ञेने त्या भागात फिरत

होते. त्यांनी लगेच तिथे तो ढिगारा खणून पाहिले, तो तीन उंच दगडांच्यामध्ये, गुहेत रत्न पडलेले दिसावे तसे, त्या अर्धबेशुद्ध युवतीचे वदन दिसले. लाकडांच्या अलगत पडलेल्या ढिगाऱ्यातून सैनिकांनी घायाळ विमलेला बाहेर आणले; त्या दगडाखालची चेंदलेली प्रेतेही बाहेर काढली. त्या नुसत्या बातमीसरशी विमला पुन्हा बेशुद्ध होऊन पडली !

मार्कंडेयाच्या 'स्मरणमात्रेण' सृष्टिशक्ती आपले अवाढव्य व्यापार या तुच्छ मनुष्याच्या इच्छेनुसार बदलून अपमृत्यू, अपघात टळतात असे मानणाऱ्यांची ही दुर्गती ! आणि सगळ्यात अत्याश्चर्य हे की, त्या मेलेल्यांत हजारो अत्यंत सच्छील, जन्मभर रामाच्या वा रहिमाच्या पूजा, निमाज, प्रार्थना, मनोभावे करीत आलेले होते ! आणि त्या वाचलेल्यांत कित्येक अत्यंत दु:शील, लुच्चे, लुटारू, दारुडे आणि पापीही होते !

रुग्णालयात भूकंपामध्ये वाचलेल्या घायाळांची तात्पुरती शुश्रूषा झाल्या नंतर त्यांच्या इच्छेप्रमाणे ज्यांना आपापल्या गावी जाणे, त्यांना धाडून देण्यास आरंभ झाला. बिचारी विमला ! ती वाचली, बरी झाली, तरी जाणार कुठे ? तिचा पती तरुणपणीच वारल्यानंतर तिचा विक्रम नि ती लहान बाबी ही दोन मुलेच काय ते तिचे जीवन नि ती तिची देवलसी मायाळू सासू हीच तिच्या जीवनाचा आधार होता ! 'जिथे ती तिघे गेली तिथे ! – त्या यमपुरीस !' असं ती धायधय रडत, जो कोणी तिला विचारी 'तुम्ही कुठे जाणार बाई ?' त्याला उत्तर देई ! शेवटी तिने तिचा एक दूरचा नातलग नागपूरला होता, तिकडे जाण्याचे ठरविले. सरकारी अधिकारी भूकंपातील हजारो आपद्ग्रस्तांना शक्य तितक्या त्वरेने संकटाबाहेर पडता यावे म्हणून आगगाड्यांमागून आगगाड्या फुकट सोडीत होते. त्यांतील एका कराचीला जाणाऱ्या गाडीत विमलेला शेकडो इतर स्त्रियांसह धाडण्यात आले. कराचीपुढे ज्याचे त्याने आपले कुठे कुठे जायचे ती व्यवस्था स्वत: लावून घ्यावी असे सांगण्यात आल्यावरून जसजशी कराची जवळ आली तसतसे आता पुढे काय करू ह्या विचाराची धडकी विमलच्या हृदयात भरू लागली.

रात्री कराचीच्या स्टेशनात गाडी घुसताच त्या बायकांच्या डब्यापुढे वेगवेगळ्या दलांचे पाचपंचवीस स्वयंसेवक नम्रपणे उभे ठाकले. त्यांत

मुसलमान स्वयंसेवकांची हिंदू आपद्ग्रस्तांना आपल्या शिबिरात बळेबळे नेण्याची धडपड चालू होती. हनुमान दलाचे हिंदू स्वयंसेवकही त्यांच्या तावडीत ते न जाऊ देण्याची पराकाष्ठा करीत होते. पण विमला आणि दुसऱ्या दोन हिंदू स्त्रिया पीरदादशहाच्या तावडीत सापडल्याच. पीरदाद पठाण नम्रपणे म्हणाला, बहिणींनो, ही मनुष्यमात्रावरील सृष्टिक्षोभाची आपत्ती ! यात कसले हिंदू नि कसले मुसलमान ! एकी झाली पाहिजे एकी !'

विमलेस पीरदादच्या मानभावी सहानुभूतीची शंका आली; पण ती मनात म्हणाली, काहीतरी धोका आहे. पण आता गांगरू तर साफ बुडू. धीटपणे प्रसंग पडेल तसे वागू तर काही तोड मिळेल.'

आपणांस कोठे नेत आहेत याबद्दल विमलने एकदोनदा दरडावून विचारले, पण पीरदादने लक्ष दिले नाही. शेवटी विमला हातघाईवर आली. ओरडत आक्रंदत खाली बसली. 'हिंदू हनुमान' दलाचे स्वयंसेवक स्टेशनवर तुरळक फिरत होते. एक तरुण 'हिंदू' स्वयंसेवक त्या बाईस नीट निरखून पाहून त्वेषाने बेभान झाला. या स्त्रियांना आम्हां हिंदूंच्या हातात देतोस की नाही म्हणून पीरदादच्या अंगावर गेला. पीरदादने सुरा उपसून म्हटले, 'हट जाव ! यह मेरी शादीकी औरत है ! ही माझी लग्नाची बायको !' हिंदू तरुणानेही 'रे हरामखोरा ! ती माझी आई !' असे म्हणून सुरा खुपसला. पोलीस धावले.

उजेड येताच विमलने त्या हिंदू तरुणास निरखून पाहाताच एकदम धाव घेतली, 'विक्रम ! हा तर माझा विक्रम ! ! माझा प्यारा पुत्र ! !' असे स्फुंदत त्याच्या गळ्यात मिठी मारली !

होय ! तो विक्रमच होता. भूकंपाच्या धक्क्यासरशी तो घराबाहेरच्या पायऱ्यांवर पडला पण म्हणूनच घराखाली गाडला गेला नाही. तिथून सुटून भटकत हिंदुरक्षक दलात शिरून क्वेट्टयाच्या भूकंपातून पळापळ झालेल्या हिंदू अनाथांना यथाशक्ती साहाय्य देत होता.

ते सारेजण पोलिसांनी आपल्या अटकेत ठाण्यावर नेले. पाहातात तो पीरदाद हा एक फरारी दरोडेखोर ! लगेच जुने वॉरंट त्याच्यावर बजावले गेले. क्वेट्टयाकडे त्याने दोघा हिंदू सावकारांस ठार मारून

संपत्ती लुटली होती. त्या नोटा, मोती, दागिनेही त्याच्यापाशी धरले गेले. त्याच्या साथीदारांच्या वक्तव्यावरून ( जबानीवरून ) सिद्ध झाले की, दोन वर्षे हिंदू स्त्रियामुलांना पळवून नेऊन ही टोळी सरसीमेपलीकडच्या पठाण टोळ्यांना विकी ! क्वेट्टा ! भूकंप म्हणजे त्यांना एक पर्वणीच होती ! ह्या हिंदू स्त्रियांनाही तो तसाच पळवून नेत होता !

विक्रमच्या हाती विमलेसुद्धा त्या हिंदू स्त्रिया सोपविण्यात आल्या. विक्रम आर्यसमाजाच्या आश्रमात आला. तो त्याच्या मित्राने त्याला एक वर्तमानपत्र दाखवून म्हटले, बघ ! महात्मा गांधींनी भूकंपाच्या संकटातून मनुष्यजातीची सुटका करणारा एक अद्‌भुत उपाय शोधून काढला ! ! विक्रम दुर्लक्षमय स्वरात जिज्ञासला, ‘ कोणता उपाय बुवा ? ’ मित्र म्हणाला, ‘ प्रार्थना, देवाची प्रार्थना करा ! भूकंपातून सुटाल ! ’

‘ हात्तेच्या ! गांधीजींच्या आधीच माझ्या आजीबाईनीही हाच उपाय सांगितला होता ! पण बाबा, अनुभव असा की प्रार्थना ही भूकंप घालविण्यापेक्षा भूकंप तत्काळ आणण्याची मात्र रामबाण मात्रा असावी ! त्यातही या प्रकरणी तरी माझ्या आजीबाई महात्मा गांधीजींपेक्षा अधिक युक्तिसंगत बोलत. कारण प्रार्थनेनं भूकंप टळतो हे जरी आजी नि गांधीजी यांचं एकच मत, तरी अस्पृश्यता पाळल्यानं भूकंप होतो असं देखील म्हणण्याइतकी माझी आजी वहावली नव्हती. अरे ! अस्पृश्यता न पाळणाऱ्या हजारो मुसलमानांचीच बहुवस्ती असलेल्या क्वेट्टा नगराची एका घटकेत भूकंपानं धुळधाण केलेली पाहून आता सनातन्यांनी का बरं म्हणून नये की अस्पृश्यता पाळीत नव्हते म्हणून क्वेट्टयास भूकंपाचा भयंकर दंड देवानं दिला. ’

‘ पण तुला वाचवलं यासाठी तरी देवाच्या दयाळूपणाचे आभार मान. तू तरी कसा वाचलास ? ’

प्रार्थना करीत नव्हतो मी कधीच म्हणून, असं का म्हणू नये ! अरे, द्राक्षाचा पिकला घड वरवंट्याखाली ठेचावा तसा हजारो दूधपित्या कोवळ्या लेकरांचा भूकंपाच्या वरवंट्याखाली ज्यानं चेंदामेंदा उडविला तो देव की दैत्य ? दुष्ट की दयाळू ? खरी गोष्ट अशी आहे की, मनुष्याच्या दुष्टतेच्या वा दयाळुत्वाच्या गजानं देवास मोजू पाहाणं हाच

मूर्खपणा! सृष्टीच्या प्रचंड उलाढालीत त्या वेळी भूकंप हा एक गणितागत आला, भूकंप झाला. माझ्या आजीचा वा माझा द्वेष कुणी केला म्हणून नव्हे! त्या भूकंपात जसे अनेक धुळीचे कण वाताहत होऊन उडाले तसाच एक कण मी भुईत गाडला न जाता योगायोगाच्या वाऱ्यावर उडून इथं पडलो. माझ्यावर दया करण्याच्या मुख्य नि हेतुपुरस्सर बुद्धीनं कोणी रक्षिलं म्हणून नव्हे! प्रार्थना! अरे, ज्या गांधीजींना प्रार्थनांनी नि उपासांनी गुरुवायुपूरचं देऊळ उघडण्यापुरतं त्या एका यःकश्चित् झामोरिनचं मन वळविता आलं नाही ते गांधीजी केवळ प्रार्थनेनं भूकंपाचं मन वळतं म्हणून सांगतात नि तुम्ही ऐकता. तुम्ही सारे वर्ध्याला जा नि प्रार्थना करा माझं हे घड्याळ बंद पडावं म्हणून. त्या तुमच्या प्रार्थनेनं ह्या माझ्या चिमुकल्या हातघडीतील (रिस्टवॉच-मधील) टाचणीसारख्या या लंबकाचे कंपदेखील निरोधिले जाणार नाहीत आणि त्या प्रार्थनेनं भूकंपाची प्रस्फोटकं नि पर्वतांच्या रांगांच्या रांगा उचलून फेकणारी आंदोलने निरोधिली जातील असं तुम्ही म्हणता हा निव्वळ खुळेपणा नव्हे काय? प्रार्थना ही मनुष्याची आशा आहे; आशापूर्तीची हमी नव्हे.

* * *

## ८. शेंदाडपूरचा शिवाजी उत्सव

गेल्या पंधरवड्यात नागूजीरावांच्या जिवाची एकच तारांबळ उडालेली होती ! कारण त्यांच्या वास्तव्याने पावनलेल्या शेंदाडपुरात ह्या वर्षापासून शिवाजी उत्सव प्रथमच चालू करण्याचा बेत ठरला होता.

महाराष्ट्रातल्या अनेक नगरांतून जरी शिवाजी-उत्सव गेल्या पंचवीस वर्षांपूर्वीपासून होत आला असला तरी शेंदाडपूरच्या नागरिकांनी आजवर त्याच्याकडे जी पाठ फिरवलेली होती ती काही त्यांना त्या उत्सवाला तोंड देण्याची छाती नव्हती म्हणून नव्हे. पुण्याकडचे कुचेष्टेखोर लोक तसे हिणवत; पण शेंदाडपूरचे नागरिक आजवर तो उत्सव जो करीत नव्हते त्याचे मुख्य कारण असे होते की, पहिली कित्येक वर्षे तो उत्सव काही संशयित वर्तनाच्या लोकांनी काढलेली एक जातीजातीत वैमनस्य फैलावणारी टूम होती. उत्सवात भाग घेणे हे त्या वेळी सुखरूप सभ्यतेचे किंवा बिनधोक नि अनपवाद राष्ट्राभिमानाचे कृत्य समजले जात नव्हते; पण आता त्या उत्सवातील विष काढीत काढीत तो अगदी पाण्याहून पातळ, पाणी तेरा रंग कैसा—जिसमें मिलेगा वैसा, असा झाला, त्यात राष्ट्रातील वाटेल त्या माणसाला आता भाग घेता येऊ लागल्यामुळे त्याला पूर्णपणे राष्ट्रीय स्वरूप आले आहे. त्यात आता हिंदू, मुसलमान, खिश्चन, पारशी, यहुदी, अंदमानी, नीग्रो, हबशी, इराणी, तुराणी प्रभृती हिंदुस्थानातीलच काय, पण जगातील कोणत्याही जातीच्या सभ्य गृहस्थास मनमोकळ्या, सुखरूपपणे, बिनधोक सामावता येते. गव्हर्नर-कमिशनरदेखील त्याचे अध्यक्ष होऊ शकतात. खानसाहेब, मुल्लाजी, पाद्री मुख्य वक्ते होण्यास नाकारीत नाहीत, असे अत्यंत शुद्ध राष्ट्रीय स्वरूप त्यास आले. तेव्हा आता शेंदाडपूरच्या राष्ट्राभिमानी नागरिकांना तो हवासा वाटू लागला. यामुळेच पूर्वी त्या उत्सवापासून दहा पावले दूर राहाणाऱ्या नागूजीरावांसारख्या गृहस्थांनीही ह्या वर्षापासून ‘ शिवाजी महाराज की जय, असे प्रकटपणे गर्जून गर्जून त्या शेंदाडपूरचे वातावरण

दुमदुविण्यात दोन पावले सगळ्यांपुढे राहावयाचे असे नक्की ठरविले होते. त्यातही नागूजीरावांचे कवित्व त्याच उत्सवात जगतासमोर प्रथमच प्रकटावयाचे होते! त्यायोगे तर शिवाजीमहाराजांविषयीचा नागूजी-रावांचा अभिमान त्यांना सळो का पळो करून सोडता झाला. उत्सवा-विषयी सर्व लोकांत अपूर्व उत्साह संचरविण्यासाठी उत्सवमंडळाचे ते कार्यवाह श्रीयुत कविवर नागूजीराव, हे जातीने गावभर हिंडत होते; 'शिवाजीमहाराज की जय' असे घरोघर जाताना गर्जत होते. परत जाताना 'माझे प्रथम काव्यगायनही ह्या समारंभात आहे' असे गुणगुणत होते.

या उत्सवासाठी दोन कविता रचण्याचे कार्य दोन वर्षांपूर्वीच नागूजी-रावांनी हाती घेतले होते.

पण कविवर नागूजीरावांच्या त्या दोन कवितांचे बांधकाम अजूनही पुरे व्हावयाचे होते. रचना चाललीच होती, याविषयी नागूजीरावांना मोठा अभिमान वाटे. ते म्हणत, ह्यावरून शिल्पापेक्षा काव्याची श्रेष्ठता किती मोठी आहे हे कसे आपोआप सिद्ध होते पाहा! काव्य म्हणजे काही दगडाचुन्याचे बांधकाम नव्हे! ताजमहाल बांधावयास जी अनेक वर्षे लागली ती काही त्यांच्या शिल्पास, बांधकामास, लागली नाहीत; ते दगडी बांधकाम काय एका दहा दिवसांचे! पण वर्षानुवर्षे जी लागली ती त्या ताजमहालच्या भिंतीभिंतींवर नि खांबाखांबांवर जी काव्यमय चरणे कोरलेली आहेत ती काव्याची अक्षरे कोरण्यास होत! तरी देखील ती चरणे रचायाची नव्हती, नुसती कोरायची होती. पण मला तर त्या दोन कविता मुळातच रचावयाच्या होत्या. त्यांचे बांधकाम पायातील धोंड्याच्या भरीपासून तो कळसाच्या दगडापर्यंत 'एकहाती' करावयाचे होते. (नागूजीराव 'एकहाती एकटाकी! 'असेच' म्हणणार होते. पण त्यांच्या त्या दोन कवितांच्या बांधकामात कमीत कमी दोनशे बत्तीस टाक झिजून गेले होते; खुडाखुड झालेले एकशे बेचाळीस चवरखे कामास आले होते!')

कवी होण्याचा निश्चय नागूजीरावांनी दोन वर्षांपूर्वी जो केला त्याचे असे झाले होते. नागूजीरावांना स्वतःच्या असामान्य बुद्धिमत्तेविषयी नि

कर्तृत्वाविषयी असलेल्या दांडग्या आत्मविश्वासामुळे आपण जगात कोणाच्या तरी नात्याने अलौकिक नाव मिळविणार असे त्यांना नेहमी वाटत असे. त्यांनी प्रथमतः प्रो. परांजप्यांचा बडेजाव ऐकून रँग्लर होण्याचा निश्चय केला. पण दशांश अपूर्णांकाची धोंड दुर्दैवाने हायस्कूलमध्ये आडवी आल्यामुळे त्यांना ती वाट आरंभीच सोडावी लागली. इंग्रजी चौथीत असताना त्यांनी दोन वर्षे तीत उत्तीर्ण व्हावयाचा प्रयत्न चिकाटीने केला आणि तिसरे वर्षही ते चौथीत घालविणारच होते. पण मॅट्रिक होऊन तरी काय दस रुपडीची नोकरीसुद्धा मिळत नाही असे जेव्हा त्यांना कळले, तेव्हा 'साठाव्या वर्षापर्यंत मॅट्रिकला बसत राहीन, पण या जन्मी मॅट्रिक झाल्यावाचून राहणार नाही,' अशी चौथीच्या मास्तरांपुढे जी कृतनिश्चयी प्रतिज्ञा ते करीत असत, ती मोडण्यास उत्तम निमित्त सापडले नि वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांनी इंग्रजी चवथीतून नाव काढून शाळा सोडली. पुढे एका व्यापाऱ्याला सट्यात खूप पैसे मिळाल्याचे ऐकून त्यांनीही घरची होती नव्हती ती पुंजी सट्ट्यात घातली, ती त्यातच गडप झाली. त्यांनी घेतलेल्या लॉटरीच्या तिकिटांचा तर पत्त्यांचा जोडच झालेला होता आणि त्यापायी खिशाची चाळणी झाली होती. त्यांनी अलौकिकत्व संपादण्यासाठी मध्यंतरी एकदा सार्वजनिक चळवळीत भाग घेतला. प्रथम फेटा फेकून देऊन खादी टोपी घातली; नंतर ती फेकून देऊन केस पिंदारून बोडके हिंडले. पण आधीच डोक्यावर केस फार थोडे उरलेले असल्यामुळे टक्कल पडलेल्या त्यांच्या त्या डोक्याला त्या पक्षातही समरस होता आले नाही.

अशा स्थितीत वैतागून गेले असता त्यांनी त्यांची कहाणी त्यांचे एक मित्र छंदोपंत यांना सांगितली नि म्हटले, की 'माझ्यात अलौकिक होण्यासारखे अनेक गुण आहेत हा माझा ठाम सिद्धान्त झालेला असताही मला अजून जगात काहीच कसे होता येत नाही! याला काय करावे!' हे ऐकताच छंदोपंत म्हणाले, 'मित्रा, तुला काहीच होता आले नाही हे अगदी खरे ना? वेड्या, तर मग कवी होण्यास तू योग्य असलाच पाहिजेस! तू कवी हो! मीही असाच भटक भटक भटकलो; काहीच साधेना, तेव्हा कविता करू लागलो; आणि आता पाहातोसच की, मला

गेल्या कविसंमेलनात त्यांनी किती गौरविले. छंदोपंत ही एक पदवी तरी शेवटी पटकवता आली ! '

'हो रे हो ! पण, कविता करायची म्हणजे त्याचे शास्त्र हवे शिकायला ! जर का दशांश अपूर्णांकासारखे प्रकरण त्यात पुन्हा आडवे आले ! – '

'छट् ! कवितेच्या शास्त्रात अपूर्णांकाचा प्रश्नच येत नाही ! कवी हा स्वयमेवच एक पूर्णांक आहे ! तुला सांगतो ऐक. काव्यशास्त्राचे शास्त्र एका सूत्रामध्ये ! ते पाठ केलेस की सारे पाठ केलेस ! ज्याला शास्त्रच नाही ते काव्य, ही त्याची व्याख्या; आणि ' निरंकुशाः कवयः ' हे त्याचे सूत्र ! कवीचे जन्मसिद्धताम्रपट ! ! '

'ठीक ठीक ! पण कवीला अंकुश नसला तरी छंदोबंधनाचा लगाम तरी असतोच ना कोणतासा ? '

'छंद ! – बंध ? जाळून टाक ते बंधही ! तेवढीदेखील अडचण कवींना उरू नये म्हणून तर मी मुक्तबंध नावाच्या कविमंडळाचा सभासद झालो आहे. कवींना बंधनच जर नाही, जर कवी जन्मजात निरंकुश आहे तर पुन्हा छंदाचे बंधन पाळा म्हणून त्यांना सांगणे म्हणजे वदतो व्याघात नव्हे काय ? तू मुक्तबंध छंदातच कविता कर. गद्याच्या ओळी तुला लिहिता येतात ना ! त्या सरळ न लिहिता एकाखाली एक लिहीत गेलास, की मुक्तबंध छंद साधला ! '

'वा ! तोड पण काय सुचविलीस ! अडचण पण टळली आणि कालिदासापासूनच्या साऱ्या लौकिक कवींपेक्षा आपली अशी काही तरी अलौकिक अपूर्वाई पण आपल्या कवितेला लाभणार ! अडचणीवाचून अलौकिकता ! बरे, छंदांचा प्रश्न सुटला; पण काही झाले तरी कवितेमध्ये शिष्टांच्या कानाला गोड लागावे असे संस्कृत शब्द म्हणे पुष्कळच घालावे लागतात. आता मला संस्कृत येतच नाही असे नाही; पण कोणता शब्द संस्कृत नि कोणता असंस्कृत हे ओळखणे तेवढे बरेच जड जाते. त्यातही तो भाषाशुद्धीचा कायसा एक बाष्कळ वाद काही उपद्रवी लोक घालीत आहेत म्हणे ! त्यांच्या उपद्रवामुळे ' दिल, ' ' आदमी ' ' दुनिया ' असे अगदी शुद्ध संस्कृत शब्ददेखील कवितेत घालण्याची चोरी झाली आहे !

आमच्या तोंडी तर छप्पन्न भाषांचे इंग्रजी, उर्दू, हाटेंटाट, तुर्की शब्द खिळलेले. सट्टेबाजारात, गोदीवर, चोर बाजारात ही बाजारी बोलीच तुमच्या शुद्ध संस्कृतापेक्षा किंवा किंग्ज इंग्लिशपेक्षा आमच्या जास्त उपयोगी पडते. ती बाजारी बोली म्हणजेच आजची माझी मातृभाषा! पण तीत कविता चालेल काय?'

'होय तर! अरे, ती बाजारी बोली तुला खरंच छान येते का? तर मग वेड्या, भविष्यकाळाचा महाकवी होण्यात तूच आघाडी मारणार! अरे, आता कोण विचारतो त्या भूतकालाच्या संस्कृताला नि भाषाशुद्धीला? त्या शिवाजीचे नि त्या चिपळूणकरांचे ते भाषाशुद्धीचे खोबरे होणार! आता राष्ट्रीय भाषेची जागा कोण घेणार, आहे माहीत? न ज्ञानेश्वराची मराठी न टागोरांची बंगाली न तुलसीदासांची हिंदी! ही सट्टेबाजारातील बाजारी भाषाच आता राष्ट्रपदाच्या महत्पदावर चढणार आहे. अरबी, तुर्की, पारशी, यहुदी, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रजी – कमीत कमी इतक्या भाषांचे प्रतिनिधी शब्द तीत असणार! त्या त्या हिंदू, मुसलमान, यहुदी, ख्रिश्चन प्रभृती हिंदुस्थानातील नागरिकांच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक प्रांतातील बोलीत ते ते विदेशी शब्द मूळच्या स्वदेशी भाषांतून घेतलेच पाहिजेत! उदाहरणार्थ, बंगालीतले शेकडा हिंदू शब्द इतके; शेकडा मुसलमानी शब्द जितके शेकडा मुसलमान तितके, शेकडा ख्रिश्चन वसती तितके इंग्रजी – पोर्तुगीज – फ्रेंच शब्द! त्यातही मुसलमानी समाजाचा ते मागसलेले आहेत हा एक मोठा सद्गुण, एक मोठी अधिकारार्ह थोरवी, त्यांनी आमच्यावर केलेला एक मोठा उपकार असल्यामुळे त्यांच्या उर्दू शब्दांना विशेष प्रतिनिधित्व त्या राष्ट्रभाषेत मिळाले पाहिजे ही गोष्टही ठरलेलीच. तेव्हा जर तुला खरोखरीच सट्टेबाजाराची नि चोरबाजाराची भाषा येत असेल, तर तीत पुष्कळ उर्दू नि थोडे इतर शब्द असल्यामुळे तू तुझी नवी कविता बेधडक तीतच करू लाग! टागोरांची बंगाली कविता बंगाल्याबाहेर कोण वाचतो! पण तू जर त्या भावी राष्ट्रीय भाषा होणाऱ्या उर्दूबहुल बाजारी भाषेत कविता करशील तर ती तुझी बाजारी कविता साऱ्या हिंदुस्थानात घरोघर वाचली जाईल. थोडक्यात म्हणजे, तू ऊठ नि कविता करू लाग!'

त्या तडाख्यासरशी नागूजीराव लगेच उठले नि घरी जाऊन त्यांनी दोनचार कविता, – पहिली पुस्ती म्हणूनच, मराठी भाषेत – रातोरात रचूनही टाकल्या. मुक्तबंध छंदातच ते रचावयास गेले असताही ती कविता नकळत छंदोबद्ध होऊन पडली. आद्य कवींचेही असेच झाले होते. ते शोकसंतप्त होऊन ओरडावयास गेले तो अनुष्टुप रचून बसले !

' परकी शब्दांना मराठी प्रत्यय लागले की झाले ते शुद्ध मराठी ! ' या दिग्विजयी शास्त्राधारे रचलेल्या त्या कवितेची थोडीशी वानगी म्हणून काही चरणे खाली देत आहोत –

( चाल :– बाजीराव नाना । तर तुंबडीभर दाणा ॥ अशी काहीशी )

**रोमान्सच्या राज्यांत चल मारूं लांब मजल ॥**
**प्रिये तूं पोएट्री अँड मी एक तुझी गजल ॥**
**इष्काने मी बेजार झालो टेक[1] ना माझी दाद ॥**
**गल्लोगल्ली शाउटेन[2] तुझा खादी झिंदाबाद ॥**
**स्पीक एक वर्ड तरी ! रडतो धाय धाय ॥**
**रिक्वेस्ट नको रिजेक्टूं ही चाटिन तुझे पाय ॥**
**दिलाच्या गोठ्यांत दयेची जी गाय ॥**
**फुटूं दे ना पान्हा तिला डोंट मी[3] अॅनॉय ॥**
**स्तोत्रें, स्वीट हार्टे[4] ! तुझीं सिंगतो[5] बारबार**
**खुदी[6] तूं माझी मी तुझा खुदाइ खिदमतगार ॥ १**

या कवितेच्या ' दिग्विजय ' मराठीस मूर्ख लोक पूर्वी हसले. पण आज अनेक कवी आपल्या मराठी कवितेत खुदाई खिदमतगार आणि झिंदाबाद

---

१. इतर परकी शब्दांना प्रत्यय लावताच जर ते मराठी बनतात तर त्या न्यायाने इंग्रजी क्रियापदेही मराठीने आत्मसात् करावी या मताच्या आधारे–टेक--घे ! २. शाऊटेन—गर्जेन. ३. मी–मला ( Me ) ४. स्वीटहार्ट शब्दाचे मराठी संबोधन–प्रिये–५. सिंगतो–गातो. ६. खुदी–देव ( खुदा म्हणजे देव; त्याला मराठीत आत्मसात् करण्यासाठी मराठी व्याकरणाच्या घणाखाली ठोकून त्याचे स्त्रीलिंग, देवाची देवी तशी खुदाची खुदी, असा शब्द बनविला. )

हे शब्द उघडपणे खरोखरीच योजीत असतात ही गोष्ट गेल्या वर्षातील काही मराठी मासिके चाळताच वाचकांच्या ध्यानात येईल.

त्या कवितेमुळे नागूजीरावांचे नाव कविमंडळात चमकू लागले असल तरी त्यांना उघड सभेत स्वतःचे काव्य स्वतः गाऊन दाखविण्याची संधी भाषाशुद्धीवाल्या जुन्या कवींच्या मत्सरामुळे आजवर कुठेही मिळाली नव्हती, ती शेंदाडपूरच्या ह्या आजच्या शिवाजी उत्सवात शक्य तितक्या प्रचंड प्रमाणावर साजरी करण्यासाठी नागूजीरावांनी त्याचे कार्यवाहपद स्वतः स्वीकारून एक अत्यंत मनोरंजक नि भपकेबाज कार्यक्रम आखला होता.

पण तो कार्यक्रम उत्सवमंडळाकडून संमतवून घेताना सत्कार्याला नेहमी येतात, तशाच अनेक अडचणी आल्या होत्या. प्रथमतः त्या जिल्ह्याचे लोकप्रिय कलेक्टर मि. ब्लॅकस्टोन यांनी सर्व सरकारी नोकरांना उद्देशून जे एक परिपत्र ( Circular ) काढले होते, त्याचा विचार करावा लागला या परिपत्रात असे लिहिले होते की,—

‘ शिवाजीच्या उत्सवास जर खरे खरे राष्ट्रीय स्वरूप आलेले असेल तर त्यात सरकारी नोकरांनी भाग घेण्यास हरकत नाही. खरे खरे राष्ट्रीय स्वरूप म्हणजे असे की, त्या उत्सवाच्या कार्यक्रमात मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी, युरोपियन यांचे सर्व प्रतिनिधी स्वसंतोषाने येऊ शकतील असा त्याचा कार्यक्रम हवा. सरकारी नोकर नि नागरिक या दोघांनीही आजची शांतता नि सुव्यवस्था यांना धक्का न पोचेल असाच काय तो भाग शिवाजीच्या चरित्रातून निवडून त्या उत्सवात लोकांच्या पुढे आदर्श म्हणून ठेवावा. आजची या राष्ट्राची स्थिती शिवाजीच्या वेळच्या स्थितीहून अवनत झाली आहे, म्हणून ती सुधारण्यास शिवाजीने यावे असा कोणताही राजकीय बाष्कळ उल्लेख त्यात असू नये. फार तर आजची सुधारलेली शांतिसौख्यमय राष्ट्रीय परिस्थिती ही त्या काळच्या धामधुमीच्या, लुटालुटीच्या, हाणामारीच्या, रानटी परिस्थितीहून किती वरचढ आहे आणि आज जर शिवाजी असता तर तोसुद्धा शांततेचे नि शिक्षणाचे हे लाभ पाहून आधी जाता प्रायमरी स्कुलात, मग हायस्कुलात नि शेवटी रामकृष्ण मिशनात, अशा अर्थी काय तो शिवाजी-उत्सवात सद्य:परि-

स्थितीचा उल्लेख झाल्यास व्हावा ! नाहीतर केवळ ऐतिहासिक दृष्ट्या त्या काळी घडलेल्या गोष्टींचाच तेवढा खल करावा आणि त्या शिवाजीच्या उत्सवाचा समारोप Rule Britania ! Britania rules the waves ! अशा कोणत्या तरी उत्कृष्ट नि अनाक्षेपार्ह साम्राज्यगीतात केला जावा, अशा कार्यक्रमाने जो जो शिवाजी उत्सव होईल त्यात सरकारी नोकरांनी भाग घेण्यास हरकत नाही—नव्हे घ्यावाच. '

कलेक्टरचे हे परिपत्र म्हणजे नागूजी कवीच्या काव्यावर एक वज्राघात होता ! कारण त्या शिवाजी उत्सवासाठी त्यांनी जी एक अत्यंत उद्दीपक कविता केली होती ती कलेक्टरांच्या परिपत्रात नको म्हटलेल्या थाटाचीच होती ! ' भूमाता कसायांच्या सुऱ्याखाली हंबरते आहे—धाव ! विजापूरच्या रस्त्यात ती गाय सोडविलीस तशीच हे शिवराया, हीही गाय सोडीव, ये ! ' इत्यादी दहापाच ओळी तर अशा जाज्वल्य होत्या की, निदान दोन हजार टाळ्या तरी पडल्याच असत्या ! पण अरेरे ! नागूजी कवीला त्या ओळी गाळून टाकाव्या लागल्या ! कारण तशी कविता ठेवली तर सरकारी अधिकारी येणार नाहीत आणि तो शिवाजी उत्सव करावयाचे धाडस शेंदाडपूरच्या सभ्य नागरिकांनी जे ह्याच वर्षी केले ते त्यात सरकारी अधिकारी आताशी येतात ह्याच आधारावर अवलंबून. उत्सवमंडळाचे अध्यक्ष रावबहाद्दूर पोटाळे ह्यांनी साफ सांगितले की, शिवाजी उत्सवास जर राष्ट्रीय स्वरूप द्यावयाचे, तर राष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचा वर्ग जो सरकारी अधिकारी तो त्यात असलाच पाहिजे आणि अराष्ट्रीय शिवाजी-उत्सव आपल्याला करावयाचा नाही ! तेव्हा सर्वानुमते तसेच ठरले. साऱ्या कार्यक्रमातून सरकारी परिपत्राने आखून दिलेला भागच काय तो ठेवला. शिवाजी महाराजांच्या चरित्राविषयी केवळ ऐतिहासिक चर्चा करणारे निबंध, भाषणे, कविता – ह्याच काय त्या नव्या कार्यक्रमात समावेशिल्या. हे कळताच उत्सवाचे अध्यक्षपद घेण्याचे स्वतः कलेक्टर महाशय मि. ब्लॅकस्टोन यांनी मान्य केले.

तोच दुसरी अडचण दत्त म्हणून उभी राहिली ! शिवाजीच्या चरित्रातील ऐतिहासिक घटनांचे वर्णन निषिद्ध नाही म्हणून नागूजी कवीने अफझुलखानवधावर कविता करावयाचे ठरविले. अगदी इतिहासाला

धरून तेवढेच बोलणे, सद्य परिस्थितीचे नाव नाही, अशी दोन कडवी रचलीही आणि स्वागतमंडळाच्या बैठकीत रावबहाद्दूर पोटाळयांच्या पूर्ण संमतीने त्यांनी नवीन कार्यक्रम वाचून दाखविला! त्यात अफझुलखानाच्या वधावरील आपला पोवाडाही गाइला जाईल असे वाक्य नागूजीरावांनी जेव्हा उच्चारले तेव्हा अकस्मात् अफझुलखानच कोणाच्या अंगात संचारून डुरकाळावा तसे डुरकळत 'Stop! Stop that humbug' असे कोणीसे ओरडून उठले. पाहातात तो ते खानबहाद्दर फाजलखानसाहेब! उत्सवमंडळाचे उपाध्यक्ष!

त्या खानबहाद्दर फाजलखानांनी मोडक्या तोडक्या मराठीत साफ सांगितले की,

हिस्ट्रीबिस्ट्री को आग लगा दो! मुसलमानांना कमीपणा येईल असे एकही अक्षर उत्सवात निघता कामा नये, काफर शिवाजीका नाम भी हम नहीं सुनना माँगते! लेकिन क्या करे! कलेक्टरसाबनी चिठ्ठीच धाडली की राष्ट्रीय सोरूपचाच काय ते कार्यक्रम आहे तेव्हा तुम्ही बेशक या, म्हणून मी त्या बुदपरस्त शिवाजी का नाव तेवढा ऐकण्याचा मान्य केला. तो तुमने ए क्या बदमाशी मचाई है! अफझुलखानाचा वध क्या! वधबिध आम्ही काही सुनेंगे नहीं! इतिहासच कशाला हवा, या तमाशात! अफझुलखानानेच शिवाजीचा वध केला असा काही कविता रचून म्हणा हवा तर! नहीं तो हम चल देंगे!

'हां हां! खानबहाद्दरसाब! ठैरिये माफ करिये! ऐका तर खरे. आम्ही तुमचे सारे म्हणणे मान्य करतो. मग झाले ना?'

असा निकाल रावबहाद्दूर पोटाळे ह्यांनी दिला. त्यासरशी नागूजी कवीचा अफझुलखानाचा पोवाडाच काय, पण वीररसाचे जसे कोणतेही काव्य शिवाजीच्या इतिहासापुरते तरी निषिद्ध ठरले! मनात चरफडत पण वरवर सौम्यपणे नागूजीराव कार्यवाह या नात्याने जिज्ञासले – 'तर मग शिवचरित्रपर असे शिवाजी-उत्सवात काहीच बोलू नये हे उत्तम. घडलेला इतिहाससुद्धा सांगणे आता रद्द केले पाहिजे, नाही का? शिवाजी-विषयक हे सारे ऐतिहासिक निबंध परतवितो तर!'

रावबहाद्दूर पोटाळ्यांनी थोडा विचार केला. नंतर ते म्हणाले, ‘थांबा. शिवाजीच्या चरित्रातील जो भाग खानबहाद्दूरांना नापसंत तेवढा गाळला की झाले. मुसलमानांच्या भावना न दुखवील असा भाग शिवाजीच्या चरित्रातून पुष्कळ काढता येईल, काय खानबहाद्दूर, तुम्हीच तो निवडून द्यावा.’

त्याप्रमाणे त्या राष्ट्रीय शिवाजी-उत्सवात मुसलमानांच्या भावना न दुखतील असे जे शिवाजीचरित्र वाचावयाचे म्हणून खानबहाद्दूरांच्या संमतीने ठरविले ते एकश्लोकी रामायणाप्रमाणे अगदी चार चरणांचेच होते. ते असे :—

शिवाजी हा शहाजी नावाच्या मुसलमानांच्या एका अंकित सरदाराचा पुत्र होता. त्याच्या आईचे नाव जिजाबाई. तो कोणत्या तरी एका तारखेस ( सन १६२० ते १६३० च्या मध्यंतरी ) एका वर्षी जन्मला. ( जन्मतिथी वर्ष वादग्रस्त असल्याने राष्ट्रीय उत्सवात दोन्ही पक्षांना सामावता यावे म्हणून नक्की तिथी व वर्ष सांगितली नाहीत. ) जन्मल्या-नंतर बरेच दिवस जगून तो सन १६८० मृत्यू पावला !

या सर्वसंमत झालेल्या राष्ट्रीय शिवचरित्रावरही खानबहाद्दूरांचा एक अभिप्राय नोंदला होता. तो असा की, शिवाजी जन्मला हीच गोष्ट मुसलमानांच्या भावना दुखविते; पण राष्ट्रीय हिताकडे दृष्टी देऊन आणि कलेक्टरसाहेबांच्या शब्दास मोडू नये म्हणून, एवढ्या उल्लेखाकडे मुसल-मान बंधूंनी दुर्लक्ष करण्याची सहिष्णुता दाखवावी.

हे शिवाजीचे राष्ट्रीय चरित्र राष्ट्रीय शाळांतून शिकविण्यास हरकत नाही असा, शिवाबावनीस रद्द केल्यानंतर गांधीजींच्या कलास अनुसरून नागपूर राष्ट्रभाषासमितीनेही निर्वाळा दिला.

परंतु नागूजी कवीपुढे जो मुख्य प्रश्न होता तो कसा सोडवावयाचा ? आता शिवाजी उत्सवात ह्या नव्या राष्ट्रीय कसोटीस उतरेल आणि मुसलमानांनाही मानवेल असे काव्य कोणत्या विषयावर करावयाचे ? इतक्यात त्यांना एक युक्ती पण युक्ती सुचली ! शिवाजी उत्सव म्हणजे परा-क्रमाचा, विक्रमाचा. बदललेल्या परिस्थितीत विक्रमाचे क्षेत्र बदलेल; पण थोरवी बदलणारी नाही. तेव्हा त्याच्या परिस्थितीत जो विक्रम तो

शिवाजीने केला; तसा आजच्या परिस्थितीत जो विक्रम तो आज करणारा मनुष्यही अशा उत्सवात सन्मानिला जाण्यास सत्पात्र असलाच पाहिजे. त्याच्यावर कविता रचून तीच ह्या उत्सवात गावी !

सुदैवाने त्या शेंदाडपुरातील नागरिकांतच असा एक विक्रम करणारा वीर नुकताच उदयास आलेला होता. तेथील नरू न्हावी नावाच्या एका तरुणाने चोवीस तास सारखा वस्तरा चालविण्यात जागतिक उच्चांक पटकावला होता ! शेकडो लोकांचे केस भादरता भादरता शेवटी डोकी करणारा, दाढी करणारा, मिशा काढणारा मनुष्य जेव्हा मिळेनासा झाला तेव्हा त्याने म्हशी भादरण्यास लगोलग आरंभिले ! पण चोवीस तास वस्तरा नि कातरी जी सारखी चालविली होती ती खाली म्हणून ठेवली नव्हती ! साऱ्या जगातील न्हाव्यांत श्मश्रू करण्यात त्याने उच्चांक पटकावून केस भादरण्याचा हा जो विक्रम केला त्यामुळे महाराष्ट्राचे नाव या युगातही उज्ज्वल झाले होते. युरोपातही विक्रम करतात. पण युरोपातील लोकांत असली खरीखुरी पौरुषाची कृत्ये करून त्यात उच्चांक पटकावण्याची धमक कुठली असणार ! त्यांचे विक्रम म्हणजे फार फार तर अटलांटिक महासागर उडून जाण्याच्या स्पर्धेत, नाहीतर असल्याच दुसऱ्या कोणत्या तरी पोरखेळात असणार ! विमान चांगले असले की कोणीही उडेल ! तो यंत्राचा प्रताप, पौरुषाचा नव्हे ! पण चोवीस तास सारख्या विड्या ओढीत किंवा सारखा चहा ढोशीत किंवा सारखे केस भादरीत राहाण्यात पुरुषशक्तीचा खरा प्रताप व्यक्त होतो. कारण तेथे यंत्रबळाचा प्रश्न नसून हस्तबळाचा वा श्वासबळाचा वा पोटबळाचा प्रश्न असतो. त्यातही केस भादरण्याच्या चिकाटीत उच्चांक पटकावणे, रेकॉर्ड करणे, हे तर निर्भेळ पौरुषी कृत्यच होय ! कारण की आमच्या इकडे स्त्रिया अजून सहसा केस कापून घेत नसल्यामुळे आणि दाढीमिशा तर त्यांना फुटतच नसल्यामुळे चांगली गुळगुळीत जर कोणाची उडवायची, जर कोणाची मिशी उतरून द्यायची, जर दाढी उपटायची, तर ती बहुधा पुरुषाचीच उपटावी लागते ! केस भादरण्याच्या कृत्याचा मुख्य संबंध पुरुषाशीच असल्यामुळे ते खरे खरे पौरुषी कृत्य ठरते. हजामतीत

उच्चांक पटकावणे हाच निर्भेळ पौरुषी विक्रम ठरतो ! हे सारे विचार कवितेमध्ये घालायचे असे योजून कवीने कार्यक्रमात तो भाग प्रसिद्धही केला.

'चोवीस तास सारखे केस भादरण्यात जागतिक उच्चांक ज्याने पटकावला आहे, त्या श्मश्रूविक्रम करणाऱ्या नरू न्हाव्याचा गौरव ! आणि त्या वीरावरील नागू कवीचे प्रशस्तिकाव्यगायन ! या ! पाहा ! ऐका !' अशी प्रसिद्धके ( जाहिराती ) भडक रंगात जिकडे तिकडे फडकताच शिवाजी-उत्सवाच्या दिवशी मंडळींची नुसती रेटारेटी झाली ! मुंगीस जागा नाही असा समाज लोटला !

त्यातही तो राष्ट्रीय शिवाजी-उत्सव ! हिंदूच काय पण मुसलमान, यहुदी, पारशी, सरकारी, निमसरकारी, बिनसरकारी मनुष्यमात्र चिकार दाटले ! शिवाजी उत्सवासच काय पण कोणत्याही प्रश्नास असे राष्ट्रीय स्वरूप दिले असता तो किती थोर पदास पावतो, राष्ट्रीय एकी कशी आपसूक साधते त्याचे ते प्रात्यक्षिक होते !

उत्सवास शेवटी एकदाचा आरंभ झाला ! अध्यक्ष स्वतः कलेक्टर मि. ब्लॅकस्टोन साहेब होते. त्यांनी रावबहाद्दूर पोटाळ्यांना शिवाजीचे चरित्र सांगावयास आज्ञापिले. त्यांनी ते वर दिलेले चार ओळी चरित्र कसेबसे वाचले. तोच प्रेक्षकांतून 'हुश ! ते पुरे ! नरू न्हावी कुठे ? नागू कवी उठा !' म्हणून गलका चालला. तेव्हा नागू कवी लगेच उठले आणि प्रेक्षकांच्या वर्तनाचे समर्थन खणखणीत शब्दांमध्ये करीत म्हणाले,

'शिवाजीचे चरित्र ऐकण्यास तुम्ही इथे आलेला नाही हे मी जाणतो. मराठी शाळेतील क्रमिक पुस्तके, इतिहास, पोवाडा, नाटक, कादंबऱ्या जे पाहावे त्यात त्यात शिवाजीचे चरित्र चितारलेले असतेच. ते ऐकून ऐकून तुमचे कान खरोखरीच विटले आहेत ! शिवाजीचे आजच्या राष्ट्रीय कर्त्या पिढीला अजीर्ण झाले आहे ! त्यांना आता ज्यापासून आज उपयोगी पडेल अशी स्फूर्ती मिळविता येईल असा कोणीतरी अद्ययावत् विक्रमी पुरुष हवा होता ! आजच्या राष्ट्रीय कर्त्या पिढीला हा जुनापुराणा विक्रमी शिवाजी काय शिकविणार ? जे लोक त्याचे चरित्र गातात तेच सांगतात की, आजच्या परिस्थितीत शिवाजीच्या चरित्रापासून काही शिकावयाचे असेल तर हेच की, शिवाजीसारखे काही

भलतेसलते करण्याचा गाढवपणा न करणे हाच शहाणपणा होय ! तेव्हा पूर्वकालीन एक थोर पुरुष म्हणून शिवाजीमहाराज जरी समजले गेले होते तरी त्यांचा उत्सव करण्यापलीकडे आज त्यांच्या विक्रमाचा आम्हांस काय उपयोग आहे ? आज ज्या सुधारलेल्या विक्रमांचा प्रत्यक्ष उपयोग आहे असेच विक्रम आजच्या पिढीच्या पुढं आदर्श म्हणून धरावयास हवेत ! तशाच एका विक्रमी वीराचा गौरव आज आम्ही करणार आहो ! – तो वीर हा पाहा ! – ( असे म्हणताच पडद्यास सारून पविऱ्याची उडी मारीत नरू न्हावी पुढे येतो. ) – हा पाहा तो नरू न्हावी ! ( टाळ्यांचा प्रचंड कडकडाट ! त्यासरशी नागू कवी बेभान भडकून ओरडतात – ) त्या रायगडाचा तो पाहा जुना शिवाजी ! – आणि हा पाहा आमच्या शेंदाडपूरचा अद्ययावत् शिवाजी ! ह्याचा वस्तरा त्या जुन्या शिवाजीची भवानी तरवार तळपत नव्हती असा तळपत आहे ! ह्याची ही धोपटी अर्जुनाच्या अक्षय्य भात्यासही खाली पाहावयास लावीत आहे ! जर आज शिवाजी महाराज असते तर त्यांनी Misguided patriotism ची ती भवानी तरवार फेकून देऊन ह्या नरू न्हाव्याचा हा Spiritual Safety Razer च हाती घेतला असता यात मला काडीचीही शंका वाटत नाही ! '

इतक्यात खोक्यांच्या सजवलेल्या उतरंडीवरील महाराजांची तसबीर धक्का लागल्यासारखी कोलमडली व तिला सावरण्यास श्री. लुडबुडे पुढे होतात तो ती तसबीर गदगद हालू लागली. खालचे खोकेही करकरून डगमगले. दोघेतिघेजण ते पुन्हा पक्के बसवू लागले. इकडे नागू कवी भाषणाच्या आवेशात वक्तृत्वाच्या अत्युच्च शिखराच्या अगदी कडेलोटावर येऊन गर्जू लागले, ' आज जर शिवाजी येईल ! – '

इतक्यात धाड् धाड् धाड् ! तोफा एकदम सुटाव्या तसा एक मोठा धडाका उडाला. सारे उत्सवगृह गदगद हालू लागले. त्या तसबिरीखालची ती उतरंड कड् कड् कड् कोसळली ! – आणि तसबिरीतून कवचकुंडल मुकुटासहित भवानी तरवार उपसलेले प्रत्यक्ष शिवाजी महाराज ' हरहर महादेव ' गर्जून उभे ठाकले !

महाराज सिंहासारखे गरजले —

'कोण म्हणाले आत्ता की ' जर का आज शिवाजी इथं येईल? ' हा मी इथे आलो आहे? बोला काय हवे ते?'

त्या सिंहगर्जनेसरशी सारी सभा थरथर कापू लागली! खानबहादूर फाजलखानसाहेब, तोबा तोबा! दगा! फिसाद! असे ओरडत वाक्पीठावरून उडी टाकून वाट फुटेल तिकडे पळत सुटले. रावबहाद्दूर पोटाळे खुर्चीवरच्या खुर्चीवरच थंडे झाले. एवढा धीट इंग्रज तो कलेक्टर ब्लॅकस्टोन, पण त्या अद्भुतासरशी अंधारी येऊन तोही चक्करला! सुरतेच्या एका वखारीत आपण आहोत, मराठ्यांच्या नंग्या तलवारी चारी बाजूंनी चालून येत आहेत, टेबल होते ते नाहीसे होऊन तिथे पोत्यांची रास दिसत आहे असे त्या घेरीत मि. ब्लॅकस्टोन ह्यांना भासून ते त्या पोत्यांच्या राशीच्या आड म्हणून टेबलाखाली जाऊन दडले.

बिचारा नागू कवी! मटकन् खालीच हबकत होता; पण महाराजांनी त्याचा एक कान चटकन ओढून त्यास उभा केला नि विचारले, 'काय रे, मला कशाला यावे म्हणून बोलावीत होतास? काय भकत होतास! अं?'

ततत...पपप करीत नागू कवी म्हणाला, 'म-म-महाराज श श-श क्षमा करावी! आपण याल असे ठाऊक असते तर बापजन्मी आपल्याला बोलावण्याचे साहस केले नसते. 'ये शिव भूपाला!' अशी कविता जो तो गातो म्हणून मीही तसे काहीसे बोलून गेलो! म-म-म-म-मला च-च-च चक्कर येत आहे! पाया पडतो, कान सोडावा! मूर्च्छित पडू द्यावे या दासाला काही वेळ!'

'ठीक!' महाराज हसले – 'सोडतो तुम्हाला, पण ध्यानात धरा तुम्ही सारेजण की, जर पुन्हा तुम्ही कोणत्याही शिवाजीउत्सवात 'ये' म्हणून म्हटलेत तर मी शिवाजी महाराष्ट्रात पुन्हा खरोखरीच येईन!'

'नको! नको! महाराज! दुसरी वाटेल ती शिक्षा द्यावी; पण असली भयंकर शिक्षा महाराष्ट्राला देऊ नये! आम्हाला फार फार तर शिवाजी-उत्सव झेपतो; पण शिवाजी झेपणार नाही! आमच्या पिढीला हा नरू न्हावी आहे त्याचा विक्रम आम्हास पुरे! त्याचा Razor Safety त्याला किंवा शेळीच्या दुधावर वाढलेल्या कुठल्याही दुसऱ्या

शेळपटाला आमचा शिवाजी करा; पण महाराज, आपण सिंहीच्या दुधा-वर वाढलेले सिंह ? आपण स्वतःच येण्याचा धाक आम्हा बापड्यांना घालू नका ! नुसते शिवाजीउत्सव करू आम्ही हवे तितके ! – '

' नाही ! शेंदाडपूरच्या शेणकिड्यांनो, तुम्हाला शिवाजी नको हे तुमचे म्हणणे बरोबर आहे ! पण म्हणून तुम्ही यापुढे केव्हाही शिवाजी उत्सव करता कामा नये. जर पुन्हा असला एखादा राष्ट्रीय शिवाजी-उत्सव करून चंद्रराव मोऱ्यासारखी आमची विटंबना कराल तर – पाहिलेत हे काय ते ! '

लाख विजांचा लोळ तुटावा तसा असह्य प्रकाश तळपून भवानीच्या त्या झोतासरशी सभा मूर्च्छित पडली !

नागू कवीही मूर्छित पडले. पण मधूनमधून '... माझी कविता ... अरे कवितागायन ... तसेच राहिले ! ' असे चमकून काही वेळ बड-बडतच होते !

* * *

# ९. अपघात की आत्मघात

'कर, नमस्कार कर अं बाळा वडाला ! अस्सा ! देवबाप्पा आहे बरं हा वड !' भिमाबाई पाटलिणीने आपल्या दोन अडीच वर्षांच्या लहानग्यास भक्तिभावाने वडाच्या मुळावर डोके ठेवावयास सांगितले. त्या वडास भिमाबाई गेली आठ वर्षे, लग्न होऊन ह्या तिच्या सासरी आल्यापासून, नित्य नेमाने शंभर तरी प्रदक्षिणा घातल्यावाचून जेवत नसे. ती जरी त्या गावाच्या मराठी पाटलांच्या जुन्या घराण्यात दिली होती, तरी सध्या त्यांच्याकडे नावापलीकडे पाटिलकी अशी नव्हती. उलट अगदी निर्धन होते ते कुटुंब. त्यातही दीड वर्षापूर्वी तिचा नवरा प्लेगात वारला, तेव्हा तिचे हे एकुलते एक मूल घेऊन ती त्या वडाशेजारी विखुरलेल्या दहापाच झोपड्यांपैकी एका झापाच्या झोपडीत राही. दिवसारात्री वेळ सापडेल तशा विड्या वळी, नि एका मराठा पानतंबाखूवाल्या दुकानदारास त्या घरबसल्या विकून त्या तुटपुंज्या उत्पन्नावर आपले पोट भरी. ती आता मध्यम वयाची होती. त्या एका लहान मुलावाचून तिला मागेपुढे कोणीही नव्हते. तो वड तिचा देव नि ते मूल तिचा जीव.

वडाच्या प्रदक्षिणा संपवून त्या मुलास वडाच्या पायावर घालून, नैवेद्याचे थेंबभर दूध त्या मुलास तिने प्यावयास दिले. दुधाचा असा त्या मुलास तेवढाच उकाडा ! पण ते थेंबभर दूध वडाच्या – देवाच्या नैवेद्याचे ! तिला वाटे, ते प्याल्यावर इतर मणभर दुधादह्याने जी पुष्टी तिच्या बाळास येणार नाही ती त्या वडोबाच्या प्रसादाने आल्यावाचून राहाणार नाही. ते मूल मुळी जन्मले तेच वडोबाच्या प्रसादाने ! कारण लग्न होताच शेजारच्या चार आयाबायांच्या सांगण्यावरून वडास प्रदक्षिणा घालण्याचे जे व्रत तिने घेतले ते मुलगा व्हावा म्हणूनच होते. तशा नवसावाचूनही तिच्या बरोबरीच्या बायांना एक सोडून तीनतीन मुलगे झाले होते. पण पाच वर्षे प्रदक्षिणा घातल्यावर झालेले हे एक मूल त्या

वडाच्याच सेवेने नि प्रसादाने झाले असे तिला तेवढे वाटे. वडपिंपळाला वस्तुतःच देवता मानणाऱ्या त्या भाविक हिंदू वस्तीत तिच्या या श्रद्धेचे सर्वत्र कौतुक होई. इतकेच नव्हे, तर तिची ती श्रद्धा त्या वडाच्या जागृत दैवताची प्रतिष्ठा नि पूजा विशेषच भक्तिभावाने दूरवर फैलावण्यास कारण होई.

समोरच्या माळावर असाच एक जुनाट, सुकट, पोखरलेला वड होता. तो माळ मिशनरी साहेबाने विकत घेऊन तिथे दुसरीकडून दुष्काळा बिष्काळातून बाटवून वा पळवून आणलेली मुले पाळण्यासाठी एक मिशनची चाळ नि बंगला बांधला; तेव्हा तो निकटचा वड नि दोनतीन तसलेच रोगट पिंपळ बंगल्याच्या नि चाळीच्या रचनेस आड येतातसे पाहून मुळासुद्धा उखडून टाकले. नंतर त्या माळालगत जो नवा पथ बांधला त्याच्या दोन्ही रांगांस नवे वड नि पिंपळ असे छान रेखून लावले की, त्यांच्या सलग कमानीखाली तो पथ म्हणजे एखाद्या सुदीर्घ कुंजासारखा भर उन्हाळ्यातदेखील शीतल वाटावा. त्या वडपिंपळांच्या तिरप्याशिरप्या फांद्या प्रतिवर्षी काटून छाटून त्यांना माणसाळविलेल्या हत्तीच्या सोंडेत धरविलेल्या चवरीसारखे मनुष्याच्या सोयीसोयीनेच डोलत झुलत राहावयास भाग पाडले होते. वडपिंपळ मुळासकट उपटणाऱ्या, प्रत्यही त्यांच्या फांद्या कापणाऱ्या, एकही प्रदक्षिणा न घालणाऱ्या त्या मिशनला कोणत्याही वड-पिंपळाने ‘ मुले न होण्याचा ’ शाप कसा दिला नाही ? उलट त्या मिशनमधली मूले अधिक गुटगुटीत नि वाढल्या संख्येची कशी ? इतकेच नव्हे तर एकदोन प्रसंगी अलीकडेच त्यांच्या बंगल्यातील दोघी बाळंतिणीस सुरेख असे जुळे मुलगे उपजून ते दुडूदुडू त्या माणसाळलेल्या वडपिंपळाच्या छायेत खेळत असता त्यांना त्या तोडलेल्या वडपिंपळावरील रागीट मुंजोबाने एकही बोचकारासुद्धा आजपर्यंत कसा घेतला नाही ? असे भिमाबाईस त्या भागाच्या वतीने त्या गावच्या नगरसंस्थेत सभासद म्हणून निवडून गेलेले डॉ. मोहिते हे पुष्कळ वेळा विचारीत आणि समजावून सांगत की, ज्या अर्थी तो वड अगदी पोखरलेला, रोगीट, छायाशून्य नि पडावयास आलेला आहे त्या अर्थी त्याच्या आसपासच्या झोपड्यांवरचे ते एक संकट टाळण्या-

साठी तो पाडून उखडून टाकणेच इष्ट.

डॉ. मोहिते हे भिमाबाईचे दूरचे नातलग. त्यांना म्युनिसिपालिटीत निवडून देताना त्या बिचारीला स्वतःचे मत नव्हते, तरी दोनतीन नातलगांची मते तिच्या यत्नानेच मिळाली होती. पण पुढे नगरसंस्थेत गेल्यावर डॉ. मोहित्यांनी आपल्या भागातील वाटा, आळ्या, अंगणे, चौक स्वच्छ, बिनधोक नि रेखीव करून तिकडचे आरोग्य वाढवावे असे मनात आणून काम चालू केले. खळगेखाचा भरून वाटा सुधारल्या, बोळातील उकिरडे, घरांच्या रांगामध्येच साचलेली डबकी, माजलेली झुडपे, सडलेले गडगे साफसूफ नि नीटनीटके केले आणि आता मुख्य सडकेच्याच कोपऱ्यावर तिरप्या पुढे आलेल्या एका दगडी ढिगाऱ्यातून ज्याचा जुनाट, पोखरलेला नि सुकट सोट वर गेला आहे, एक आडवी अस्ताव्यस्त वाकलेली फांदी सडकेच्या डोक्यावर उगारलेल्या लाठीप्रमाणे आलेली आहे, नवीन पालवीचे उगीच काही झुबके वर्षाकाठी फुटत, तेव्हा काय ते ते झाड आहे, पुरलेला नि बांधलेला वासा नव्हे असे वाटे; इतका जो निर्जीव, निःसत्त्व नि छायारहित झालेला आहे, असा तो वड पाहून तो तिरपा ढिगारा काढून सडकेवरील ती आडकाठी नि त्या ढिगाऱ्याच्या भोवती वेड्यावाकड्या बांधलेल्या झोपड्यांतील माणसांवरचे ते संकट दूर करावे, असा डॉ. मोहित्यांनी बेत केला. पण ती गोष्ट लोकांस कळताच त्या वसाहतीत एकच गवगवा नि आरोळा उठला. ‘ आमचा वड ! आमचा वडोबा देव ! पाडू देणार नाही ! आमच्या धर्मभावना दुखविता कामा नये ! ’

भिमाबाई पाटलिणीला तर तो तिचा पूजेचा वड पाडू पाहाणाऱ्या डॉक्टर मोहित्यांचा मनस्वी राग आला होता. ज्या वेळी नगरसंस्थेत तो ठराव येणार होता, त्याच्या आधीच त्या वस्तीच्या लोकांनी वड पाडून आमच्या धर्मभावना दुखवू नयेत, असा निषेधाचा एक अर्ज करण्याचे ठरविले होते; आणि त्यावर सह्या घेण्याचे काम जोराने चालले होते. त्याविरुद्ध वड तोडावा असे म्हणणाऱ्यांचा अर्जही अर्थात् व्हायचा; पण त्यावर सह्या मिळणे फार कठीण जाऊ लागल्यामुळे त्या दिवशी डॉ. मोहिते हे स्वतः घरोघर हिंडून लोकांची समजूत घालीत होते. त्याच

भागात मोडणाऱ्या त्या मिशनच्या चालक मिस ल्यूसी ह्या अमेरिकन बाई तो वड तोडावा ह्याच मताच्या; त्याही नगरसंस्थेच्या मिशनरी सभासद; ह्यासाठी त्याही वड तोडण्यास अनुकूल मते मिळविण्याचे काम काढून घरोघर हिंडत होत्या. परंतु वडाच्या प्रकरणापेक्षा हिंदुधर्म किती ' सुपरस्टिशस ' — धर्मभोळा आणि ख्रिश्चन धर्मभोळेपणापासून सर्वस्वी अलिप्त, हे पुराण पाल्हाळाने सांगत बसण्यामध्येच मिस् ल्यूसीबाई त्या संधीचा उपयोग अधिक प्रामुख्याने करीत होत्या.

भिमाबाई आपल्या मुलास वडाच्या पायथ्यावर डोके ठेवण्यास सांगून पूजा आटोपून त्या ढिगाऱ्याच्या खाली मुलास उतरवून जो आपल्या खोपटाशी येऊन पाहाते तो मिस ल्यूसी हसतमुखाने तिथे उभ्या असलेल्या तिला दिसल्या. वड तोडावा अशा मताची सही भिमाबाईने द्यावी असे त्या म्हणाल्या तेव्हा ' मी काय ते उद्या सांगेन ' असे म्हणून भिमाबाईने वेळ मारून नेली. मिस ल्यूसी त्या झोपड्यांतील मंडळीत नेहमी मिसळे, खाऊ वाटी, बायबलची गाणी गाई, ' वडाच्या पूजेचे फळ म्हणजे हे माझे बाळ ' असे भिमाबाईने बोलण्याच्या ओघात गहिवरून सांगितले, तेव्हा मिस ल्यूसीने त्या विषयाचा ओघ आपल्या आवडत्या प्रकरणी मिळवून म्हटले ' वेडे खरे ! पण आईचे प्रेम हो टुमचे हे ! या प्रेमाने देवादिकांनासुद्धा गहिवर येतो बरे ! आमच्या देवी मेरीचेच पाहा ना ! गाणेच म्हणते अं हे ! असा उपक्रम करून मेरीला येशूची मूर्ती पाहून प्रेमाचा पान्हा कसा फुटला त्याचे बायबलातील कथेवरचे एक मराठी गाणे म्हणण्यास तिने आरंभ केला. बाई गोरी, गाणे मराठी, गळा गोड, नको म्हटले तरी भिमाबाईला ते ऐकावेसे वाटले. दहा पाच इतर बाया-मुलेही जमली. ते गाणे चालले आहे तोच डॉ. मोहितेही सह्यांचा एक कागद घेऊन तिथे आले त्यास पाहाताच मिस ल्युसी उठल्या नि विषय झटकन बदलून म्हणाल्या, ' हॅलो डॉक्टर ! या टुमच्या हिंदू लोकांट काय धर्मभोळेपणा भरला हे बघा ! ये बाई समझटे है की वडाचे प्रसाडाने टिला मुलगा झाला ! विश्वास टरी कसा बसटो अशा भाकड समजुटी-वर ? टुमच्यासारखे रॅशनॅलिस्ट लोक यांना सुधारीट की नाहीट ? '

डॉ. मोहिते थोडे हसून म्हणाले. ' मिसीसाहेब, माझ्यासारख्या खऱ्या

रॅशनॅलिस्टसंबंधी विचाराल तर मला तुम्ही दोघीही सारख्याच धर्मभोळ्या वाटता ! अहो, तुम्ही आत्ताच श्रद्धापूर्वक जे गाणे म्हणत होतात तेच आठवा ! वडाच्या प्रसादाने मुलगा झाला ही ह्या भिमाबाईची श्रद्धा बुद्धिवादाने टाकाऊ ठरते हे तुमचे म्हणणे जितके खरे आहे, तितकेच कुमारी मेरीच्या पोटी देवाच्या तेजाने येशूख्रिस्त जन्मले ही तुमची श्रद्धासुद्धा टाकाऊ ठरते हेही खरे नाही काय ? '

'पण ही आमची ढर्मभावना है ! '

'आणि वडही ईश्वराचे प्रतीक, त्याच्या प्रसादाने मूल होते ही भिमाबाईची धर्मभावनाच आहे. ती तिची भावना खुळी आहे असे बुद्धिवादाच्या, ' रॅशनॅलिझम ' च्या प्रचारार्थ जर तुम्ही सांगता आणि ते चांगलेच करता, तर त्या बुद्धिवादाच्याच कसोटीस तुमच्या धर्मभावना लावण्याचा अधिकार मलाही असला पाहिजे ! अहो, पृथ्वी वाटोळी आहे हे सांगणाऱ्यालाही धर्मभावना दुखवितो म्हणून ख्रिश्चनांनी ठार केले. पृथ्वी फिरते हे सांगण्याविषयीही दंड झाला ! फार काय अमेरिका खंड शोधणाऱ्या कोलंबसासही बायबलमध्ये न सांगितलेले देश आहेत असे म्हणून आमच्या धर्मभावना हा दुखवितो, या आरोपाखाली ख्रिस्ती धर्मगुरूंनी अपराधी ठरविले नव्हते काय ! धर्मभोळेपणाचा मक्ता हिंदू लोकांनाच तेवढा दिलेला आहे ही तुमची समजूत नि शेखी हाही एक धर्मभोळेपणाच आहे. खरा बुद्धिवादी ज्या ज्या समजुती असत्य वा लोकहितास प्रत्यक्ष अपायकारक आहेत त्या त्या सुधारू शकतो, मग त्या ख्रिस्ती असोत, मुसलमानी असोत ! आणि अशा खुळ्या समजुती सर्व धर्मातील लोकांत धर्माचे कातडे पांघरून बोकाळलेल्या आहेत. हिंदूंतील धर्मभोळ्या समजुती काढून त्यांच्या गळ्यात मुस्लिम वा ख्रिस्ती धर्मवेडेपणाचा धोंडा बांधणे हा काही बुद्धिवादाच्या प्रचाराचा प्रामाणिक मार्ग नव्हे ! '

इतक्यात समोरच्या चर्चमध्ये अकरा वाजल्याचे ठोके पडले. मिस ल्यूसीसमोर भिमाबाई मनमोकळे बोलणार नाहीत असे वाटून नि घरी जाण्याची वेळ होऊन गेली म्हणून डॉ. मोहिते भिमाबाईस ' आता मला गेलंच पाहिजे, संध्याकाळी येईन अं ! ' असे सांगून मिस ल्यूसीबाईसह

बोलत बोलत परत गेले. भिमाबाईनाही हायसे वाटले. कारण त्या डॉ. मोहित्यांच्या भिडेस बळी पडण्याचे टाळीत होत्या. ' वड पाडू नये ' या अर्जावर सही मागणारे लोक आधी भेटावे अशी त्यांची इच्छा होती.

' वडदेवा, तुला पाडून टाकणारांचेच दात पडोत ! ' असा भिमाबाईने आज पूजा संपताना त्या वडालाच नवसही केला होता.

इतक्यात पंचवीसतीस लोकांचा घोळका घेऊन भिंगार्डे वकील या वस्तीत वादळासारखे आले. ' सह्या करा ! खोड मोडा ह्या वडपाड्यांची; तुम्ही कोणत्या पक्षाचे ! वडपाडे की वडराखे ? सनातनी की सुधारक ? ' असा ते लोक एकच गलका करीत सह्यांवर सह्या घेत चालले. सही नसली तर अंगठ्याचे ठसे. त्या वस्तीत बहुतेक वस्ती वडराखी पक्षाचीच होती. भिमाबाईनीही आपण होऊन सही दिली नि वडाचे ते दैवत किती जागृत आहे हे आपल्या स्वतःच्या अनुभवे सर्वांना कळकळीने सांगितले. कडेवरच्या मुलाची हनुवटी वर उचलून भिमाबाई आसवे गाळीत म्हणाली, ' माझ्या प्रदक्षिणांच्या व्रतास वडोबा पावला नि हे बाळ मला दिले ! माझ्या वंशाच्या वेलीला फूल आले ! पुढे लगेच ह्या तान्हुल्याचे वडील प्लेगात इथेच ज्या दिवशी वारले त्या दिवशी मी या लेकराला ह्या वडाच्याच पायावर घातले नि म्हटले, ' देवा वडा, आता तूच माझ्या या लेकराला सांभाळ ! तुझ्या सावलीत तुझ्या पायावर हे माझे मूल लहानाचे मोठे होऊन कापसासारखे पांढरे शुभ्र केस होईतो नांदू दे. चिरंजीव होऊ दे ! ' दहापाच वेळा दहापाच येत्याजात्यांना तिने तेच ते सांगितले नि प्रत्येक वेळी कथेचा पूर्णविराम झाला की एक असे त्या लेकराचे दहापाच मुके घेतले.

वडराखे पक्षाचा तो घोळका परत चालला. सगळ्यांच्या पुढे श्री. भिंगार्डे वकील तावातावाने प्रतिज्ञा करीत होते की, ' ह्या वडपाड्यांचे दात पाडीन तरच मी भिंगार्डे ! ह्या सगळ्या पाखंडाचा मूळकंद म्हणजे हा धर्मबुडाऊ डॉ. मोहिते. पण त्याचा तरी दोष काय ? अशा अस्तनीतल्या निखाऱ्यांना म्युनिसिपालिटीच्या अस्तनीत ठेवणारे तुम्ही मतदारच दोषी आहात. आता द्याल का पुन्हा त्याला निवडून ? '

सारे लोक एकमुखी कण्यासारखे ओरडले, ' उभा तर राहू द्या आता

त्या डॉक्टर मोहित्याला पुन्हा ! आता भिंगार्डे वकिलानांच निवडून देणार ! वकील महाशय, तुम्ही राहिलेच पाहिजे आँ उभे. एक वेळ हा वड पडू देऊ पण भिंगार्डे वकिलांना निवडणुकीत पुन्हा पडू देणार नाही ! '

लोकांची ही प्रतिज्ञा ऐकताच भिंगार्डे वकील 'आता वड पडला तरी चिंता नाही.' असे सपकन् बोलून जाणार होते; पण वेळीच त्यांनी ते शब्द गिळले. भिंगार्डे वाणीजातीचे. पूर्वी एकदा कथेच्या वेळी देवळात त्यांना ब्राह्मणांनी बुक्का लावण्याचे नाकारले; तेव्हा ते स्वतःस सुधारक म्हणवून ब्राह्मणास यथेच्छ शिव्या हासडीत. त्याचे प्रायश्चित्त गेल्या निवडणुकीत त्यांना मिळून ते पडले नि डॉ. मोहिते निवडून आले. ही वड न पाडण्याची चळवळ त्यांनी का हाती घेतली हे आता न सांगताही समजण्यासारखे आहे. सनातनी ब्राह्मण बहुसंख्य मंडळींची मते आता त्यांना नक्की मिळणारी होती. धर्मबुडव्या डॉ. मोहित्यांना आता लवकरच होणाऱ्या निवडणुकीत चारी मुंड्या चीत पाडण्याचा त्यांचा डाव, हा वडाचा हुकमी एक्का त्यांच्या हातात आल्यामुळे जिंकल्या-सारखाच होता. वकिलीत नि निवडणुकीत पक्षकार नि मतदार मिळवून देणारा जो सोप्यातला सोपा उपाय— तो सनातन धर्म, ही त्यांची व्याख्या होती.

नगरसंस्थेच्या सभेत, वड पाडून, तो कोलमडावयास आलेला पानांचा ढिगारा काढून, सडक सरळ करावी म्हणून ठराव येण्याच्या दिवशीच वड पडू नये ह्या अर्थाचा शेकडो नागरिकांच्या सह्यांचा तो अर्जही दाखल झाला ! वडराखे नि वडपाडे ह्या दोन पक्षांतील चुरस अगदी विकोपास गेली. सडकेवरून जाणाऱ्या नागरिकांच्या जिवावर, त्या कोल-मडलेल्या उंच ढिगाऱ्याचे, त्या पोकळ पतनोन्मुख फांद्यांचे नि त्या सोटाचेही संकट तलवारीसारखे लटकते आहे हे बहुतेक सभासदांना मान्य होते. पण विरोध चिघळलेला ! शेवटी अध्यक्षांनी सामोपचाराने त्या बाजूच्या वस्तीची समज पाडण्याचा यत्न करण्यासाठी तिकडच्या पंचवीस पुढाऱ्यांची सभा भरवून तडजोड करवावी असा सभासदांस अभिप्राय दिला. स्वतः अध्यक्षसुद्धा समज पाडण्यासाठी नेमलेल्या मंडळात होतेच. ही

तडजोड घडेतो त्या सडकेच्या फाट्यास 'वाट बंद' म्हणून दोन्ही तोंडांवर पाट्या लावाव्या आणि गाड्याप्रभृती वाहनांना तरी बंदी असावी, अशी तात्पुरती व्यवस्था झाली! माणसांना वाट बंद केली— पण तो सुकट वड नि पडाऊ पार पाडला नाही! झाडाच्या सोयीसाठी माणसांची गैरसोय!! झाड देव, मनुष्य झाडपाला!

समजूत पाडण्यासाठी बोलावलेली सभा भरली. त्या वस्तीचे पंचवीस-तीस पुढारी आणि अध्यक्षांसुद्धा बरेच नगरसंस्थासभासद उपस्थित होते. वडराखे पक्षाचे शेकडो लोक सभागृहाबाहेर लोकमताचा दाब पाडण्यासाठी भिंगार्डे वकिलांनी जमवून ठेविलेले होते. स्वतः भिंगार्डे, हरभटशास्त्रीप्रभृती मंडळी पुढारी म्हणून सभेत होती. नगर-संस्था-सभासद म्हणून मिस ल्यूसी नि पीरजादे हेही आले होते.

वड का पाडू नये याची कारणे, सांगण्यास प्रथम हरभटशास्त्री उठले, 'वड ही देवता आहे. त्यास पूजावे, प्रदक्षिणावे आणि कधीही तोडू नये असे शास्त्र आहे.' 'जे हिंदू लोक वडाला तोडतील ते' 'पतन्ति नरके घोरे' असा शास्त्राचा स्पष्ट दंडक आहे! माझ्या आजोबांना एक भूमी दान मिळाली, घर लहानसे तीवर बांधले; पण वडाचे झाड मध्ये असे होते की त्याला टाळून घर सलग बांधणे कठीण. अशा अडचणीतही ते झाड न तोडता घर तिरपे-शिरपे बांधले; पण वड तोडला नाही. उलट त्याच्याभोवती लहानसा चौक सोडून, कौलारातून त्याला धुराड्यासारखा मार्ग वर मोकळा सोडला. त्याची पाने, कचरा सारा कौलारावर घराच्या आतबाहेरही पडे; त्याला लागून असणाऱ्या भिंतीखाली, त्याची मुळे घुसून एक भिंत ढासळली ती पुन्हा बांधली, पण त्या धर्मपरायण ब्राह्मणाने वड पाडला नाही. आजही त्याच घरात आम्ही राहातो, आणि वडाची पूजा, नैवेद्य झाल्यावाचून जेवत नाही. आम्हां हिंदूंची धर्म-भावना हे घडू देणार नाही!'

'वड तोडणे म्हणजे हिंदुधर्म उच्छेदणे, आणि वड पूजणे म्हणजे हिंदू असणे, अशी हिंदू धर्माची उथळ नि भिकार व्याख्या कोणत्याही ग्रंथात मला आढळत नाही.' डॉ. मोहिते शांतपणे बोलू लागले, तोच भिंगार्डे वकील मध्येच उठून चवताळले,

'तशी व्याख्या तुम्हांला आढळत नसली तरी मला आढळते. अहो, वडाची पूजा जी आमच्या धर्मात सांगितली, ती काही धर्मभोळ्या अशा कोण्या वेडगळाने नव्हे, अगदी तुम्ही ज्या विज्ञानाच्या ( Sciences च्या ) नावाची शपथ घेता जाता घेता, त्या विज्ञानाच्या आधारे वडाची थोरवी किती आहे ते बघा ! त्याच्या पारंब्या औषधी, त्याची छाया, त्याची पाने, दूध, त्याचा अणू नि अणू एखाद्या हुतात्म्यासारखा मनुष्याच्या हिताला वाहिलेला आहे. तो पडला तरी मरणानंतरही त्या वडाचा देह म्हणजे त्याची लाकडे, फांद्या, पाचोळा आपल्या झोपड्यांच्या वाशास आणि चुलीच्या जळणास उपयोगी असतात. अर्थात् हुतात्म्याहून परोपकारात वड श्रेष्ठ आहे. कारण मेल्यानंतर हुतात्म्यांच्या हाडांचे वासे आमच्या झोपड्यांस उपयोगी पडत नाहीत, त्यांचा कोणचाही भाग चुलीचे सर्पण म्हणून जाळता येत नाही. अहो मूर्खहो, यास्तव आमच्या त्रिकालदर्शी ऋषिवर्यांनी वडास देव मानले, वड ईश्वराचे प्रतीक आहे ! ईश्वराची विभूती आहे ! ! वडच ईश्वर आहे ! ! जो वडा पिंपळाला तोडील तो हाडाचा हिंदू नव्हे ! तो मुसलमानच होय ! '

भिंगार्डे वकील भर रंगात येऊन, आणखी बोलणार होते, पण मूळ वक्ते डॉ. मोहिते असता आपण मध्येच बोलत आहां, असे अध्यक्षांनी घंटी वाजवून वाजवून दरडावल्यामुळे ते थोडे थबकले; तो दुसरेच प्रकरण मध्ये आले ! – कारण हिंदू हिंदूंच्या रूढीविषयक वादात शक्यतो बोलू नये, अशा शिष्टाचाराचा अवलंब मिस ल्यूसी आणि पीरजादे यांनी करावा असे साधारणपणे ठरले होते. पण भिंगार्डे वकिलांचे शेवटचे शब्द ऐकून पीरजादे यांस हसूच आवरेना ! ते खदखदा हसू लागले. भिंगार्डे वकील त्यामुळे चिडून विचारतात – ' त्या तिथल्या माननीय सभासदांस एवढे हसावयास काय झाले आहे ? इथे काही तमाशा नाही !'

भिंगार्डे यांचे हे आव्हान ऐकून पीरजादेही खवळले, ' सांगणार नव्हतो वकीलसाब ! पण आता स्वतःच विचारता म्हणून सांगतो. वड-पिंपळ तोडतो तो हाडाचा हिंदू नव्हे, तो मुसलमानच असे आपण आता ठामपणे गर्जलात ना ? म्हणून शंका आली – आपण स्वतः हिंदू की

मुसलमान ? कारण लोकहो, चार वर्षांपूर्वी या भिंगार्डे वकील साहेबांनी माझी एक जमीन विकत घेतली. तीत चारपाच वड-पिंपळ होते ते या वकीलसाहेबांनी स्वतः उखडून, पाडून एक टुमदार बंगला बांधला ! माफ कीजिये वकीलसाब, लेकीन यह बात सच या झूट ? '

साऱ्या सभेत एकदम हशा पिकला. भिंगार्डेही हसले. पण वकीलच तो ! काहीतरी उत्तर येणारच त्याच्या तोंडून ! सपकन् ते बोलून गेले, ' अहो तेव्हा मीही एक सुधारकच होतो ! '

' मग आताही व्हा की दोन दिवस तसेच सुधारक नि तोडून टाका की तो वड ! ' परिजादे लोकप्रियतेच्या ओघात सापडून वाहवत चालले, ' त्या सडकेवर दोनचार माणसे दगावतील त्या वडापायी ! काय धर्मवेडेपण बघा हे तुमच्या हिंदू लोकांचे ! आम्ही एक सोडून असे एकशे वड तोडून टाकू पण सडक अडवणार नाही. आम्हां मुसलमानात सारे ' रॅशनल ' ! झाडाची पूजा ! असे म्हणून पीरजादे पुन्हा एकदा खो खो हसले ! पण या वेळी ते एकटेच हसत होते. लगोलग डॉक्टर मोहिते पुन्हा उभे राहिले नि म्हणाले,

' खांसाहेब, झाडाची पूजा मुसलमानात नसते, हाडांची असते ! वड पाडू नये, त्याने आमच्या धर्मभावना दुखावतात असे हिंदू नुसत्या कोटिक्रमाने भांडत आहेत; पण पलीकडच्या वर्षीच जेव्हा हिंदूंच्या भर वस्तीतील एका घराच्या आतल्या चौकात काही कबरीसारखे बांधकाम असल्याचे, काही मुसलमान पिंजाऱ्यांनी त्या घरी कामकाजास जाताना पाहून ती पिराची जागा आहे म्हणून धिंगाणा घातला नि ते घर पाडून तिथे दर्गा स्थापून, निमाज पढून त्यास अडथळा होऊ नये यासाठी त्या साऱ्या हिंदू वस्तीतील वाद्ये बंद करावीत येथपर्यंत हट्टवादाचा टप्पा गाठला, तेव्हा आपण स्वतः त्या मुसलमानांच्या म्हणण्याच्या समर्थनासाठी लाठीक्रमाने देखील भांडावयास सिद्ध झाले होतेत ! ती पिराची चार हाडे सन्मानपूर्वक तेथून काढून दुसरीकडे पुरली असती तर ? अशा हाडापायी कित्येक राजमार्ग हिंदुस्थानात बंद पाडाण्यात येतात ! मशिदीवरून राजमार्गाने सुद्धा वाद्ये वाजवू नयेत म्हणून प्रतिवर्षी मुसलमानांच्या

दंग्यात किती डोकी फुटतात? खानसाहेब, धर्मवेडेपणा हा सर्व धर्मानुयायांत आज तरी ह्या वा त्या स्वरूपाने भरलेला आहे. मनुष्यहिताच्या आड येणाऱ्या अशा भाबड्या धर्मभावना कोणत्याही समाजात असल्या तरी जो सुधारू इच्छितो तोच खरा बुद्धिवादी; खरा धर्मभीरू, कारण धर्म म्हणजे मनुष्य समाजाच्या उद्धाराचा, धारणाचा मार्ग. भिंगार्डे वकील माझ्याविरुद्ध म्हणून जे बोलावयास गेले तेच माझ्या विधेयाचे समर्थक झाले! ते म्हणाले वडपूजा ही देवप्रतीक मानण्यात आमचे पूर्वज चुकले नाहीत; कारण वडपिंपळ ही झाडे मनुष्यास अतिशय उपयोगी आहेत. मग मी तरी अगदी तेच म्हणतो आहे! पण त्यातूनच निघणारा उपसिद्धान्तही भिंगार्डे यांस कसा नाकारता येईल बरे? सिद्धान्त हा की, गाईबैलांसारखे पशू काय किंवा वडपिंपळांसारखी झाडे काय, ती मनुष्यास अत्यंत उपयुक्त असतात, म्हणून त्यांच्याविषयी आम्हांस प्रेम वाटावे, त्या प्रमाणात किंचित् पूज्यताही वाटो. त्यांचे संरक्षण, पालन नि कौतुकही करणे आमचे कर्तव्य, ह्या अर्थीच काय तो, तो आमचा धर्म! पण त्याचाच उपसिद्धान्तही हाच नव्हे काय की, ज्या परिस्थितीत ते पशू वा ती झाडे मनुष्यास उपद्रव देण्यास कारण होतात, तेव्हा ती पालनीय वा रक्षणीय राहात नाहीत आणि जेव्हा त्यांच्या नाशानेच मनुष्यजातीचे वा राष्ट्राचे हित साधणारे असते, तेव्हा त्यांचा नाश हाच मनुष्यधर्म वा राष्ट्रधर्म होणार!

'या पायी मनुष्ये मेली तरी वड न पडला पाहिजे असे म्हणणे म्हणजे निर्भेळ मूर्खपणा आहे. भिंगार्डे वकील यांनी या कृत्यास शहाणपणा ठरविण्यासासाठी केलेल्या बुद्धिवादाने हेच सिद्ध केले. धार्मिक अज्ञानाचे समर्थन विज्ञानाने—अद्ययावत् सायन्सने करू पाहाणाऱ्या या सर्व अर्धवट लोकांचे कोटिक्रम हे नेहमी असेच त्यांच्या गळ्यात येतात! यापेक्षा युक्तिवादाचा कोणताही ढोंगी मुखवटा न घालता या आमच्या शास्त्रीबोवांसारखे जो चक्क सांगतो की 'वड हा देव आहे — त्यास तोडले तर तो आम्हांस शापतो असे शास्त्र आहे; त्यास आम्ही मानतो.' तो धर्मभोळा असला तरी लुच्च्या नसतो. तरी त्यास इतकेच विचारणे पुरे आहे की, 'वडपिंपळ हे पदार्थ वस्तुतःच जर देव, तर

ते स्वतःच कुऱ्हाडीने तोडले, आगीत जाळले, वादळात मोडले कसे जातात ! आणि त्यांना पूजले नाही वा तोडले तर, जर वडोबा किंवा मुंजोबा रागावतो तर हे मुसलमान, खिस्ती किंवा आमच्यासारखे सुधारक हिंदू त्यांना वाटेल त्या दुसऱ्या झाडासारखे माणसाच्या सोयी-साठी तोडीत वा जाळीत असता ते आमचे काहीएक वाकडे कसे करीत नाहीत ?'

'अहो डॉक्टर, तुम्ही वाऱ्याशी भांडता आहा ! वडपिंपळ देव असे मी तरी कुठे म्हणालो ? हे सारे भावनेचे खेळ. शास्त्र चक्क सांगते 'न काष्ठे न च पाषाणे न शिलायाम् न च मृण्मये भावे हि विद्यते देवो तस्मात् भावोहि कारणम् ।।' आम्ही वडाच्या ठायी वडोबाची भावना ठेवून पूजतो म्हणून आम्ही तोडले की आम्हांस पाप लागते, पाप नाश करते, पण खिश्चन, मुसलमान वडापिंपळांना मुळी झाडेच मानतात, ते त्यात दैवी भावना ठेवीतच नाहीत, म्हणून त्यांनी वडपिंपळ तोडले तर त्यांना पाप लागत नाही, देव त्यांना दंड देत नाही ! वड आमच्या नवसास पावतो हे आमच्या भावनेचे फळ असेच का म्हणाना !' शास्त्री-बोवा म्हणाले.

'वा शास्त्रीबुवा ! वा ! लाखाची गोष्ट बोललात ही ! अहो, मग उत्तम मार्ग म्हणजे अशी अडाणी भावना मुळात ठेवू नये म्हणजे झाले ! राक्षसाला प्रथम जाणूनबुजून राजा म्हणा का आणि नंतर राजा म्हणून त्याला बळी देत बसा का ? दोरीला जाणूनबुजून साप समजा का नि नंतर थरकापत तिच्यापासून दूर पळा का ? आम्हीही गायबैलांना पशू, वडपिंपळांना झाडे, असेच मानले आणि त्यांना पूजिले नाही म्हणजे आम्हांला सुद्धा पाप लागणार नाही. हा वड गैरसोयीचा म्हणून कापू नि सोयीच्या ठिकाणी दहा वड दुसरे लावू ? ह्या वस्तू मनुष्याला उपयोगी म्हणून प्रथम रक्षणीय ठरल्या, दैवी ठरल्या. पण पुढे ते उपयुक्ततेचे मूळ कारण विसरून त्या वस्तूच रक्षणीय, पूजनीय देवता वाटू लागल्या. मनुष्याच्या अज्ञानयुगातील चुकी आता या विज्ञानयुगात सोडून दिली पाहिजे !'

इतक्यात बाहेरच्या लोकात मोठा गलगा झाला. डॉ. मोहित्यांचे

भाषण ऐकू येईनासे झाले. लोक दारात घुसू लागले, ' भिंगार्डे वकील ! ' म्हणून हाकावर हाका आल्या ! भिंगार्डे वाटच पाहात होते जणू काय त्या क्षणाची ! ते ताडकन् उठून दाराशी आले आणि एक चिठ्ठी हातात घेऊन धापा टाकीत म्हणाले, ' सभा बंद करा ! लोकक्षोभ अनावर होत आहे; कारण हे पाहा ! ही चिठ्ठी भिमाबाई पाटलिणीकडून आली असून त्यात त्यांनी असे लिहिले आहे की, ' जर वड पाडाल तर मी त्या जागी मरेतो उपास करीन ! ' लोक ओरडत होते, ' सभा बंद करा ! आम्ही वड पाडू देणार नाही ! ' अध्यक्षही ' तडजोड अशक्य, सभा बंद ! ' असे सांगून उठून गेले. ' सनातन धर्म की जय ' करीत लोकही हळूहळू परतले. जो तो भिमाबाईच्या श्रद्धेची नि देवलसी-पणाची वाहवा करीत होता !

सभा अशी उधळली तेव्हा संध्याकाळ होऊन पाऊस पडू लागला होता. तरी देखील भिंगार्डे वकील एकटेच भिमाबाईच्या घरी गेले. ' का ? कशी बिनतोड युक्ती मी सुचविली ? माझ्या सांगण्याप्रमाणे तुम्ही ती चिठ्ठी लिहवून अगदी वेळेवर धाडलीत हो भिमाबाई ! सोळा आणे काम झाले ! वड कोण पाडतो ते बघतो आता ! '

हे भिंगार्ड्यांचे अवसान पाहून भिमाबाई संतोषल्या. पाऊस वाढत चालला. वकील घरी गेले. ' वडाच्या पायाची धूळ अंगारा म्हणून मुलाला लावून माझ्या बाळास वडोबा शतायुषी करो ! ' असे म्हणून तिने त्याला झोपी घातले. दिवसभर थकलेली ती बाईही तशीच झोपी गेली ! वारा नि पाऊस वाढतच गेला !

रात्रीचे बारा वाजले असतील. त्या सडकेने एका लांब प्रवासाहून आलेली तट्टयाची बैलगाडी अकस्मात शिळंधार लागलेल्या त्या पावसात नि सोसायट्याच्या वाऱ्यात सापडून रेंगाळत, चाचपडत चालली होती. तोच कडाड् कडाड् असे दोनचार आवाजावर आवाज झाले. ती सडकेवर आलेली त्या वडाची लांब फांदी तुटून भिरकावलेल्या गदे-सारखी त्या गाडीच्या तट्टयास लागली; एखाद्या साहेबाची टोपी वरच्या-वर उडवावी तसा तो तट्टया उडवून गाडीवर कोसळली; गाडीवान ठिकच्या ठिकाणी फटकाऱ्यासरशी ठार होऊन खाली पडला; तोच त्या

वडाचा तो मुळाशी खिळखिळा झालेला उंच सोट उलट बाजूस कोलमडून पायथ्याच्या झोपड्यांवर पडला !

'अग आई ग !' अशी किंकाळी त्या छप्परभिंतीसुद्धा कोसळलेल्या झोपडीतून आली ! ती किंकाळी भिमाबाईचीच होती ! कोसळलेल्या झाडालाकडाखाली तिचे डोके फुटले होते, आणि त्या वडाच्या सोटाखाली, हाय हाय ! तिचे ते लेकरू चेंदामेंदा होऊन गेले होते !

* * *

# १०. भक्तिविजयातील हरवलेला नवा अध्याय

गोष्टीचा मूळ सांगाडा अगदी सत्य, घडलेली गोष्ट; पण सांगताना नावेगावे गाळून जरा जुळवून सांगितली गेली म्हणूनच काय ती तिला कथा म्हणावयाचे, असा जर सत्यकथा या शब्दाचा अर्थ केला तर आम्ही सांगत आहो ही एक शंभर टक्के सत्यकथा आहे. कारण ही गोष्ट अशी अगदी खरोखरीच घडली आणि तीही अवघ्या चारपाच वर्षांपूर्वी !

ज्या विठोबाचे देवळात ती घडली ते एक त्या नगरातील लहानसे, एक विरळ वस्तीत बांधलेले, भंडारी–मराठा इत्यादी वर्गातील कामकरी मंडळी कधीकधी ज्यात जात येत, असे बापडेसे देऊळ आहे. एक भाविक आणि निर्धन वर्गातील मध्यम वयाचा मनुष्य मात्र नेमाने त्या देवळात जाऊन विठ्ठलाची पूजा करी. दिवसभर कामधंदा केल्यानंतर रात्री एकटादुकटा कसाही असला तरी टाळ घेऊन 'वेडेवाकडे' हे विशेषण ज्यास लागू पडेल असे भजन नित्यनेमाने करी आणि गाता गाता गुंगी आली की तिथेच एकटा दुकटा निजे.

त्याच्या भाऊबंदांतील कोण्या बाईने त्याच्या घरादारात भाग मिळावा म्हणून भांडण काढले होते. तिला कोणी सांगितले, ह्या भाबड्या माणसाचा काटा जर वाटेतून निघेल तर ! – तो भयंकर विचार तिला पटला. गुंड लोकांच्या संगतीत ती फसलेली होती; त्यांनी काही ठराविक रक्कम घेऊन तिचे ते काम पारही पाडून टाकण्याचे अंगावर घेतले !

त्या चांडाळचौकडीवाचून तो मनुष्य एक भाबडा आणि निरुपद्रवी प्राणी म्हणूनच तेथील लोकांना परिचित असे. त्याचा देवलसीपणा पाहून त्याला कोणी कोणी बुवाही म्हणत. त्याच्याशी नेहमी भांडण करणाऱ्या त्या बाईच्या वळणातील त्या गुंड लोकांनी त्याला हाणमार करण्याच्या धमक्याही दिल्या आहेत हे ऐकून एकदोघांनी बुवास सांगितलेही होते की, 'रात्री बेरात्री जपून राहात जा ! ती वाईट माणसे आहेत !' पण

गजेंद्रमोक्षाच्या, दामाजीच्या, द्रौपदीच्या, चोखोबाच्या, कबीराच्या ज्या अनेक कथांची त्याने पारायणे केली होती, त्यांतील कोणाची तरी कथा सांगून त्याने म्हणावे, 'एकटा असलो, दुकटा असलो तरी माझा पाठीराखा पांडुरंग माझी पाठ राखीलच राखील!' असे म्हणत विठ्ठलाच्या मूर्तीकडे त्या मिणमिण्या समईच्या अंधुक उजेडात पाहून त्याने अभंग आळवावा 'जेथे जाई तेथे तू माझा सांगाती। संभाळिसी हाती धरूनिया ॥'

खून! खून!! अरे बापरे! भयंकर खून!!!

पहाटेच्या वेळी कुणी मनुष्य त्या विठोबाच्या देवळातून जात असता अकस्मात् मोठमोठ्याने बोंब ठोकीत ओरडला.

आजूबाजूच्या घराझोपड्यांची कवाडे, खिडक्या खाडखाड उघडून कोणी उघडे, कोणी बोडके असे काही लोक अंथरुणावरून उठले, तसेच तिकडे धावत आले.

त्या बुवाला कोणीतरी भयंकर हत्यारांनी घायाळ करून शेजारच्या शेतात फेकले होते. रक्ताच्या डबक्यात तो मरणाचा घोर लागून पडलेला त्या बोंब मारणाऱ्या वाटसरूस दिसला होता. भोवती जमलेल्या मराठा–भंडारी वर्गाच्या बायामाणसांसुद्धा सगळे हळहळत होते.

बुवाला कण्ह लागला होता, मधून मरणाच्या धक्क्यासरशी उचक्या येत; पण तो मेला नव्हता. लोकांतून एकास एक म्हणू लागले, 'ऐकलेत? बुवाच्या तोंडी विठाल! विठाल!' 'उचकीसरशी येतो खराच तो ध्वनी,' 'देवाचे नाव सुटले नाही त्याचे!' 'धावा करतो आहे देवाचा!' 'देवाला ह्या धाव्यासरशी ही बातमी पोचली तर विठोबा अजूनही येऊन त्याला हात देतील.' बुवा म्हणतच असे 'जेथे जाई तेथे तू माझा सांगाती। वागविशी हाती धरूनिया।'

पोलिस घाईघाईने पहिले लिखाण थोडेबहुत करून बुवाला रुग्णालयात धाडून देऊ लागले. काही लोक परत जात होते–काही येत होते. काही आपसात म्हणत होते, 'बुवाने विठ्ठलाचा नामघोष चालविला आहे!' 'बुवा मरणार नाही!' 'अहो, मरायचा असता तर इतक्या घावांतून वाचलाच नसता!' 'अहो, तो देवळात असता तर घायाळच झाला

नसता ! ' विठोबा जागृत दैवत, पण देवाच्या पाठीमागे या शेतात मारेकऱ्यांनी घात केला त्याला काय उपाय ! ' ' देव द्वारकेत होते म्हणून द्रौपदीमातेस दुःशासन गांजू शकला; पण तिचा धावा कानावर पडताच देव धावले तेव्हा तिचे तो काडीभरही वाकडे करू शकेना ! ' पोलिसही म्हणतच होते की, ' त्या मारेकऱ्यांची आम्हांस बित्तंबातमी मिळाली आहे. शेवटी त्यांचाच नाश होणार ! ' ' अहो, सत्यमेव जयते ! नानृतम् ! ! ' पूजेला चाललेले भटजीही विटाळ होऊ नये म्हणून लोकांच्या वाटेच्या बाजूस होते ते जाता जाता म्हणून गेले.

जमलेल्या थव्यापैकी तीच वाक्ये घोळींत मुली शाळेत गेल्या, मुले शाळेत गेली, बाया घरी गेल्या. भाजीवाल्या बाजारात गेल्या. कामकरी कामधंद्यावर गेले. सकाळचे दहा वाजत आले. दोन तीन पोलिस जाग्यावर टेहळीत होते, काहीजण दुरून पाहात जात होते. एकदोघेच देवळात जाऊन विठोबावर पाणी घालून घाईघाईने पूजेचा नियम कसाबसा पाळून निघून गेले होते.

साडेदहा वाजून गेल्यामुळे त्या नगरातील एक प्रमुख वकील असताही सार्वजनिक कथाकीर्तनातून भाग घेणारे स्नानसंध्याशील गृहस्थ पांडुरंगराव हे कोर्टात जाण्यासाठी उठू पाहात होते. पण त्यांच्या बैठकीत जमलेले लोक वादाच्या भरात आल्यामुळे तेथून काही हालेनात. जो तो बुवाच्या झालेल्या हत्येची काही तरी नवीन अद्‌भुत माहिती घेऊन तिथे येई. पांडुरंगराव स्वतः संतलीलामृतादी ग्रंथांचे मोठे चाहते असल्यामुळे बुवाच्याविषयी घडत चाललेल्या चमत्कारिक घटनांचा त्यासही विस्मय वाटू लागला होता. इतक्यात मोरे नावाचे तेथील खोतच आत आलेले पाहून पांडुरंगराव म्हणाले, ' तुम्ही आता अगदी चूप बसा. सुसंगत बातमी आणण्यासाठी गेलेले खोतच आता काय सांगतील ते खरे ! काय मोरे, बुवा रुग्णालयात शुद्धीवर आला हे खरे काय ? '

' खरे म्हणजे काय विचारता, पांडुरंगराव ! अहो, त्याने जो ' विठ्ठल विठ्ठल ' उचकी-उचकीसरशी नामघोष चालविला होता ना त्या धाव्याने द्रवून तिकडे प्रत्यक्ष विठोबाच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा लागल्या आहेत— मूर्तीच्या अंगास घाम सुटला आहे—आणि इकडे बुवा साफ उठून बसून

भजन करीत आहे. औषध न लावता रक्तप्रवाह बंद झाला ! '

'आश्चर्य ! काय ? विठोबा रडू लागतो ? अगदी प्रत्यक्ष पाहातात लोक ? ' अशा उद्‌गारांची, प्रश्नांची, आश्चर्यांची एकच सर झडली. मोरे ह्या झडीतील शेवटच्या बिंदूला झेलून म्हणाले, ' कोणी प्रत्यक्ष पाहिले काय विचारता ! शेकडो लोक जाऊन येताहेत विठोबाच्या देवळात. साऱ्या बाजारात जो तो म्हणत आहे--विठोबा रडत आहेत ! आणि बुवा उठून बसला आहे ! भक्ताच्या दुःखाने देव कळवळले, नेत्री अश्रुधारा वाहात आहेत ! जणू काय भक्ताला ते घाव न लागता देवालाच ते लागले ! '

' संत चोखोबाविषयी अशीच आख्यायिका आहे ' गंभीरपणे पांडुरंगराव म्हणाले, ' त्याला मारलेल्या चापट्यांनी देवाचे गाल सुजले. चोखोबांच्या डोक्यावर काठी पडे नि विठ्ठलाच्या मूर्तीच्या डोक्यावर टेंगूळ उठे. ग्रंथांतरीचे चमत्कार आज आम्हांला प्रत्यक्ष पाहावयास मिळतात ! सुधारकमतांनी या नगरातील लोकांची ढळू लागलेली भक्ती-वरची श्रद्धा पुनः बसावयासाठीच विठ्ठलाने हे नाटक कशावरून केले नसेल ! '

' मी म्हणतो, डॉ. विचारे हे जे त्या सुधारकांचे अग्रणी त्यांसच हा चमत्कार दाखवावा ! डॉ. विचाऱ्यांची लोकमतावर मोठी छाप पडते ! '

' मीच म्हणणार होतो ते, मोरे, डॉक्टर विचारे माझे मित्र आहेत. बुद्धिवादी आहेत—पण हट्टवादी नाहीत. आणि प्रत्यक्ष गोष्टीस, बुद्धिवादी झाला तरी नाकारणार कसा ! पण आता त्यांच्याकडे जावे तर कोर्टास उशीर होतो. संध्याकाळी मी डॉ. विचारे यांस घेऊन विठोबाच्या देवळात स्वतःच येतो. '

पांडुरंगरावांच्या ह्या अडचणीची टर उडवून मोरे म्हणाले, ' कोर्ट ! तुम्हा वकिलांना वैकुंठास न्यावयाला विमान आले तरी तुम्ही कोर्टाला उशीर होतो म्हणून ते परत धाडाल ! अहो, ज्ञानेश्वर–तुकारामाच्या कालापासून न घडलेली अशी देवाची करणी आज इथे घडत असता, भक्ताच्या दुःखाने विठोबा रडत आहे तोच, तो सोहळा लगेच प्रत्यक्ष न पाहाता म्हणे कोर्टाला उशीर होईल म्हणून संध्याकाळी जाऊ ! संध्या-

काळपर्यंत मूर्तीचे रडे बंद झाले तर? ते काही नाही. वकीलमहाशय आता चलायचे डॉ. विचाऱ्यांकडे, नि त्यांना घेऊन विठोबाच्या देवळाकडे!'

सर्वांनी 'हो हो चलाच!' म्हणून मोठा गिल्ला केला. तेच ठरले. खोत, मोरे नि पांडुरंगराव वकील डॉ. विचाऱ्यांकडे निघाले. काही मंडळीही बरोबर चालली.

मार्गाने सकाळच्या शाळेतून सुटलेली, दुपारच्या शाळेस जाणारी मुलेमुली, बाजारातील थवे, येतीजाती मंडळी, जो तो दुसऱ्यास विचारीत तरी होता वा सांगत तरी होता—तीच उद्‌भुत गोष्ट, विठोबा रडतो आहे!

पांडुरंगरावास वाटू लागले, आपण ज्ञानोबा-तुकारामांच्याच देवलसी काळात क्षणभर वावरत आहोत! रेडा वेद बोलतो आहे! पंढरीनाथाचे देऊळ फिरले आहे! देव जनीबरोबर दळत आहेत! रोहिदासाबरोबर जोडे शिवत आहेत! अशी अद्‌भुत वृत्ते त्या काळी लोक एकमेकांस असेच उत्तेजित होऊन सांगत असतील! त्या विचारात तन्मय होता होता त्यास वाटले, 'अहाहा! जर आज एखादे महिपती असते! या बुवाच्या या भक्तिविजयाचे आणि देवाच्या या रडण्याचे त्यांनी किती रसाळ वर्णन केले असते!' त्यांचे चित्त त्या विचारात इतके तल्लीन झाले, की चालता चालता, महिपती आज असते तर त्यांनी जो रसाळ अध्याय लिहिला असता त्यातील काही संभवनीय ओव्या जुळत चाललेल्या देखील त्यांस दिसू लागल्या! मनातल्या मनात ते त्या वाचू लागले—'ॐ नमोजी पंढरीराया। अतर्क्य ममता अतर्क्य माया। भक्तदुःखे देवराया। रत्नपुरी रडलासी ॥ १ ॥ धन्य धन्य तो बुवा संत। ज्याचेनि कारणे भगवंत। कटी ठेवूनिया हस्त। रडत राहावा ॥ २ ॥ संता गांठोनी मारेकरी। घाव घाली घावावरी। देव त्या दुःखें राउळीं। रडू लागले ॥ ३ ॥ भक्तिविजयातील या नव्या अध्यायाची अशी काही रूपरेषा जुळते न जुळते तोच डॉ. विचाऱ्यांचे घर आले.

'या पांडुरंगराव! माझ्या इथे आधीच ही पाहा मंडळींची झालेली दाटी! जो तो म्हणतो विठोबा रडत आहे! मोठा चमत्कार घडतो आहे!' डॉ. विचारे हसत म्हणाले.

'मग तुम्ही एकदा चक्क सांगून तरी टाका, की तुमचा चमत्कारा-

वर विश्वास नाही—मग शेकडो लोक प्रत्यक्ष ती गोष्ट पाहात असले तरी ते सगळे अंधळे !' पांडुरंगराव जरा त्रासिक स्वराने खोचून म्हणाले.

'अहो, चमत्कार जर घडला असेल तर तो चमत्कार असला तरी मी त्यावर विश्वास ठेवणारच ठेवणार. कारण जे कधी पाहिले नाही ते घडते किंवा जे घडते त्याचा उलगडा आपल्या ज्ञात कार्यकारणसंबंधाने लावता आला नाही म्हणजे त्यास आपण चमत्कार म्हणतो इतकेच त्याचे चमत्कारिकत्व. मनुष्यास सृष्टीचे सर्व नियम अजून कळले असे आम्ही समजत नाही. उलट आम्ही म्हणतो, सृष्टीच्या विश्वरूपाच्या नखाचेही पुरते दर्शन अजून आम्हा मनुष्यास झाले नाही. पूर्ण रूप दिसणे तर असंभवनीय ! तेव्हा चमत्कारास वाव हा नेहमीच असणार. प्रश्न घडले ते चमत्कारिक की साधे हा नाही; प्रश्न आहे तो हा की, घडले म्हणून जे म्हणतात ते तसेच घडले आहे की काय ? बरे, तो बुवा जिवंत झाला, रक्तस्राव आपण होऊन बंद झाला, ती बातमी अगदी पक्की का ?'

'अगदी पक्की ! बुवा खडखडीत बरा होऊन बसला आहे. स्वतः सिव्हिल सर्जन डॉक्टरांनी तोंडात बोट घातले, आश्चर्याने शेकडो लोक पाहून आले !' मोरे उत्तेजित स्वरात म्हणाले. बुवा विठोबास नेहमी आळवीत " जेथे जाई तेथे तू माझा सांगाती, वागविशी हाती धरोनिया॥' ते उगीच नाही !"

'थांबा, हे आलेच मी बोलावल्याप्रमाणे स्वतः सिव्हिल सर्जन महाशय ! ! या, या ! प्रथम हे सांगा की, ते बुवा कसे आहेत ?'

डॉ. विचाऱ्यांच्या या प्रश्नाने जरा अचंबा वाटल्यासारखे पाहात सिव्हिल सर्जन म्हणाले, कोणता बुवा ? ते सकाळी खुनाचे प्रकरण माजले तो बुवा की काय ? का त्यांची येवढी चौकशी ? आम्ही रुग्णालयात त्याला आणला तोच मुळी जवळजवळ मेल्यासारखा. दहा पाच मिनिटांत तो लगेच मेला ?'

पांडुरंगराव दचकून खुर्चीवरून अर्धे उठले, 'म्हणजे ! तो खडखडीत बरा झाला, त्याचा रक्तस्राव आपोआप बंद झाला, तुम्ही डॉक्टरांनी-देखील आश्चर्याने तोंडात बोट घातले — हे सगळे — !'

'साफ खोटे ! बुवा मेला तेव्हा मी काही तोंडात बोट घातले नव्हते;

ही तुमची भोळसट कथा ऐकून मात्र आश्चर्याने तोंडात बोट घालावेसे वाटते खरे ! कोणी सांगितले हे तुम्हांला ? '

' ह्या खोतांनी ! शेकडो लोक ते स्वत: पाहून आले म्हणून हे म्हणाले. काय खोत ? '

' हो तुम्हांला मी सांगितले खरे; पण मला स्वतः भिकंभटांनी सांगितले, शेकडो लोक पाहून आले ! '

डॉ. विचारे हसणार होते; पण प्रकरण चिडीस जाऊ नये म्हणून गंभीरपणे सिव्हिल सर्जनांना विचारू लागले, ' बरे, पण मरणाआधी शेतात घायाळ होऊन पडलेला असता शेकडो लोकांसमक्ष 'विठ्ठल, विठ्ठल' म्हणून त्याने नामघोष चालविला हे तरी खरे ना ? '

सिव्हिल सर्जन पुन्हा एकदा मानेला तिरस्काराचा झटका देऊन उसळले, ' छट् ! साफ खोटे ! अहो, त्याच्या खुनाची बोंब होऊन दहा-पाच लोक जमतात तोच मी सरकारी नात्याने तिथे पोचलो. शेकडो लोक कुठले ! बेशुद्ध, मृतप्राय, दहापाच उचक्या आल्या असतील नसतील ! श्वासोच्छ्वासाला ' कोहं ? सोहं ! ' असे जपणारी ' अजपा गायत्री ' असे नाव वेदान्ती जसे देतात तसे मरणाच्या उचकीस 'विठ्ठल' असे नाव द्यायचे असले तर माझे काही म्हणणे नाही ! अहो, मरणाची घरघर, दोनचार उचक्या, यापलीकडे ब्रही त्या बुवाच्या तोंडून निघण्या-पूर्वीच तो मरूनही गेला होता ! '

' बरे, ते असो. ' डॉ. विचारे उपहासाचा लवलेश अवलंब न करता एखाद्या न्यायाधीशासारखे काटेतोल बोलू लागले, ' आता विठोबाच्या मूर्तीच्या डोळयांतून या भक्ताच्या घाताने दु:खाश्रूंच्या धारा लागल्या आहेत, अंगास दरदरून घाम सुटला आहे, अशी जी बातमी गावभर पसरली आहे ती घटना तरी कोणी प्रत्यक्ष पाहिली आहे का ? '

' शेकडो लोकांनी ! ' मोरे ठासून म्हणाले. सारा प्रदेश शत्रू हस्तगत करीत आल्यानंतर शूर सेनापती शेवटचा बालेकिल्ला तरी पड्डू द्यावयाचा नाही, अशा बाण्याने जसे अढळ ठाण मांडतो तसे अढळ ठाण मांडलेले ते उत्तर पुन्हा देऊन मोरे म्हणाले, शेकडो लोकांनी ते प्रत्यक्ष पाहिले ' !

' तुम्ही स्वतः पाहिलेत का ! '

‘ नाही ! मी जातोच आहे तिकडे स्वतः बघावयास ! ’

‘ बरे. पांडुरंगराव, तुम्ही स्वतः पाहिलेत ? ’

‘ नाही ! पण साने आणि गाडगीळ यांनी स्वतः पाहिल्याचे ऐकतो.’ पांडुरंगरावांनी पुरावा दिला.

‘ हे इथेच आहेत पहा साने आणि गाडगीळ ! तुमच्याआधीच ते आले होते. काय साने, तुम्ही मघा सांगितलात तो अनुभव कृपा करून पुन्हा सांगा एकदा, डॉ. विचाऱ्यांनी विनविले.

‘ मी मघा सांगितलेच, की मी ही बातमी ऐकून आश्चर्याने थक्क होऊन देवळात गेलो होतो, पण दाटीमुळे मूर्तीजवळ जाता आले नाही. त्यातही गाभारा अंधारलेला. मला काही तसा प्रकार आढळला नाही. पण गाडगीळ पुढे होते, ते म्हणाले, की मूर्तीच्या डोळ्यातून धारा वाहात आहेत, म्हणून तेच मी म्हणालो. ’ सान्यांचा पुरावा संपला. मंडळी हसू लागली; पण डॉ. विचारे हसत नाहीतसे पाहून दबली. डॉ. विचाऱ्यांनी गाडगीळांना ‘ आपला अनुभव ? ’ म्हणून पृच्छा केली.

‘ मी अंधारलेल्या गाभाऱ्यात जर काही पाहिले असेल तर ते इतकेच की विठोबाच्या मूर्तीचे डोळे नि गाल ओलसर दिसत होते, आणि काही बाया मंडळी म्हणत होती—‘ अयाया, विठोबा रडतो आहे ! ’

‘ पण गाडगीळ, तुम्ही स्वतः मला म्हणालात, विठोबाच्या डोळ्यांतून धारा वाहत आहेत ! ’ सान्यांनी हटकलेच.

‘ आणि तेवढंच खरं आहे ! ’ डॉ. विचारे सर्वांकडे पाहून म्हणाले, ‘ हे चंद्रचूड इथे आहेत. हे आणि मी पोलिस चौकशी प्रथम चालू होती तेव्हाच, म्हणजे देवळात दहापाच लोक देखील गेले नव्हते तेव्हाच तिथे गेलो. त्या वेळी कोणी ह्या मूर्तीच्या डोक्यावर पाणी ओतून घाई-घाईने एकदोन फुले पायांवर टाकून निघून गेले. त्या देवळात तो बुवाच काय ती नीट पूजा करी. मूर्तीचे अंगबिंग नीट पुसण्यास दुसरा कोण आज येणार ? ते तसेच राहिले. आम्ही चौकशीचा रागरंग पाहून परततो तो त्या ओतलेल्या पाण्याचे थेंब नि ओलावा तोंडावर पाहून दोघेतिघे ‘ विठोबाच्या डोळ्यांतून पाणी येत आहे बघा ! ’ म्हणून आश्चर्यचकितपणे म्हणताना आम्ही ऐकले ! त्यास खरे कारणही आम्ही

सांगितले; पण त्यांस ते पटलेले दिसेना. आम्ही परतलो आणि पाहतो तो तीन तासात गावभर ‘ विठोबा रडतात ! ’ ही एकच हुल्लड उठली आहे ! ! ! दुसरे असे पाहा, की प्रथम जेव्हा विठोबासमोर बुवावर त्या दुष्टांनी घाला घातला – ’

‘ चूक ! चूक ! ’ मोरे निराशेच्या अवसानाने मध्येच उसळले, देवासमोर बुवावर घाला पडला नाही. वाटेत, देवाच्या पाठीमागे शेतात त्याला गाठला. देवाच्या समक्ष काय माय व्यायली होती त्या दुष्टांची ! ’

छट् छट् ! काय बकता आहा ! सिव्हिल सर्जन तिरस्काराचा झटका मानेस पुन्हा देत कातावले, ‘ अहो, बुवाला रात्री नेहमीप्रमाणे देवळात निजलेला शेजारच्या माणसांनी पाहिला. मध्यरात्री देवळात छपरावरून उतरून बुवाच्या तोंडात बोळा देऊन, दोनचार घाव घालून, फरफटत मारेकऱ्यांनी बाहेर नेला नि शेतात फेकला ! उपसलेली कौले, तोंडातला बोळा, देवळाच्या उंबरठ्यापर्यंत रक्ताचे उडालेला डाग, शेतापर्यंत रक्ताळ भाग – सारा पुरावा माझ्या समक्ष पाहून पंचनाम्यात नोंदला आहे ! ’

सुरेख मांडीत आणलेली गौर खालची घडवंचीच अकस्मात पडून ती सारी शोभा कोसळली असता तो ढीग पाहून मुलींना जसे खट्टू वाटते तसे पांडुरंगरावांचे मन खट्टू झाले चमत्काराला चमत्कार जुळत जुळत कोण रसाळ कथा–भक्तिविजयात शोभावा असा किती प्रासादिक तो त्यांच्या मनात जुळत आलेला देवलसी अध्याय ! कोणीतरी कोट पाटलूण घातलेला राक्षस महिपतीच्या हातातून हिसडून लिहिता लिहिता फाडून टाकीत आहे असे त्यांना मनातल्या मनात भासून गेले ! खोत, मोरे तर रागारागाने त्या सिव्हिल सर्जनांना राक्षस म्हणून उघड उघड म्हणण्याच्या बेतात होते; पण इतक्यात मनधरणीच्या हळूवार शब्दांत डॉ. विचारे म्हणाले,

‘ तुम्ही सर्वजण असे पाहा, की आपण भाबड्या भक्तीने देवाची थोरवी वाढविण्याच्या पायी त्याला उलट आपण माणसासारखा दुबळा करून सोडतो. माणसास देव करील ती खरी भक्ती; देवास माणसा-

सारखा अंधळा, दुबळा, रडवा, खुळा बनवील ती भक्ती की भाबडेपण! तो बुवा जे म्हणे की

**जेथे जाई तेथे तूं माझा सांगाती ।**
**सांभाळिसी हातीं धरोनियां ।।**

ते तात्त्विक अर्थी न घेता शब्दशः जर खरे समजावयाचे तर त्यास दुष्टांनी देवळात न गाठता शेतात गाठले असे मानले तरी कोणता फरक होणार! देव शेतातही त्याचा सांगाती होताच—मग तिथेही त्यास का सांभाळला नाही? मारेकरी येणार हे त्यास देवाने आधीच्च का कळविले नाही? खरा देव भक्ताच्या कैवाराने त्या दुष्टांस पकडून हापटण्याकरिता त्यांच्यामागे धावता का विटेवर एखाद्या बाईबापडीसारखा मुळूमुळू रडत बसता? जर ती विठोबाची मूर्ती खरोखर रडू लागती ना तर मला अशा दुबळ्या मूर्तीची उलट चीड येती! पण तरीही तसे घडले असते तर मी ते मानले असते! पण त्या बहुतेक, निदान बऱ्याचशा संतविषयक कथा ह्या अशाच सांगोवांगी बातावर रचलेल्या सुरस कादंबऱ्या आहेत! रसाळ पण अतथ्य, अपथ्य! देव म्हणे रडतो! भक्तांचा सूड घेत नाही; तर रडतो!'

'किंवा संत दामाजीस छळणाऱ्या त्या मुसलमानी सुलतानास हात धरून गादीखाली खेचायचे सोडून उलट जोहार करीत दंड भरतो!' सिव्हिल सर्जन मध्येच म्हणाले.

'पण ती कथाही जितकी सुंदर तितकीच खोटी ठरली आहे, महाशय.' डॉक्टर विचारे म्हणाले. 'विठू नावाच्या एका महाराने तो दंड भरला; जसा, आज कोण्या निमित्ताला टेकलेल्या सत्याग्रह्याचा दंड त्याचा आप्तेष्ट निनावीपणे भरतो नि त्याची सुटका होते. त्या विठू महाराचे घराणे विद्यमान आहे नि त्यांच्यापाशी ह्या घटनेचे लेख आहेत! पण आज ज्या भाबड्या प्रवृत्तीने विठोबास रडविले, तिनेच त्या विठूमहारास विठ्ठलाचा अवतार बनविले! बरे झाले, आज एखादा महिपती महाराष्ट्रात नाही, नाहीतर ही आजची रडकथा फुगत फुगत तिकडे पोचून त्या बिचाऱ्या भाविक ग्रंथकाराने प्रामाणिकपणे तिचा एक भक्तिविजयातील प्रासादिक अध्याय बनवून सोडला असता! असो, झाले ते

झाले. पण मी म्हणतो जर ते दैवत जागृत असेल तर जरी मारेकऱ्यांना स्वतः मारण्याचे त्यास साधले नाही तरी निदान त्याने इतके करावे, की ते मारेकरी कोण हे आज उद्या पोलिसांच्या स्वप्नात जाऊन सांगावे आणि त्यांचे रक्ताळलेले कपडे, हत्यारे, कुठे आहेत ती अचानक पकडून द्यावी ! गुप्तपोलिसांपेक्षा तरी देवाला काही अधिक अंतर्ज्ञान असावयास हवे ! इतके झाले तरी आम्ही त्यास एक चमत्कार म्हणू !' काही दिवसांनी पोलिसांनी दोनचार गुंड पकडले, खटले भरले; पण पुरावा कच्चा पडून सारे आरोपी सुटले. ते खुनाचे प्रकरण नव्हे तर त्याची आठवणही सर्वांनी रद्दीत काढली आहे. झालीच कधी आठवण तर 'विठोबा रडतो !' हा चमत्काराचा विषय म्हणून नव्हे. तर चेष्टेचा म्हणून !

* * *

म. ग्रं. सं.
दा. २१-५-८४
वि. कादंबरी

IRBK-0115851

IRBK-0115851